


# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, गुरुवार ८ ऑक्टोबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०




## दुष्काळासाठी राज्याला भरीव मदत



**नवी दिल्ली / मुंबइ/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील ३२ जिल्हयांना दुष्काळाचा तडाखा बसला आहे. ८० टक्के तालुके पूर्णपणे दुष्काळाने प्रभावित आहेत. पिण्याच्या पाण्याची तसेच चा-याची समस्या मोठया प्रमाणावर आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राला केंद्राची जास्तीत जास्त मदत मिळावी यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांची दिल्लीत भेट घेतली. राज्याने केंद्राला पाठविलेल्या प्रस्तावाची प्रतही त्यांना सादर केली. नियमात बसेल अशा पदधतीने महाराष्ट्राला जास्तीत जास्त मदत देण्यात येणार असल्याचे आश्वासन अमित शहा यांनी दिल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. केंद्राचे पथक ८ ते ११ ऑक्टोबर दरम्यान पाहणी करणार आहे. तसेच केंद्रिय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान देखील लवकरच महाराष्ट्राच्या दुष्काळी भागाच्या पाहणीसाठी येणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

राज्यातील दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अमित शहा यांची भेट घेतली. केंद्रिय गृहमंत्री हे एनडीआरएफचे अध्यक्ष असतात तसेच दुष्काळाबाबत जी मंत्रीसमिती मदतीची घोषणा करते त्या समितीचेही अध्यक्ष असतात. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी केंद्राला पाठविलेल्या प्रस्तावाची प्रत शहा यांना सादर केली. त्यानंतर ते माध्यमांशी बोलत होते.

केंद्रिय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी तर राज्यातील दुष्काळाची बातमी कळताच आपल्याशी स्वत:हून संपर्क केला. लागेल ती मदत महाराष्ट्राला करण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे. ८ ते ११ ऑक्टोबर दरम्यान केंद्राचे पथक पाहणीसाठी येणार आहे. शिवराजसिंह चौहान देखील महाराष्ट्र दौरा करणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. सॅटेलाईट इमेजरीच्या किंवा इतर नुकसानीच्या निकषात काही तालुके बसत नव्हते. पण अशा २० तालुक्यांनाही पीक नुकसानीच्या आधारावर मदत करण्यात येणार आहे. २००१ पासून आतापर्यंत दुष्काळ हा कायम नोव्हेंबरच्या अखेरीस किंवा डिसेंबरच्या सुरू वातीला जाहीर झाला आहे. पण यावर्षी आपण आधीच दुष्काळ जाहीर केला आहे. केंद्राचे पैसे उशीरा येतात पण त्याआधीच राज्याच्या संसाधनांचा वापर करून लवकरात लवकर मदतीचे पैसे देण्याचा आमचा प्रयत्न आहे असेही मुख्यमंत्री म्हणाले.नकाशा शोधा

**नागपूर विमानतळ नवीन टर्मिनलचा मार्ग मोकळा**

केंद्रिय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्यासोबतही आपली बैठक झाली. नागपूर विमानतळावर आपल्याला नवीन टर्मिनल इमारत उभारायची आहे. त्याची २७ एकर जागा हवाईदलाकडे आहे. ती मिळावी यासाठी आपला प्रयत्न होता. या बैठकीला केंद्रिय मंत्री नितीन गडकरी देखील ऑनलाईन उपस्थित होते. हवाईदलाने ही जागा देण्याचे मान्य केल्याने आता टर्मिनल इमारतीचा मार्ग मोकळा झाला असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

## महाज्योतीची परीक्षा रद्द; केंद्रावर कॉम्प्युटरच नसल्याने २ तास गोंधळ

**पुणे/प्रतिनिधी :** गेल्या काही दिवसांपासून देशातील वेगवेगळ्या भागात परीक्षांवरु न गोंधळ सुरु आहे. नीट पेपरफुटी प्रकरणी तर संपूर्ण देशात आंदोलने करण्यात आली. त्यानंतर आता महाज्योती परीक्षेवरु न आज ७ ऑक्टोबर रोजी पुन्हा गोंधळ झाल्याचे पाहायला मिळाले. परीक्षा देण्यासाठी विद्यार्थीनी परीक्षा केंद्रावर पोहोचल्या होत्या. मात्र, केंद्रावर कंप्यूटर उपलब्ध नसल्यामुळे परीक्षा रद्द करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

महाज्योतीची स्कॉलरशिपची आज परीक्षा पार पडणार होती. मात्र पुण्यातील आंबेगाव बुद्रक येथील सण ब्राईट स्कूल या परीक्षा केंद्रावर गोंधळ झाला. परीक्षा केंद्रावर कंप्यूटर उपलब्ध नसल्याच्या दावा मुलींनी केला आहे. परीक्षेची वेळ ९ ते ११ अशी असतानाही अद्याप मुली परीक्षा केंद्र बाहेर उभ्या आहेत. अद्याप परीक्षा देण्याची संधी त्यांना मिळालेली नाही. त्यामुळे परीक्षा रद्द करण्यात आली आहे.




सकाळ पासून मुली विना अन्न पाण्याच्या परीक्षा केंद्र बाहेर उभ्या होत्या. मात्र अद्याप कोणत्याही जबाबदार अधिका-यांनी त्यांच्याशी संपर्क केलेला नाही. परीक्षार्थी विद्यार्थिनींनी विचारणा केली असता त्यांना उडवा उडवीची उत्तरे दिली जात होती. त्यामुळे या विद्यार्थिनींनी परीक्षा केंद्राच्या ढिसाळ कारभाराविरोधात संताप व्यक्त करत आहेत. त्यानंतर अधिका-यांनी परीक्षा रद्द केल्याची माहिती दिली.

**३०० कोटींचा घोटाळा ?-** महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) येथे कौशल्या विकास प्रशिक्षणाच्या नावाखाली ३०० कोटी रुपयांच्या कथित गैरव्यवहाराचा आरोप करण्यात आला होता. निविदा न काढता ३०० कोटींची कामे दिल्याचा आरोप करण्यात आला होता. तसेच ५१ टक्के खासगी भागीदारी असूनही सरकारी असल्याचा आभास, बोगस विद्यार्थी व बनावट प्लेसमेंटद्वारे निधी उचलला आणि प्रशिक्षण प्रक्रियेत पादर्शकतेचा आभाव असल्याचा आरोप स्पर्धा परीक्षा समन्य समितीने केला होता.

**विद्यार्थी-पालकांमध्ये नाराजी-** परीक्षेची वेळ सकाळी ९ ते ११ अशी असताना विद्यार्थिनींना बराच वेळ परीक्षा केंद्राबाहेर थांबावे लागले. त्यानंतर अखेर परीक्षा रद्द करण्यात आली. परीक्षा देण्यासाठी तयारी करू न आलेल्या विद्यार्थिनींना केंद्रावर आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याने परीक्षा देता आली नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. या प्रकारामुळे विद्यार्थिनी आणि त्यांच्या पालकांमध्येही नाराजीचे वातावरण निर्माण झाले.

## विद्यार्थी आंदोलनाला देण्यात आलेल्या नोटिशीचा 'श्री गणेशा' कुठून झाला? रोहित पवारांचा सर्वात खळबळजनक दावा



**पुणे/प्रतिनिधी :** पुण्यात सुरू असलेल्या MPSC च्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा आज सातवा दिवस आहे. गेल्या सात दिवसापांसून हे विद्यार्थी हजारोंच्या संख्येने पुण्यातील एस एल जोशी पुलाजवळ आंदोलन करत आहेत. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या या आंदोलनाला विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद मिळताना पाहायला मिळत आहे. विरोधी पक्षातील अनेक नेत्यांनी पाठिंबा देण्यासाठी या आंदोलनाला हजेरी लावली असून आज सातव्या दिवशी या आंदोलनात मोठ्या घडामोडी घडताना पाहायला मिळत आहेत.मुंबई उच्च न्यायालयामध्ये काल आंदोलनामुळे वाहतूक कोंडीसह दैनंदिन व्यवस्था विस्कळीत होत असल्याचा दावा करत एक याचिका दाखल करण्यात आली आहे. पुण्यातील नागरिक असलेले अमित सुपीक आणि सौरभ वीरकर यांनी ही याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल केली आहे. याच पार्श्वभूमीवर आता पुण्यातील MPSC आंदोलनावरु न मुंबई उच्च न्यायालयाकडून राज्य सरकारला नोटीस बजावण्यात आली आहे. मात्र ही नोटीस बजावण्याच्या मागे नक्की कोणाचा हात आहे, या संदर्भात रोहित पवार यांनी अत्यंत मोठा दावा केला आहे. विद्यार्थ्यांचं आंदोलन दडपण्यासाठी करण्यात आलेल्या याचिकेच्या मागे पुणे महानगरपालिकेतील भाजपच्या एका बड्या नेत्याचा हात असल्याचा दावा रोहित पवार यांनी केला आहे. कारण याचिका करणारा एक व्यक्ती हा भारतीय जनता पक्षाचा कार्यकर्ता आहे आणि तो भाजपमधील महापालिकेतील एका बड्या नेत्याचे सगळे अर्थकारण पाहतो.

# राहुल-प्रियंकांचे ज्ञानेश कुमारांविरोधात सलग दुस-या दिवशी आंदोलन

### तिस-यांदा ताब्यात घेतले; राहुल म्हणाले- CECची नियुक्ती अवैध, राजीनाम्यापर्यंत थांबणार नाही



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करत राहुल आणि प्रियंका गांधी यांनी बुधवारी सलग दुस-या दिवशी आंदोलन केले. यावेळी, हे दोघे जंतरमंतरपासून सुमारे २०० मीटर आधीच रस्त्यावर बसले. सुरक्षा दलांनी त्यांना पुढे जाण्यापासून रोखले असता, प्रियंका संविधानाची प्रत हातात घेउन रस्त्यावरच आडव्या झोपल्या.दरम्यान, कॉंग्रेस कार्यकर्ते आणि सुरक्षा कर्मचारी यांच्यात झटापट झाली. तत्पूर्वी, कॉंग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी आयोजित केलेल्या दुपारच्या जेवणासाठी विरोधी पक्षांच्या खासदारांसोबत 'सागर रत्ना' रेस्टारंटमध्ये उपस्थित राहिल्यानंतर राहुल आणि प्रियंका जंतरमंतरच्या दिशेने निघाले होते. या जेवणाच्या कार्यक्रमाला समाजवादी पक्षाचे नेते उपस्थित राहिले नाहीत.त्याच्या आदल्या दिवशी, 'इंडिया' आघाडीच्या २०० हून अधिक खासदारांनी संसदेपासून निवडणूक आयोगाच्या कार्यालयापर्यंत मोर्चा काढला होता, परंतु त्यांना वाटेतच अडवण्यात आले. त्यानंतर, राहुल आणि प्रियंका यांनी आकाशवाणी संकुलात आठ तास धरणे आंदोलन केले. या काळात त्यांना दोनदा ताब्यात घेण्यात आले. आकाशवाणी संकुलात बळजबरीने प्रवेश केल्याप्रकरणी त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**प्रियंकांना छत्रसाल स्टेडियम येथे आणले, बाहेर पोलिस तैनात-**पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर, कॉंग्रेसच्या खासदार प्रियांका गांधी आणि इतर नेत्यांना छत्रसाल स्टेडियमवर आणण्यात आले आहे. स्टेडियमवर मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

**कॉंग्रेस खासदार म्हणाले राहुल गांधी आणि जनता कोणीही घाबरणार नाही**

कॉंग्रेसचे खासदार गौरव गोगोई म्हणाले, 'आज संपूर्ण विरोधी पक्ष मतदानाच्या हक्काचे रक्षण करण्यासाठी एकवटला आहे. राहुल गांधी किंवा देशातील जनता पोलीस किंवा ज्ञानेश कुमार यांना घाबरत नाही. आम्ही मतदानाच्या हक्काचे रक्षण करण्यासाठी बाहेर पडलो आहोत, कारण हा हक्क संरक्षित राहिला तरच आपला देश आणि लोकशाही सुरक्षित राहील.'ताब्यात घेतलेल्या राहुल गांधींना घेउन जाणा-या बसच्या छतावर चढलेल्या कॉंग्रेस कार्यकर्त्यांना सुरक्षा कर्मचा-यांनी खाली ओढले.

## 10 ऑक्टोबरच्या आंदोलनाला सीजेपीला परवानगी नाही

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**(सीजेपी) पुन्हा एकदा दिल्लीत आंदोलनाची तयारी केली आहे. सीजेपीने १० ऑक्टोबर रोजी प्रस्तावित आंदोलनाबद्दल दिल्ली पोलिसांना कळवले आहे. मात्र पोलिसांनी अद्याप आंदोलनासाठी परवानगी दिलेली नाही. तसेच नवी दिल्ली परिसरात बीएनएसएसचे कलम १६३ लागू आहे. सीजेपीचे सौरभ दास म्हणाले की हे केवळ सीजेपीचे आंदोलन नसून जेन-झीचे आंदोलन असेल. जोपर्यंत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना हटवले जात नाही, तोपर्यंत हे आंदोलन सुरू च राहील, असे ते म्हणाले. नवी दिल्ली परिसरात सध्या भारतीय नागरी सुरक्षा संहितेचे (बीएनएसएस) कलम १६३ लागू आहे. त्यामुळे, १० ऑक्टोबर रोजी होणा-या प्रस्तावित आंदोलनाबाबत सर्वजण पुढील निर्णयाची वाट पाहत आहेत. ३ ऑक्टोबर रोजी सीजेपीच्या आंदोलनादरम्यान एक नवीन वाद निर्माण झाला. तीन महिला पत्रकारांनी पोलिस अधिका-यांकडून लैंगिक छळ आणि गैरवर्तनाचा आरोप केला.

## विषारी वायूमुळे 4 विद्यार्थ्यांचा मृत्यू

**वृंदावन :** येथील एका निवासी गुरु कुलात अत्यंत धक्कादायक आणि दुर्दैवी घटना घडली आहे. दुर्गंधी येत असल्याच्या तक्रारीनंतर १२ फूट खोल भूमिगत पाण्याची टाकी स्वच्छ करण्यासाठी उतरलेल्या पाच विद्यार्थ्यांपैकी चार जणांचा गुदमरू न मृत्यू झाला, तर एका विद्यार्थ्याला वाचवण्यात यश आले असून त्याच्यावर रु ग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पाण्याच्या टाकीतून दुर्गंधी येत असल्याने स्वच्छतेसाठी सुरु वातीला एक विद्यार्थी खाली उतरला होता. मात्र, बराच वेळ तो बाहेर न आल्याने आणि आतून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने त्याला वाचवण्यासाठी इतर चार विद्यार्थीही एकापाठोपाठ एक टाकीत उतरले. टाकीत तयार झालेल्या विषारी वायूच्या विळख्यात सर्वजण अडकल्याने हा भीषण अपघात घडला. मृत विद्यार्थ्यांचे वय १७ ते २० वर्षांच्या दरम्यान असल्याचे सांगण्यात आले आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेउन बचावकार्य सुरू केले. टाकीतून पाचही जणांना बाहेर काढण्यात आले, परंतु त्यातील चार जणांचा रु ग्णालयात दाखल करण्यापूर्वीच मृत्यू झाला होता. टाकीत साचलेल्या विषारी वायूमुळे ऑक्सिजनची कमतरता निर्माण होउन त्यांचा मृत्यू झाला असावा, असा प्राथमिक अंदाज अधिका-यांनी व्यक्त केला आहे.

## ईडीचे केरळममध्ये 20 ठिकाणी छापे

**कोच्ची :** अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) केरळममधील तीन सहकारी संस्थांमधील अंदाजे ९२ कोटी रु पयांच्या कथित अनियमिततेच्या तपासाचा भाग म्हणून थ्रिसूर, एर्नाकुलम आणि कोझिकोडमधील २० ठिकाणी छापे टाकले. या तपासात अर्बन कोऑपरेटिव्ह सोसायटीमध्ये ५५ कोटी रु पये, थेन्नेला सर्व्हिस कोऑपरेटिव्ह सोसायटीमध्ये १० कोटी रु पये आणि कुट्टनेलूर कोऑपरेटिव्ह बँकेत २७ कोटी रु पयांची अनियमितता उघड झाली आहे. अधिका-यांनी सांगितले की, मनी लॉंड्रिंग आणि आर्थिक फसवणुकीच्या आरोपांखाली ही कारवाई केली जात आहे. ९२ कोटी रु पयांच्या कथित अनियमिततेप्रकरणी ईडीने केरळममध्ये २० ठिकाणी छापे टाकले. तीन सहकारी संस्थांमधील अंदाजे ९२ कोटी रु पयांच्या कथित अनियमिततेच्या तपासाचा भाग म्हणून ईडीने बुधवारी केरळममधील अनेक ठिकाणी छापे टाकले.

## आरबीआयने रेपो रेट 25 पाईटने वाढविला

**मुंबई :** केंद्रीय रिझर्व्ह बँकेने रेपो दरात वाढ केली आहे. आरबीआयचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी बुधवारी तीन दिवसीय एमपीसी (मनी पालिसी कमिटी) बैठकीचा निकाल जाहीर केला. त्यांनी सांगितले की, रेपो दरात २५ बेसिस पाइंट्सची वाढ करण्यात आली असून तो ५.२५% वरून ५.५०% झाला आहे. यामुळे गृहकर्ज, वाहन कर्ज आणि वैयक्तिक कर्जाचे दर वाढू शकतात. आरबीआयने व्याजदर वाढवल्याने ईएमआय वाढणार आहे.एखाद्या व्यक्तीने बँकेकडून २० लाख रु पयांचे गृहकर्ज घेतले आहे आणि या कर्जावरील व्याजदर सध्या ७.५% आहे. २० वर्षांच्या कालावधीसाठी, हप्ता (ईएमआय) १६,११२ रु पये येतो. परंतु आरबीआयच्या २५ बेसिस पाइंट, म्हणजेच ०.२५% व्याजदर वाढीनंतर, हा दर ७.७५% पर्यंत जाईल. याचा हिशोब केल्यास, त्याला २० लाख रु पयांच्या कर्जावर दरमहा १६,४१९ रु पयांचा हप्ता भरावा लागेल. याचा अर्थ त्याला दरमहा ३०७ रु पये जास्त भरावे लागतील. जर एखाद्या व्यक्तीने २० वर्षांसाठी ७.५० टक्के व्याजदराने ३० लाख रु पयांचे कर्ज घेतले, तर त्यांना दरमहा २४,१६८ रु पयांचा ईएमआय भरावा लागेल.

## दादांच्या जाण्याने माझ्यावर आभाळ कोसळले

### उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार भावुक

**बारामती/प्रतिनिधी-**तालुक्यात श्री सोमेश्वर साखर कारखान्याच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे तीन दिवसांपासून उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार बारामतीत कार्यकर्त्यांच्या संवाद बैठका घेत आहेत. दरम्यान चोपडज येथील संवाद बैठकीत सुनेत्रा पवार अतिशय भावुक झालेल्या पाहायला मिळाल्या.प्रचार करण्याशिवाय माझा प्रत्यक्ष राजकारणाशी दुरान्वये संबंध नव्हता. पण अपघाताने दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जाण्याने आपण सर्वच पोरके झालो. माझ्या घरावर तर आभाळच कोसळलं, जे होउ नये ते घडलं.दादा नंतर आम्ही तर पोरके झालोच पण आपण सर्व पोरके होउ नयेत म्हणून त्यांची जागा मी घेतली असं उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी म्हटले आहे. सोमेश्वर साखर कारखान्याच्या निवडणुकीतील विद्यमान अध्यक्ष पुरु षोत्तम जगताप यांच्या बंडखोरीवरू न ही उपमुख्यमंत्री



सुनेत्रा पवार यांनी वक्तव्य केल आहे.दादांना जाउन केवळ आठ महिने झालेत, दादा गेल्यानंतर जे काय चाललं आहे ते आणि जे काय बघत आहे आणि जे काय माणसं विचार करत आहेत यावरू न माझ्या हे लक्षात येतंय की खरंच माणसं कशी विचार करतात आणि कसे आहेत. जी माणसं एकीकडे दादांचा ढोल ताशा लावून गजर करतात आणि तीच माणसं दादांच्या पाठीत खंजीर खुपसत आहेत. पाठीमागं काय काय बोलत आहेत. जग आहे अनुभव येतात पण मी प्रत्यक्ष अनुभवत आहे असंही सुनेत्रा पवार यांनी म्हटलं आहे.त्यांच्या जागावर लोकांसाठी लोकांना आधार देण्यासाठी मी उभा राहिले, जन माणसांच्या अनेक अपेक्षा दादांकडून होत्या आणि दादांची देखील अनेक स्वप्न होती. ती पूर्ण करण्यासाठी मी उभा राहिले लोकांनी काय अर्थ घेतला काय नाही मला माहित नाही. मी जसं जमतय जेवढं कळतंय तेवढं कळण्याचा प्रयत्न करते. एक झालं की एक दुसरं सुरू च आहे अशी खंतही सुनेत्रा पवार यांनी बोलून दाखवली आहे.

## रशियाचे युक्रेनवर भीषण क्षेपणास्त्र हल्ले

**किव्ह/वृत्तसंस्था :** रशिया आणि युक्रेनमधील युद्ध दिवसेंदिवस अधिक तीव्र होत आहे. आता रशियाने युक्रेनवर मोठा हल्ला केला आहे. रशियाच्या सैन्याने शस्त्रे आणि ड्रोनचा वापर करू न कीव आणि युक्रेनमधील इतर अनेक प्रदेशांमधील लष्करी-औद्योगिक सुविधांवर मोठा हल्ला चढवला आहे. या हल्ल्यांमध्ये जमिनीवरू न, समुद्रातून आणि हवेतून डागण्यात येणा-या शस्त्रास्त्रांचा तसेच मोठ्या प्रमाणावर ड्रोनचा प्रभावी वापर करण्यात आल्याची माहिती रशियाच्या संरक्षण मंत्रालयाने बुधवारी दिली. रशियाने केलेल्या या आक्रमक कारवाईमुळे युक्रेनमध्ये मोठी खळबळ उडाली असून या भीषण हल्ल्यांमध्ये युक्रेनमध्ये किमान ११ जण ठार झाल्याचे सांगण्यात येत आहे. मंत्रालयाच्या माहितीनुसार, या हल्ल्यांमध्ये कीवमधील फायर पाइंटद्वारे चालवल्या जाणा-या सुविधांचा प्रामुख्याने समावेश होता, जिथे फलेमिंगो क्रूझ क्षेपणास्त्रे, मध्यम व लांब पल्ल्याचे ड्रोन तयार करून साठवले जातात. रायटर्सच्या वृत्तानुसार, कीवशिवाय चेर्निहीव, किरोवोग्राद, ड्निप्रोपेत्रोव्स्क, पोल्टावा आणि खार्किव प्रदेशांमधील लष्करी-औद्योगिक स्थळांनाही रशियन सैन्याने आपल्या हल्ल्यात लक्ष्य केले आहे. दरम्यान, रशियाने देशाच्या उर्जा पायाभूत सुविधांना विशेष लक्ष करू न ड्रोनसह सुमारे ७० क्षेपणास्त्रे डागली, अशी माहिती युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर झेलेन्स्की यांनी दिली आहे. या भीषण हल्ल्यांमध्ये युक्रेनमध्ये किमान ११ जण ठार झाल्याचे समोर आले आहे. उर्जा पायाभूत सुविधा हे मुख्य लक्ष्यांपैकी एक असल्याचे सांगत, या हल्ल्याद्वारे मोठे नुकसान पोहोचवण्याचा आणि एक कडक संदेश देण्याचा रशियाचा स्पष्ट प्रयत्न असल्याचा गंभीर आरोप झेलेन्स्की यांनी केला आहे. टेलिग्रामवरील एका पोस्टमध्ये झेलेन्स्की यांनी म्हटले की आमच्या उर्जा पायाभूत सुविधा हे प्रमुख लक्ष्यांपैकी एक होते आणि रशियन सैन्याला मोठा हल्ला करायचा होता. तसेच रशियन बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे हे सध्या युक्रेनपुढील सर्वात मोठे आव्हान असल्याचे सांगत देशासाठी अतिरिक्त हवाई संरक्षण प्रणाली ही आता अत्यंत अत्यावश्यक गरज बनली आहे अशी आक्रमक मागणी त्यांनी केली आहे.

## सरकारच्या तिजोरीवर शेतक-यांचा पहिला हक्क :एकनाथ शिंदे



**परभणी/प्रतिनिधी :** संपूर्ण मराठवाडा दुष्काळाच्या सावटाखाली सापडला आहे. दुष्काळाचे राजकारण करण्याची ही वेळ नाही. शेतक-यांच्या पाठीशी भक्कमपणे कसे उभे राहता येईल यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेतला पाहिजे. सरकारच्या तिजोरीवर शेतक-यांचा पहिला हक्क आहे. त्यामुळे आपत्कालीन स्थितीत शेतक-यांना मदतीचा हात देण्यासह कष्टक-यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहण्याचा संकल्प राज्य व केंद्र सरकारने सोडला आहे. शेतक-यांची दिवाळी काळी होउ देणार नाही, अशी ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. परभणीतील स्टेडिअम मैदानावर बुधवार, दि.७ ऑक्टोबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनातील २५ वर्षांच्या सेवापूर्ती निमित्त आयोजित गौरव अभियानाच्या अंतर्गत परभणी जिल्ह्यातील दुष्काळग्रस्त शेतकरी, गरजू कुटुंबांच्या मदतीसाठी शिवसेनेद्वारे विशेष उपक्रम राबविण्यात आला. याप्रसंगी उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते. यावेळी आयोजक तथा खा. संजय जाधव, खा. नागेश पाटील आष्टीकर, आ. संतोष बांगर, संपर्क प्रमुख आनंद जाधव, आ. सईद खान, माजी खा. सुरेश जाधव आदी उपस्थित होते.

यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, शेतकरी संकटात असल्याची सरकारला जाणीव आहे. राज्य सरकारने दुष्काळ जाहीर केला आहे. शेतक-यांच्या मुलांच्या शिक्षण शुल्काचा प्रश्न, शेतीसह जनावरांसाठी पाणी पुरवठा, चारा प्रश्न दूर करण्यात येईल. सरकार मदतीसाठी आखडता हात घेणार नाही. ही दिवाळी काळी होउ देणार नाही, अशी स्पष्ट ग्वाही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी दिली. शेतक-यांनो धीर सोडू नका, खचू नका. सरकारद्वारे कर्जवसूली थांबविण्यासह कर्जाचे पुनर्गठण केले जाईल. ८० टक्क्यांऐवजी आता १०० टक्के समाजकारणाचा संकल्प शिवसेनेने सोडला आहे, असे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. या कार्यक्रमात गरजू कुटुंबातील मुलांना सायकल, शिलाई मशीन वाटप करण्यात आले. तसेच यावेळी रु ग्वाहिकांचे लोकार्पण करण्यात आले. या कार्यक्रमास जिल्ह्यातील शेतक-यांसह कष्टकरी कुटुंब व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# श्री अंबादेवी शारदीय नवरात्र ११ ऑक्टोबरपासून

**अमरावती/प्रतिनिधीः-** विदर्भाची कुलस्वामिनी अमरावती नगरीची ग्रामदेवता श्री अंबादेवी चे शारदीय नवरात्र यंदा रविवार दि. ११ ऑक्टो. २०२६ पासून सुरू होत आहे. या दृष्टीने संस्थान तर्फे खालील कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. रविवार दि. ११ ऑक्टो. २०२६ ला पहाटे ४.३० वा. श्री अंबादेवीला सहस्त्रधारा महाभिषेक होईल. त्यानंतर संस्थानचे सचिव श्री व सौ रविंद्र कर्वे यांचे हस्ते घटस्थापना होईल. सकाळी ८.३० वा. सचिव डॉ. जयंत पांढरीकर यांचे हस्ते धर्मध्वजारोहण होईल.

दि. ११ ऑक्टो ते १९ ऑक्टो या काळात गत पंचेचाळीस वर्षांची अविरत परंपरा लाभलेली प्रवचनमाला श्री संत अच्युत महाराजांचे शिष्योत्तम श्री सचिन देव महाराज सादर करतील. श्री अंबादेवी कीर्तन सभागृहात रोज सकाळी ८.३० ते १० वेळात होणाऱ्या प्रवचनमालेचा यंदाचा विषय 'श्री गुरूचरित्र महात्म्य श्री नृसिंह सरस्वती महाराज यांचे चरित्र' हा राहील.

सोमवार दि. १२ ऑक्टो २६ रोजी दुपारी १ ते २ या वेळेत तपोवन येथील बंधू भगिनींसाठी दर्शनाची विशेष व्यवस्था करण्यात आली असून या वेळेत बाकी इतर नागरिक बंधू भगिनींसाठी दर्शन व्यवस्था बंद असेल.

नवरात्र काळात अमरावती शहरातील अनेक भजनी मंडळाच्या भजनांचा कार्यक्रम सकाळ व दुपारच्या सत्रात आयोजित असून मंदिरातील ब्रह्मवृंद सप्तशती पाठ करतील.

सोमवार दि.१९ ऑक्टो २६ रोजी दुपारी ११.३० पासून नवचंडी यागाला सुरूवात होऊन पूर्णाहूती सायं. ७ चे सुमारास होईल. वे. शा. संपन्न श्री गणेश शास्त्री जोशी यांचे नेतृत्वात संपन्न होणाऱ्या या यज्ञाचे यजमान सचिव डॉ. जयंत व डॉ. सौ. सुमेधा पांढरीकर तसेच सौ. दीपा व श्री रविंद्र खांडेकर असतील.





मंगळवार दि. २० ऑक्टो २६ रोजी श्री अंबादेवी श्री एकवीरा देवी सह दुपारी ठीक ४.०० वा. सीमोल्लंघनास निघेल.

भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन संस्थानने भाविकांच्या सोयीसाठी अनेक व्यवस्था केल्या आहेत. सर्व भाविकांना मंदिराच्या पूर्वेकडील दारातूनच प्रवेश असेल. पुरूषांना मंदिराच्या पूर्वेकडील मुख्य प्रवेश द्वारातून तर महिला वर्गासाठी डावीकडील द्वाराकडून प्रवेश असेल. ओटी भरण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. दक्षिणेकडील द्वारातून भाविक बंध-भगिनी एकवीरा देवीकडे जाऊ शकतील.

श्री शैलेश जोग यांचे नेतृत्वात लोकहित मंच सेवा फाउंडेशन तर्फे मंदिराच्या पूर्वेस व उत्तरेस विनामुल्य चप्पल स्टँड ची व्यवस्था राहील. या शिवाय श्री अंबादेवी संस्थान हॉस्पीटल तर्फे एक आपातकालीन वैद्यकीय सहायता कक्ष तसेच एक डॉक्टर, प्रथमोपचार वगैरे ची व्यवस्था करण्यात आली असून श्री जोग ट्रस्ट च्या सहकार्याने ॲम्ब्युलन्स उपलब्ध असेल. दरवर्षी प्रमाणे सर्व भाविक भक्तांनी शिस्तीत व शांततेत दर्शन घेऊन सहकार्य करावे अशी विनंती विश्वस्त मंडळाने केली आहे.

# महाराष्ट्र संपादक परिषदेचे राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

## -दै.हिंदुस्थानचे विलास मराठे यांच्यासह आठ संपादकांचा होणार गौरव

### पद्मभूषण देशपांडे यांना विशेष पुरस्कार

**मुंबई** : महाराष्ट्र संपादक परिषदेच्या वतीने स्वर्गीय ज्येष्ठ पत्रकार यशवंत पाध्ये यांच्या जयंतीनिमित्त देण्यात येणाऱ्या सन २०२५-२६ च्या राज्यस्तरीय पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. पत्रकारितेतील उत्कृष्ट कार्यासाठी अमरावती येथील दैनिक हिंदुस्थानचे विलास अरुण मराठे यांच्यासह राज्यातील आठ मान्यवर संपादकांची या पुरस्कारांसाठी निवड करण्यात आली आहे. दैनिक प्रहारचे संपादक पद्मभूषण देशपांडे यांना विशेष पुरस्काराने गौरविण्यात येणार असून, आरोग्यसेवेच्या क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानासाठी पत्रकार मंगेश चिवटे यांनाही सन्मानित करण्यात येणार आहे.



स्वर्गीय यशवंत पाध्ये यांच्या जयंतीनिमित्त मुंबई येथे आयोजित विशेष कार्यक्रमाच्या निमित्ताने पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. पाध्ये यांनी वृत्तपत्र क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याचे आणि योगदानाचे स्मरण जपण्यासाठी महाराष्ट्र संपादक परिषदेतर्फे हे पुरस्कार देण्यात येतात. पत्रकारितेत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या संपादकांचा गौरव व्हावा, त्यांच्या कार्यातून इतर संपादक व पत्रकारांना प्रेरणा मिळावी आणि आगामी पिढीला मार्गदर्शन लाभावे, हा या पुरस्कारांमागील उद्देश आहे.

यंदाच्या पुरस्कारांसाठी दैनिक लोकमतचे नंदकिशोर पाटील (छत्रपती संभाजीनगर), दैनिक हिंदुस्थानचे प्रबंध संपादक विलास अरुण मराठे (अमरावती), दैनिक सकाळचे निखिल पंडितराव (कोल्हापूर), दैनिक संचारचे विक्रम खेलबुडे (सोलापूर), दैनिक पुण्यनगरीचे सुनील जावडेकर (ठाणे-पालघर), दैनिक सकाळचे सतीश वैजापूरकर (शिर्डी, अहिल्यानगर), दैनिक पुढारीचे संजीव कुलकर्णी (नांदेड) आणि दैनिक लोकशाहीचे डी. जे. गुरव (जळगाव) यांची निवड करण्यात आली आहे. राज्याच्या विविध भागांत पत्रकारितेच्या माध्यमातून केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल या संपादकांना सन्मानित करण्यात येणार आहे.

अमरावतीच्या दैनिक हिंदुस्थानचे प्रबंध संपादक विलास अरुण मराठे यांचा पुरस्कारप्राप्त संपादकांमध्ये समावेश झाल्याने त्यांच्या पत्रकारितेतील कार्याला राज्यस्तरीय सन्मान मिळणार आहे. राज्यातील विविध विभागांतील संपादकांच्या कार्याची दखल घेणाऱ्या या पुरस्कारांच्या माध्यमातून प्रादेशिक पत्रकारितेतील योगदानाचाही गौरव होणार आहे.

दैनिक प्रहारचे संपादक पद्मभूषण देशपांडे यांना यावेळी विशेष पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. तसेच आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून हजारो रुग्णांना मदतीचा आधार देणारे पत्रकार मंगेश चिवटे यांचाही पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे. पत्रकारितेसोबतच रुग्णसेवेसाठी त्यांनी दिलेल्या योगदानाची दखल या निमित्ताने घेण्यात आली आहे. रोख रक्कम, गौरवचिन्ह, शाल आणि श्रीफळ असे पुरस्कारांचे स्वरूप आहे. लवकरच प्रत्येक विभागात मान्यवरांच्या हस्ते पुरस्कारप्राप्त संपादक व पत्रकारांना गौरविण्यात येणार असल्याचे महाराष्ट्र संपादक परिषदेने कळविले आहे.

या राज्यस्तरीय पुरस्कारांच्या निवड प्रक्रियेसाठी महाराष्ट्र संपादक परिषदेचे अध्यक्ष संजय मलमे, सचिव एकनाथ बिरवटकर, कार्याध्यक्ष प्रकाश कुलथे, उपाध्यक्ष सुधीर जाधव व गजानन चव्हाण, खजिनदार दीपाताई पाध्ये यांच्यासह गोरख तावरे, अरुण सुरवाडकर, धोंडूपंत विष्णुपुरीकर, राजेंद्र मोहिते आणि अन्य मान्यवर सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

स्वर्गीय यशवंत पाध्ये यांच्या स्मृतींना अभिवादन करत पत्रकारितेतील उत्कृष्ट कार्याचा सन्मान करणारा हा उपक्रम नव्या पिढीतील पत्रकारांसाठी प्रेरणादायी ठरावा, अशी महाराष्ट्र संपादक परिषदेची भूमिका आहे.

# भाजपा तर्फे काढण्यात आली सेवा ज्योती यात्रा २०४७

## पंतप्रधान मोदींच्या कार्याला २५ वर्ष पूर्ण झाल्या निमित्त आयोजन

**अमरावती/प्रतिनिधीः-**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राजकीय सेवा जीवन कार्याला म्हणजेच मुख्यमंत्रीपदापासून ते पंतप्रधान पदाच्या आजपर्यंतच्या कार्यकाळाला दिनांक ७ ऑक्टोबर २०२६ रोजी २५ वर्ष पूर्ण झाले. दिनांक १ ऑक्टोबर २००१ रोजी नरेंद्र मोदी यांनी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली होती त्यानंतर सलग बारा वर्ष गुजरातचे मुख्यमंत्री आणि त्यानंतर २०१४ पासून ते विद्यमान मध्ये ते देशाचे तिसऱ्यांदा पंतप्रधान झालेले आहेत, या त्यांच्या संपूर्ण राजकीय जीवनाला पंचवीस वर्षे पूर्ण झाल्या निमित्ताने भारतीय जनता पार्टी तर्फे संपूर्ण भारत देशामध्ये सेवा ज्योती यात्रा २०४७ चे आयोजन करण्यात आले होते. या अनुषंगाने अमरावतीमध्ये देखील भाजपा अमरावती शहराच्या दृष्टीने असलेल्या एकूण सात मंडळामध्ये सेवा ज्योती यात्रा बाईक रॅली द्वारे काढण्यात आली.



यामध्ये बडनेरा येथून सावता मैदान, साई मंडल ची यात्रा रंगोली पर्ल नवाते चौक, स्वामी विवेकानंद मंडलाची यात्रा फरशी स्टॉप चौक, अंबा मंडलाची यात्रा राजकमल चौक, कॉटन मार्केट मंडळाची यात्रा गायत्री माता मंदिर विलास नगर, विद्यापीठ मंडलाची यात्रा, गजानन महाराज मंदिर दस्तुर नगर, संत गाडगेबाबा मंडळाची यात्रा गाडगेबाबा समाधी मंदिर अशा या यात्रा विविध ठिकाणाहून सकाळी ८.३० वाजता सुरू झाल्या.

या सर्व यात्रा बाईक रॅली द्वारे अभियंता भवन शेगाव नाका येथे पोचल्या, या ठिकाणी भारत मातेचे पूजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. सुरुवातीला वंदे मातरम गायल्या गेले, भाजपा अमरावती शहर जिल्हाध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाषण केले, भाजपाचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस आणि या कार्यक्रमाचे मुख्य वक्ते संजय कुटे यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना मोदीजींच्या जीवनकार्याचे २५ वर्षांवर प्रकाश टाकला.

यावेळी व्यासपीठावर प्रामुख्याने भाजपा माजी प्रदेश सचिव जयंत डेहनकर, ज्येष्ठ नेते किरण पातूरकर, प्रा. रवींद्र खांडेकर, मनपा सभागृह नेता चेतन गावंडे, शहर जिल्हा सरचिटणीस बादल कुळकर्णी, राधा कुरिल, ललित समदूरकर, कार्यक्रमाचे संयोजक राजेंद्र मेटे, अमरावती शहर जिल्ह्यातील सर्व भाजपा मंडळ अध्यक्ष अभिजात वानखडे, संतोष कावरे, प्रफुल्ल बोके, विनोद ठोसर, उमेश निलगिरे, भारती गुहे, मोर्चा अध्यक्ष सुधा तिवारी, विक्की शर्मा, कुणाल टिकले, सुधीर थोरात, मिलिंद बांबल, सुरेखा लुंगारे, उपस्थित होते.

यानंतर थेट दहा वाजता ऑनलाईन द्वारे भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबिन यांनी कार्यकर्त्यांना संबोधित केले, आणि सकाळी १०.१५ वा. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वतः ऑनलाइनस्वरूपात संपूर्ण देशाला व अभियंता भवन मध्ये असलेला अमरावती शहराच्या कार्यकर्त्यांना संबोधित केले.

यावेळी भाजपा अमरावती शहर जिल्ह्यातर्फे प्राविण्य प्राप्त खेळाडूंचा सत्कार सुद्धा करण्यात आला. यामध्ये स्काऊट गाईड मध्ये राष्ट्रपती पुरस्कार विजेते अभिषेक ताणवेस, नुकत्याच जापान येथे संपन्न झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेमध्ये तिरंदाजी मध्ये रोप्य पदक पटकावणाऱ्या यशदीप भोगे यांच्या वडिलांचा सत्कार करण्यात आला, तसेच ज्युनिअर राष्ट्रीय स्तरावर (नाशिक येथे )

कार्यक्रमांचे सूत्र संचालन शहर जिल्हा महामंत्री बादल कुळकर्णी यांनी केले व आभार प्रदर्शन कार्यक्रमाचे संयोजक राजेंद्र मेटे यांनी केले. आयोजन समिती चे सदस्य म्हणून शैलेंद्र मिश्रा, संजय तीरथकर, विनोद ताणवैस, राजेश आखेगावकर,हेमंत श्रीवास्तव, निलेश काजे, शाम साहू, संतोष माहुरे, यांनी काम पाहिले.

# १ व १० वरिल उर्वरित

## छाननीअंती ३० उमेदवारांची

सुनील दुर्गादास राठोड (अपक्ष), सुमित सुरेशराव पवार (अपक्ष), डॉ. सौ. संगीता सचिंद्र शिंदे- बोंडे (अपक्ष), प्रा.डॉ. संतोष श्रीकृष्ण हुशे (अपक्ष) आणि हेमलता दिलीपसिंग मुणोत (अपक्ष) यांचा समावेश आहे. यावेळी छाननीमध्ये गाजी मोहम्मद जाहेरोश (वंचित बहुजन आघाडी) यांचे नामनिर्देशनपत्र अवैध ठरले. छाननी अखेर आता ३० उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. निवडणूक कार्यक्रमानुसार उमेदवारी मागे घेण्याबद्दलची सूचना उमेदवाराला किंवा उमेदवाराने लेखी प्राधिकार दिलेल्या त्याच्या कोणत्याही प्रस्तावकाला किंवा निवडणूक प्रतिनिधीला निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती किंवा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहआयुक्त (सामान्य प्रशासन) विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती यांच्याकडे त्यांच्या कार्यालयात शुक्रवार ९ ऑक्टोबर, २०२६ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत देता येईल, असे निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे.

## विद्यार्थ्यांच्या शालेय पोषण

नगरपालिका प्रशासनाचे मुख्याधिकारी तसेच पंचायत समिती दर्यापूरचे संबंधित अधिकारी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन चौकशी करणार का आणि दोष आढळल्यास संबंधित ठेकेदारावर कठोर कारवाई करणार का? याकडे आता पालकवर्गासह नागरिकांचे लक्ष लागले आहे.ज्या ठेकेदारामार्फत विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार पुरविल्या जातो. त्याच ठेकेदाराकडून याआधीही शालेय पोषण आहारात असे प्रकार घडले आहेत. याबाबत नगर परिषद प्रशासनाकडे वारंवार तक्रारी केल्या आहेत. तरीही नगर परिषद प्रशासन गप्प का? हा प्रश्न उपस्थित होतो.आम्ही कितीवेळा संबंधित ठेकेदाराची तक्रार वरीष्ठाकडे करूनही ठेकेदार कुणाचेही ऐकायला तयारच नाही. विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शालेय पोषण आहाराची प्रथम पाहणी करुन त्याची प्रत्यक्ष चव घेऊन मगच ते विद्यार्थ्यांना खायला देत असतो.आजच्या प्रकाराबाबत आमच्या स्तरावर कारवाई करणार असून वरीष्ठाकडेही तक्रार करणार आहोत. विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या ठेकेदारावर कारवाई झालीच पाहिजे.**-शाहीद अशफाक उल्ला खा,मुख्याध्यापक**

-नगर परिषद उर्दू शाळा क्र १० बाभळी (दर्यापूर

याबाबतची कोणतीही माहिती मला अद्यापपर्यंत मिळाली नाही. सदर प्रकाराबाबत माहिती प्राप्त झाल्यावर त्याची योग्य चौकशी करुन दोष आढळल्यास संबंधित ठेकेदारावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल. **-नंदकुमार जाधव,** गटशिक्षणाधिकारी -पंचायत समिती, दर्यापूर

## घरगुती सिलेंडरमधून गॅस

काढून सिलेंडरची विक्री करीत असल्याची गोपनीय माहिती पथकाला मिळाली. माहितीची खातरजमा केल्यानंतर गुन्हे शाखा युनिट क्रमांक १ च्या पथकाने संबंधित ठिकाणी छापा टाकला. एका घरासमोर सिलेंडरने भरलेले दोन लोडिंग ऑटो उभे असल्याचे आढळले. घरात पाहणी केली असता दोन इसम मशीन आणि पाइपच्या सहाय्याने भरलेल्या सिलेंडरमधून गॅस काढताना पोलिसांना आढळून आले. पोलिसांच्या चौकशीत रुपेश मुकींदराव आठवले (वय २५) आणि रुतिक संतोष प्रधाने (वय २५), दोघेही रा. महाजनपुरा, अमरावती, यांनी आर्थिक फायद्यासाठी विक्रीच्या प्रत्येक सिलेंडरमधून एक ते दोन किलो गॅस काढत असल्याचे सांगितल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.कारवाईत पोलिसांनी अंदाजे १ लाख ३२ हजार रुपये किमतीचे ४४ सिलेंडर, १२ हजार रुपयांची तीन गॅस रिफिलिंग मशीन, १५ हजार रुपयांचे तीन वजनकाटे तसेच दोन लोडिंग ऑटो जप्त केले. जप्त मुद्देमाल व दोन्ही आरोपींना पुढील कारवाईसाठी खोलापुरी गेट पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. या प्रकरणी पुढील कायदेशीर कारवाई खोलापुरी गेट पोलिसांकडून करण्यात येत आहे.

## उमेश कोल्हे हत्याकांडातील

असे म्हणत न्यायालयाने आतिब रशीदची आरोपमुक्त करण्याची याचिका नामंजूर केली. रशीदच्या वकिलाने न्यायालयात युक्तिवाद केला की, त्याला चुकीच्या पद्धतीने या प्रकरणात गोवण्यात आले आहे. परिस्थितीजन्य घटनाक्रमात त्याचा कोणताही थेट सहभाग या हत्या प्रकरणात नाही. रशीद कोणत्याही बंदी घातलेल्या दहशतवादी संघटनेचा सदस्य नाही, त्यामुळे त्याच्यावर यूएपीए अंतर्गत कारवाई करू नये, असा युक्तिवाद वकिलाने केला. मात्र न्यायालयाने या सर्व युक्तिवादांना लावले.न्यायालयाने हे देखील म्हटले की, रशीद हा या हत्याकांडातील मुख्य कट रचणारा आहे, ज्याने सहआरोपींना खून करण्यासाठी प्रवृत्त केले. तपास यंत्रणांचाही आरोप आहे की, रशीदने आपल्या दुचाकीवर दोन्ही सहआरोपी मोहम्मद शोएब आणि शाकिब अहमद यांना बसवून घटनास्थळी आणले होते, जिथे कोल्हे यांची हत्या झाली. सरकारी पक्षाने असा दावाही केला आहे की, रशीदने हत्येनंतर लगेचच आरोपी इरफानला संदेश पाठवला होता की, अमित मेडिकल चालकाला चाकूने मारले आहे. राष्ट्रीय तपास यंत्रणेने आरोप केला आहे की, रशीदने नंतर आपल्या मोबाईल हँडसेटमधून डेटा डिलीट केला होता, पकडले जाण्याच्या भीतीने त्याने असे केले होते.न्यायालयाला आढळून आले की, सरकारी पक्षाने रशीदविरुद्ध बरेच इलेक्ट्रॉनिक आणि तोंडी पुरावे सादर केले आहेत. कॉल डिटेल रेकॉर्ड मधूनही उघड झाले आहे की, रशीद आणि हल्ला करणाऱ्या आरोपीं मध्ये १०० पेक्षा जास्त वेळा कॉल झाले होते. याशिवाय सीसीटीव्ही फुटेजमध्येही गुन्ह्याच्या ठिकाणाजवळ रशीदची उपस्थिती दिसून आली आहे. या सर्व बाबींचा विचार करून न्यायालयाने रशीदची याचिका फेटाळून लावली.

## दुष्काळी परिस्थितीचा सामना

व्यक्तिशः पाहणी करून तज्ज्ञांशी संवाद साधला. तसेच, टंचाईच्या काळात चारा संवर्धनासाठी पशुपालकांकडून अवलंबल्या जाणाऱ्या पद्धतींबाबत शेतकरी आणि पशुपालकांशी थेट चर्चा केली. जिल्ह्यात संभाव्य टंचाई निर्माण होण्यापूर्वीच करावयाच्या उपाययोजनांचा भाग म्हणून, या कार्यक्रमात पीक अवशेषांचे जतन, संवर्धन आणि पोषणमूल्यवर्धन यावर आधारीत प्रात्यक्षिके आणि सादरीकरणे करण्यात आली. कमी पाचक व निकृष्ट वाळलेल्या कडबा, पेंढा चाऱ्याची उपयोगिता वाढविण्यासाठी युरिया प्रक्रियेचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक पशुसंवर्धन विभागाचे गुणवत्ता नियंत्रण सहाय्यक आयुक्त डॉ. तुषार गावंडे यांनी दिले. टंचाईपूर्वी हिरवा चारा उपलब्ध असतानाच जास्तीत जास्त मुरघास तयार करण्यासाठी, बुल मदर फार्म, पोहरा येथील वैरण विकास अधिकारी गिरी यांनी मुरघास निर्मितीचे प्रात्यक्षिक दाखविले. हिरव्या चाऱ्याचा पर्यायी स्त्रोत म्हणून हायड्रोपोनिक हिरवा चारा निर्मितीचे सादरीकरण पशूधन विकास अधिकारी तथा पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. गजानन नागरे यांनी केले. पीक अवशेषांची नासाडी किंवा जाळणे टाळून कडबाकुट्टी यंत्राचा अधिकाधिक वापर करावा आणि चारा बचतीसाठी या सर्व शास्त्रीय पद्धतींचा अवलंब करावा, असे आवाहन पशुपालकांना करण्यात आले. यावेळी डॉ. पंकज रवाळे यांनी राज्यात नव्याने लागू झालेली पशुधन विमा योजनेबाबत माहिती दिली. व्हीएमडीडीपी योजनेबाबत माहिती डॉ. मनोज आडे यांनी दिली. डॉ. जयंत माहुरे, डॉ. नंदकिशोर अवघड यांनी पशुपालकांना प्रस्तावित असलेली मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उत्पादकता कार्यक्रम बाबत विस्तृत मार्गदर्शन केले. जिल्हा पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय उपआयुक्त डॉ. वल्लभ जोशी यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी आगामी दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी चारा संवर्धनाची नितांत आवश्यकता आणि टंचाईचा सामना करण्यासाठी पशुसंवर्धन विभागाची भूमिका व पूर्वतयारी याबाबत मार्गदर्शन केले.

## थकीत मालमत्ता कर

मालमत्ता करावर कारवाई करण्यात आली. मागील तीन वर्षांपासून मालमत्ता कर न भरल्याप्रकरणी एकूण ४० फ्लॅटवर जप्तीच्या नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.नंदनवन कॉलनी, माधव लॉनजवळील वॉर्ड क्र. C-७ मधील मालमत्ता क्र. १६४०/१ ते १६४०/२० तसेच १६४१/१ ते १६४१/२० अशा एकूण ४० फ्लॅटधारकांनी मागील तीन वर्षांपासून मालमत्ता कर भरलेला नसल्याचे महानगरपालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले. त्यानुसार दि. ९ सप्टेंबर २०२६ रोजी सर्व ४० फ्लॅटवर जप्तीच्या नोटिसा लावण्यात आल्या. सदर मालमत्तांचे मालक मुकुंद दातेराव बिल्डर व वऱ्हाडे बिल्डर यांनी अद्याप या कारवाईबाबत कोणतीही प्रतिक्रिया अथवा प्रतिसाद दिलेला नसल्याचे महानगरपालिका प्रशासनाने नमूद केले. थकीत कराची वसुली करण्यासाठी महानगरपालिकेने ही कारवाई केली आहे. दरम्यान, याच परिसरातील माधव लॉनचा मालमत्ता करही थकीत असल्याने तेथेही महानगरपालिका प्रशासनाकडून नोटीस बजावण्यात आली. ही कारवाई झोन क्र. ३ चे सहाय्यक आयुक्त नितीन बोबडे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. यावेळी झोन क्र. ३ मधील क्षेत्रीय अधिकारी प्रविण ठाकरे, कर लिपिक राज डेंडुले उपस्थित होते. थकीत मालमत्ता कराची वसुली करण्यासाठी महानगरपालिकेकडून पुढील काळातही अशा प्रकारची कारवाई सुरू राहण्याचे संकेत महानगरपालिका प्रशासनाने दिले आहेत.

## ऑनलाइन चक्री जुगारावर गुन्हे

पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी शहरातील अवैध धंद्यांविरोधात प्रभावी कारवाई करण्याचे आदेश गुन्हे शाखेला दिले आहेत. त्यानुसार गुन्हे शाखेच्या युनिट क्रमांक २ ला बुधवारी जवाहर गेट परिसरातील 'मनीष बॅग' या बंद दुकानात ऑनलाइन चक्री जुगार सुरू असल्याची माहिती मिळाली. त्यावरून पथकाने तेथे छापा टाकला. कारवाईदरम्यान दुकानातील टीव्ही स्क्रीनवर ऑनलाइन संकेतस्थळाच्या माध्यमातून चक्री जुगाराचा खेळ सुरू असल्याचे पोलिसांना आढळून आले. पैशांची देवाणघेवाण करून जुगार खेळविणाऱ्या विजय अंबादास भगत (वय ४२, रा. भाजीबाजार) आणि सुरज रमेशराव गवई (वय ३६, रा. खडकारीपुरा) या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांच्याकडून रोख रक्कम, मोबाइल व ऑनलाइन जुगाराचे साहित्य असा ४४ हजार ७४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी खोलापुरी गेट पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये कलम ४ व ५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## देशी दारू विक्रीवरही

उपायुक्त (मुख्यालय/गुन्हे) प्रांजली सोनवणे आणि सहायक पोलीस आयुक्त निलेश ब्राम्हणे यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर व पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही कारवाई केली.

## 'पाणी टंचाई क्षेत्र' घोषित

अहवालानुसार जिल्ह्यातील अनेक विहिरींमधील पाणी पातळीत मोठी घट झाल्याचे समोर आले आहे. त्यामुळे सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांवर प्रतिकूल परिणाम होऊ नये, यासाठी महत्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. यात अधिसूचित गावे, वाड्यांच्या प्रभाव क्षेत्रात किंवा सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतापासून १ किलोमीटर अंतराच्या आत असलेल्या सर्व विहिरी व विंधन विहिरी (बोअरवेल) यामधील पाण्याचा वापर फक्त पिण्यासाठीच करता येईल. पिण्याव्यतिरिक्त शेती, उद्योग किंवा इतर व्यावसायिक कामांसाठी या विहिरींमधून पाणी काढण्यावर कठोर निर्बंध लादण्यात आले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी उपविभागीय अधिकारी, सर्व तहसीलदार आणि ग्रामीण पाणीपुरवठा विभागाला निर्बंधाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत.

## सात एकरातील सोयाबीनच्या

नुकसान झाल्याची घटना तिवसा पोलीस स्टेशन हद्दीत येणाऱ्या शेंदुरजना बाजार शेत शिवारात मंगळवारी रात्रीच्या सुमारास घडली.ज्यामुळे शेतकऱ्याचे अश्रू अनावर झाले.

सचिन सुभाषराव वानखडे रा. तिवसा असे नुकसान झालेल्या शेतकऱ्याचे नांव आहे.सचिन वानखडे यांचे शेंदुरजना बाजार येथे पाच एकर मालकीचे शेत असून दोन एकर शेत त्यांनी मक्त्याने केले होते.दोन दिवसापूर्वी सर्व शेतातील सोयाबीन सोगून तीन गंज्या लावल्या असताना रात्री दहा ते अकरा वाजता दरम्यान एका अज्ञात व्यक्तीने शेतातील तिन्ही सोयाबीनच्या गंजीला आग लावून पेटविल्या. ज्यामुळे त्यांचे चार लाख रुपयाचे नुकसान झाले. तिवसा पोलीस घटनास्थळाचा पंचनामा करत अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल केला आहे.सोयाबीन गंज्या पेटल्याची माहिती शहरात पसरताच नागरिकांनी पाहण्यासाठी मोठी गर्दी केली होती.

नुकसानग्रस्त शेतकऱ्याच्या तक्रारीवरून अज्ञात विरोधात गुन्ह्याची घेण्यात आली आहे.फॉरेन्सिक टीम व इतर चौकशीच्या अनुषंगाने पुढील तपास सुरु आहे.

**-गोपाल उपाध्याय,** पोलीस निरीक्षक तिवसा.

## -ज्ञानेश कुमारांच्या विरोधात

जिल्हाध्यक्ष राहुल येवले, चिखलदरा तालुका अध्यक्ष संदीप मुंडे, आदिवासी सेल अध्यक्ष महैपतसिंग उईके, कमलेश राठोड, नौशाद शेख, अक्षय घुमावरे, पंकज आमोदे आदी उपस्थित होते.

## निवडणूक आयोगाविरोधात

घटक पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन अमरावती जिल्हा काँग्रेस कमिटी (ग्रामीण)चे अध्यक्ष अनिरुद्ध उर्फ बबलू देशमुख यांनी केले आहे.

## सेंट्रल किचन बंद होताच

योग्य प्रमाणात सकस आहार मिळणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे.

आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी सकाळचा नाश्ता, दुपारचे जेवण आणि रात्रीचे जेवण यासोबतच दूध, अंडी, फळे आदी पोषणयुक्त पदार्थ देण्याची व्यवस्था असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे सध्या ही व्यवस्था कोणाकडूनही राबवली जात असली तरी नियमावलीनुसार विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात किती आणि काय दिले जाते, याची काटेकोर तपासणी होणे गरजेचे आहे.

### अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित होणार का?

आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या आहाराची गुणवत्ता, प्रमाण आणि नियमितता तपासण्याची जबाबदारी संबंधित प्रकल्प कार्यालयाचे विस्तार अधिकारी, मुख्याध्यापक आणि शालेय अधीक्षक यांच्यावर आहे. त्यामुळे सेंट्रल किचन बंद झाल्यानंतर नव्याने सुरू झालेल्या जेवण व्यवस्थेची त्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून नियमांचे पालन होत आहे की नाही, याची खात्री करणे आवश्यक आहे.

## ध्वनी प्रदूषण करणाऱ्या ३४ गणेश

काढल्या. उत्सवाचा जल्लोष आणि भक्तीचा उत्साह कायम असतानाच ध्वनी प्रदूषणाच्या नियमांचे उल्लंघन झाल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. त्यानंतर नियमभंग करणाऱ्या मंडळांची नोंद घेऊन त्यांच्यावर कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली. उत्सव हा श्रद्धेचा आणि सामाजिक एकोप्याचा असतो; मात्र त्याच्या नावाखाली ज्येष्ठ नागरिक, रुग्ण, विद्यार्थी, लहान मुले तसेच परिसरातील नागरिकांच्या शांततेवर अतिक्रमण होऊ नये, ही सामूहिक जबाबदारी आहे. त्यामुळे 'उत्सवाचा उत्साह असावा; पण कायद्याचा भंग नको', हा संदेश पोलिसांच्या कारवाईतून अधोरेखित झाला आहे. गणेशोत्सवात नियम मोडणाऱ्या ३४ मंडळांना नोटिसा बजावून पोलिसांनी आगामी दुर्गोत्सवासाठी स्पष्ट संदेश दिला आहे. आता दुर्गा मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनीही या इशाऱ्याची गांभीर्याने दखल घेऊन उत्सव भक्तिभावाने, शिस्तीत आणि ध्वनी प्रदूषणमुक्त वातावरणात साजरा करणे अपेक्षित आहे.

**चौकशीची जाहिर नोटीस**

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अमरावती विभाग, अमरावती.**

[illegible]

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ गुरुवार, ८ ऑक्टोबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## वाशिम पोलिसांचा गांजा तस्करांवर दुहेरी दणका

### एकाच दिवशी ४६९ किलो गांजा जप्त; दोन वाहनांसह तब्बल २ कोटी ६४ लाख ५० हजारांचा मुद्देमाल हस्तगत

■ प्रतिनिधी | कारंजा ■

अमली पदार्थांच्या तस्करीविरोधात वाशिम पोलिसांनी धडाकेबाज कारवाई करत गांजाची मोठी खेप पकडली आहे. ६ ऑक्टोबर रोजी अवघ्या काही तासांच्या अंतराने करण्यात आलेल्या दोन स्वतंत्र कारवायांमध्ये तब्बल ४६९ किलो गांजा जप्त करण्यात आला. या कारवाईत गांजाची वाहतूक करणारी दोन वाहनेही ताब्यात घेण्यात आली असून, जप्त मुद्देमालाची एकूण किंमत २ कोटी ६४ लाख ५० हजार रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

पोलिस अधीक्षक निखेश खाटमोडे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अमली पदार्थ तस्करीविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेला या कारवाईमुळे मोठे यश मिळाले आहे.

**पहिल्या कारवाईत १२६ किलो गांजा**

६ ऑक्टोबर रोजी पहाटे सुमारे ५ वाजता ते ५.१५ वाजताच्या दरम्यान समृद्धी महामार्गावरील माळेगाव परिसरात पोलिसांनी संशयावरून एका महिंद्रा मॅक्स पिकअप वाहनाची तपासणी केली. पोलिसांनी वाहन थांबवून झडती घेतली असता त्यामध्ये तब्बल १२६ किलो गांजा आढळून आला. या गांजाची किंमत सुमारे ७३ लाख २७ हजार रुपये, तर गांजा वाहतुकीसाठी वापरलेले वाहन सुमारे ७ लाख ३२ हजार रुपये किमतीचे असल्याने या कारवाईत एकूण ८० लाख ५९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी माळेगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे देण्यात आला आहे.



**कारंजात दुसरी मोठी कारवाई; ३४३ किलो गांजा जप्त**

दरम्यान, मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे कारंजा शहर पोलिस व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ६ ऑक्टोबर रोजी सकाळी सुमारे १० वाजता समृद्धी महामार्ग परिसरात संशयित वाहनाची तपासणी केली. यावेळी आयशर ट्रक क्रमांक एमएच ०४ जेके २४४६ थांबवून चालकाची चौकशी करण्यात आली. चालकाने आपले नाव सुनील गणपतराव सूर्यवंशी, रा. लातूर असे सांगितले. वाहनाची तपासणी केली असता कॅबिनमध्ये लपवून ठेवलेला तब्बल ३४३ किलो गांजा पोलिसांच्या हाती लागला. या गांजाची अंदाजे किंमत १ कोटी ७१ लाख ५० हजार रुपये, तर गांजा वाहतुकीसाठी वापरण्यात आलेल्या आयशर ट्रकची किंमत ३० लाख रुपये असल्याने या कारवाईत तब्बल २ कोटी १ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**तस्करांच्या नेटवर्कचा पर्दाफाश होण्याची शक्यता**

या दोन्ही कारवायांमध्ये मिळून ४६९ किलो गांजा आणि दोन वाहने जप्त करण्यात आली आहेत. एकूण २ कोटी ६४ लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे. दोन्ही प्रकरणांमध्ये स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले असून, गांजा कुठून आणण्यात आला, तो नेमका कुठे पोहोचविण्यात येणार होता आणि या तस्करीमागे कोणते मोठे रॅकेट कार्यरत आहे, याचा तपास सुरू आहे.

या धडक कारवाईमुळे समृद्धी महामार्गाचा वापर करून अमली पदार्थांची वाहतूक करणाऱ्या तस्करांचे धाबे दणाणले असून, तस्करीच्या मोठ्या नेटवर्कचा पर्दाफाश होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## कत्तलीसाठी बांधलेले ९ गोवंश पोलिसांनी सोडवले!

■ प्रतिनिधी | अकोला ■

कत्तलीच्या उद्देशाने पाय आणि तोंड दोरीने घट्ट बांधून ठेवलेल्या ९ गोवंशीय जनावरांना स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई करीत जीवदान दिले. पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत बुधवारी (७ ऑक्टोबर) सकाळी ताजनापेठेतील मच्छी मार्केट परिसरात ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी ९ गोवंशीय जनावरे ताब्यात घेतली असून त्यांची अंदाजे किंमत २ लाख १५ हजार रुपये आहे.

एलसीबीच्या पथकाला गोपनीय बातमीदाराकडून ताजनापेठ परिसरात गोवंशीय जनावरांना कत्तलीसाठी बांधून ठेवल्याची माहिती मिळाली. माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखा आणि रामदासपेठ पोलिसांच्या पथकाने तत्काळ घटनास्थळी धाव घेत छापा टाकला. यावेळी ९ गोवंशीय जनावरांचे पाय व तोंड दोरीने घट्ट बांधून ठेवल्याचे आढळून आले.

पोलिसांनी विलंब न करता जनावरांच्या अंगावरील दोऱ्या सोडवून त्यांची सुटका केली. त्यानंतर सर्व जनावरांची वैद्यकीय तपासणी करून सुरक्षेच्या दृष्टीने त्यांना गोशाळेत पाठविण्यात आले. या प्रकरणी शेख हुसेन शेख मुरसा (५५, रा. खिडकीपुरा, जुने शहर, अकोला) याच्याविरुद्ध रामदासपेठ पोलिस ठाण्यात महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा कलम ५(अ), ५(ब), ९ तसेच प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम कलम ११ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास रामदासपेठ पोलिस करीत आहेत.



**ताजनापेठेतील मच्छी मार्केट परिसरात एलसीबीची धडक; २.१५ लाखांचा मुद्देमाल जप्त, एकावर गुन्हा**

ही कारवाई पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलिस अधीक्षक बी. रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक नितीन लेव्हरकर आणि रामदासपेठ पोलिस ठाण्याचे ठाणेदार शिरीष खंडारे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

कारवाईत निलेश देशमुख, गोपाल जाधव, विष्णु बोडखे, माजीद पठाण, अनिल चव्हाण, पोलिस अंमलदार शेख हसन, उमेश पराये, सुलतान पठाण, फिरोज खान, अमीत दुबे, अब्दुल माजिद, रविंद्र खंडारे, महेंद्र मलिये, किशोर सोनवणे, मंगेश इंगळे, वसीमोद्दीन, एजाज अहमद, स्वप्नील खेडकर, श्रीकांत पातोंड, अन्सार अहमद, राज चंदेल, आकाश मानकर, धिरज वानखडे, पवन डांबलकर, अभिषेक पाठक, अशोक सोनवणे तसेच चालक प्रविण कश्यप, रामकिसन डोईफोडे, मनिष ठाकरे, प्रकाश लोखंडे यांचा सहभाग होता. रामदासपेठ पोलिस ठाण्यातील श्याम मोहळे, दादाराव टापरे, अभिजित इंगळे, प्रेम नांदोकर आणि अनिल धनभर यांनीही कारवाईत सहभाग घेतला.

## वन्यजीव सप्ताहानिमित्त चित्रकला व निबंध स्पर्धेचे आयोजन



■ प्रतिनिधी | वाशिम ■

वन्यजीवांचे संरक्षण, जैवविविधतेचे संवर्धन आणि निसर्गाप्रती विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय हरित सेना, एस.एम.सी. इंग्लिश स्कूल, वाशिम आणि सामाजिक वनीकरण वनपरिक्षेत्र, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने वन्यजीव सप्ताहानिमित्त चित्रकला व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. ७ ऑक्टोबर २०२६ रोजी शाळेच्या प्रांगणात या स्पर्धा उत्साहात पार पडल्या.

दरवर्षी १ ते ७ ऑक्टोबर हा कालावधी वन्यजीव सप्ताह म्हणून साजरा केला जातो. या सप्ताहाचे औचित्य साधून इयत्ता ५ वी ते ७ वीच्या विद्यार्थ्यांसाठी चित्रकला, तर इयत्ता ८ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा घेण्यात आली. कारणे आणि उपाय', 'वन्यजीवांचे संरक्षण आणि पर्यावरणाचा समतोल', 'जैवविविधता संवर्धनात वन्यजीवांचे महत्त्व', 'जंगलतोड आणि वन्यजीवांचे अस्तित्व', 'वन्यजीव संवर्धनात विद्यार्थ्यांची भूमिका', 'वन्यजीवांचे संरक्षण : संधी आणि पर्यावरणीय जबाबदारी', 'बदलते हवामान आणि वन्यजीवांवरील परिणाम' तसेच 'वन्यजीव वाचले तरच निसर्ग वाचेल' हे विषय देण्यात आले होते.

## दापुरा बु. येथील स्टेट बँक शेतकऱ्यांना कर्ज देण्यास टाळाटाळ!

### १२ ऑक्टोबरपासून आमरण उपोषणाचा इशारा!

■ प्रतिनिधी | मानोरा ■

तालुक्यातील दापुरा बु येथील स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेच्यावतीने शेतकऱ्यांना पीक कर्ज देण्यास टाळाटाळ करीत असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या विरोधात दि. १२ ऑक्टोबर २०२६ रोजी सोमवारपासून बँकेच्या प्रांगणात आमरण उपोषणाला बसणार असल्याचा इशारा माजी पंचायत समिती सदस्य मधुसूदन गोपीचंद राठोड यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे दिला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, मी दि. २८ सप्टेंबर २०२६ रोजी जिल्हाधिकारी साहेबांना निवेदन देऊन कळविले होते, परंतु आजपर्यंत शाखाधिकारी, स्टेट बँक दापुरा यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही. आज रोजी शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. काही शेतकऱ्यांचे महिंद्रा होम फायनान्स सेटल झाले असून, शेतकऱ्यांवर कोणतेही कर्ज नसताना सुद्धा स्टेट बँक शेतकऱ्यांना कर्ज देण्यास टाळाटाळ करीत आहे. या गंभीर बाबीची तात्काळ पूर्तता करून शेतकऱ्यांना पीक कर्ज देण्यात यावे. अन्यथा सोमवार वेळ सकाळी ११.३० वाजता कोणत्याही प्रकारचे अन्नपाणी न घेता आमरण उपोषण स्टेट बँक शाखा दापुरा बु. च्या प्रांगणात बसणार आहे. या प्रसंगी माझ्या जिवाचे काही बरेवाईट झाल्यास याची सर्व जबाबदारी शासन व स्टेट बँक कर्मचारी अधिकारी यांची राहील, याची नोंद घ्यावी, असे निवेदनात म्हटले आहे.



या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस कृषिमंत्री दत्तामामा भरणे, तहसीलदार, स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा दापुराचे शाखाधिकारी, ठाणेदार यांना देण्यात आल्या आहेत.

## आंतर-महाविद्यालयीन महिला कुस्ती स्पर्धेत साळुंकाबाई राऊत महाविद्यालयाची दमदार कामगिरी



■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

अमरावती येथील राम मेघे इन्स्टिट्यूटमध्ये सुरू असलेल्या संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या आंतर-महाविद्यालयीन महिला कुस्ती स्पर्धेत मंगरुळपीर तालुक्यातील वनोजा येथील श्रीमती साळुंकाबाई राऊत कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी उल्लेखनीय कामगिरी केली. महाविद्यालयाच्या खेळाडूंनी पाच सुवर्ण, एक रौप्य आणि एक कांस्य अशी एकूण सात पदके पटकावत महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. ५९ किलो वजनगटात कु. प्रेरणा अरुडकर, ५५ किलो वजनगटात कु. भारती टेकाडे, ५७ किलो वजनगटात कु. कविता राठोड, ६२ किलो वजनगटात कु. अंजली कोतरवार आणि ६५ किलो वजनगटात कु. साक्षी गायकवाड यांनी प्रतिस्पर्ध्यांवर मात करत सुवर्णपदक पटकावले. तसेच ५० किलो वजनगटात कु. प्रीती वानखडे हिने रौप्यपदक, तर ५३ किलो वजनगटात कु. यशस्वी गवारगुरु हिने कांस्यपदक मिळविले. या उल्लेखनीय कामगिरीसाठी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या कुस्ती केंद्राचे संचालक पैलवान राजेंद्र गोतमारे, डॉ. सागर नारखेडे आणि डॉ. चंद्रशेखर कडू यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## प्राणघातक हल्ल्याच्या गुन्ह्यात कलम १०९(१) वाढवून आरोपींना अटक करा

### पोलीस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे राजू कोंघे यांची मागणी; ६२ टाके पडल्याचा अर्जात दावा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशीम ग्रामीण पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या प्राणघातक हल्ल्याच्या गुन्ह्यात भारतीय न्याय संहितेचे कलम १०९(१) वाढवून आरोपींना तत्काळ अटक करावी, अशी मागणी तोंडगाव येथील राजू रविंद्र कोंघे यांनी पोलीस अधीक्षकांकडे ६ ऑक्टोबर रोजी दिलेल्या निवेदनातून केली आहे.

या निवेदनात नमूद केल्यानुसार, १२ सप्टेंबर २०२६ रोजी आपल्यावर प्राणघातक हल्ला झाल्याची फिर्याद कोंघे यांनी वाशीम ग्रामीण पोलीस ठाण्यात दिली होती. त्या फिर्यादी वरून गुन्हा क्रमांक ५०२/२०२६ दाखल करण्यात आला असून, भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांनुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे. मात्र, हल्ल्यावेळी आरोपींच्या हातात कोयते व कुऱ्हाडी यांसारखी शस्त्रे होती आणि जिवे मारण्याच्या उद्देशानेच हल्ला करण्यात आल्याचे त्यांनी निवेदनात म्हटले आहे.



हल्ल्यात आपल्या डोक्याला १०, गालाला १८, उजव्या हाताला १० आणि पाठीला २४ टाके असे एकूण ६२ टाके पडल्याचा दावा कोंघे यांनी केला आहे. प्रकृती गंभीर असल्याने वाशीम येथून अकोला येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात सिटी स्कॅन व एक्स-रे साठी दाखल करण्यात आल्याचेही या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणात अद्याप कलम १०९ (१) वाढविण्यात आले नसल्याने तसेच आरोपींना अटक करण्यात आलेली नसल्याने आपल्या जीवितास धोका असल्याचे कोंघे यांनी म्हटले आहे.

## मुख्यमंत्री सौर ऊर्जा वाहिनी बंद ठेवा!

### अन्यथा बेमुदत आमरण उपोषणाचा इशारा!

■ प्रतिनिधी | मानोरा ■

तालुक्यातील मौजा खांबाळा येथील प्रलंबित मागण्या पूर्ण न झाल्या नाहीत, त्यामुळे मागण्या पूर्ण होईपर्यंत २१ ऑक्टोबर रोजी बेमुदत आमरण उपोषण तहसील कार्यालयावर करण्याच्या इशाऱ्यांचे निवेदन तहसीलदार राजेंद्र पाटील यांना खांबाला येथील विष्णू आकातराव ससाणे आणि विजय विठ्ठल मस्के यांनी दिले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, दि. २४ डिसेंबर २०२५ पासून विविध प्रकारे मागण्या करिता अर्ज दिले आहेत. परंतु १० महिने उलटून गेले तरी अत्यंत खेदाने नमूद करावे लागते की, मुख्यमंत्री सौरऊर्जा वाहिनी धोरण राबविलेले आमच्या गावचे आदिवासी बेरोजगार युवक, ऑपरेटर कर्मचारी म्हणून घेण्यात यावा, सौर ऊर्जा ग्रा.पं. मध्ये जमा होणारी ५ लाख रुपये रक्कम त्वरीत देण्यात यावे, खांबाळा-शेंदुरजना सौर ऊर्जेची लाईन गावठाण व ए.जी.ची लाईन देण्यात यावी, मेघा कंपनीच्या कर्मचारी सोबत विचारणी केल्यास किंवा काही माहिती विचारल्यास आम्हास कोणताही प्रतिसाद देत नाही. मनमर्जीने कामे करतात. या मागण्यांकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने अखेर येणाऱ्या दि. २१ ऑक्टोबर रोजी तहसील कार्यालय येथे बेमुदत आमरण उपोषण करणार असल्याचे निवेदनात नमूद केले आहे. या निवेदनाच्या प्रती महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी येथेही देण्यात आल्याचे निवेदनात नमूद केले आहे.

## इनरव्हील क्लब ऑफ अकोलाचा सेवा उपक्रम

**अकोला :** सामाजिक व मानवी सेवा कार्यात सक्रिय असणाऱ्या महिलांच्या इनरव्हील क्लब ऑफ अकोला च्या वतीने विविध सेवाभावी उपक्रम राबविण्यात येत असून त्यास उस्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. क्लबच्या प्रकल्प प्रमुख समीना नजमी यांच्या वतीने नुकतेच दोन सेवाभावी प्रकल्प राबविण्यात आलेत. प्रथम प्रकल्प विद्यामंदिर प्रायमरी शाळेत साकार करण्यात आला. यात वर्ग पहिली ते चौथीच्या विद्यार्थीनींना फ्रॉक वितरित करण्यात आलेत. या नंतर विद्यामंदिर कन्या हायस्कूल मधील पाचवी ते सातवीच्या विद्यार्थीनींना फ्रॉक वितरित करण्यात आला. हा प्रकल्प नित्य नेमाने समीना नजमी आयोजित करीत आहेत.

## जिल्हा कारागृहात क्षयरोग, गुप्तरोग एड्स तपासणी शिबीर

■ प्रतिनिधी | वाशिम ■

दि. ६ ऑक्टोंबर रोजी जिल्हा कारागृह वाशीम येथे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ पांडुरंग ठोंबरे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ अनिल कावरखे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ सतीश परभणकर, कारागृह अधिक्षक गजानन सरोदे, वरिष्ठ तुरुंग अधिकारी मोहन पाटील, तुरुंग अधिकारी महेंद्रकुमार जोशी, वैद्यकिय अधिकारी डॉ विजय गोटे यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हा क्षयरोग केंद्राचे आरोग्य निरीक्षक रामदास गवई यांनी शिबिराचे नियोजन केले.


**Change In Name**

OLD NAME
**SYYED REHAN**
NEW NAME
**SYED REHAN**
**SYED UMAR.**
PASPOORT
NO. K1743354
**ADDRESS :** BARAD.
VIBHAG PARAS AT.
POST. PARAS
TQ. BALAPUR,
DIST. AKOLA
PIN CODE , 444109

**CHANGE OF NAME**

My name is Dilip Ashokkumar Keswani, not Dilipkumar Ashokkumar Keshwani. Therefore, my name should be considered as Dilip Ashokkumar Keswani.

Sing./Dilip A. Keswani


## निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्याची मागणी; शेतकऱ्यांना हेक्टरी १ लाखांची मदत द्या!

### अनिल देशमुख आक्रमक; ईव्हीएमऐवजी मतपत्रिकेवर निवडणुका घेण्याची मागणी, मदत न दिल्यास राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा

■ अकोला / वाशिम ■

निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार)चे ज्येष्ठ नेते तथा माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी केंद्र सरकारवर जोरदार निशाणा साधला. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा, तसेच आगामी निवडणुका ईव्हीएमऐवजी मतपत्रिकेवर घ्याव्यात, अशी मागणी देशमुख यांनी पत्रकार परिषदेत केली.





पत्रकारांशी संवाद साधताना देशमुख यांनी निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित केले. आयोगातील इतर आयुक्तांची मते आणि कायदेशीर आक्षेप बाजूला सारून निर्णय घेतले जात असल्याचा आरोप त्यांनी केला. ईव्हीएम आणि मतदार याद्यांबाबत निर्माण झालेल्या प्रश्नांमुळे जनतेचा आणि राजकीय पक्षांचा निवडणूक आयोगावरील विश्वास कमी होत असल्याचे ते म्हणाले. देशमुख यांनी यावेळी चार प्रमुख मागण्या मांडल्या. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी तातडीने राजीनामा द्यावा, त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा, संपूर्ण एसआयआर प्रक्रिया रद्द करावी आणि आगामी सर्व निवडणुका मतपत्रिकेवर घेण्यात याव्यात, अशी मागणी त्यांनी केली.

**दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी लाखाची मदत द्या**

महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीवरूनही देशमुख यांनी राज्य सरकारला धारेवर धरले. पावसातील खंडामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून बळीराजा आर्थिक संकटात सापडला आहे. सरकारने दुष्काळ जाहीर केला असला तरी शेतकऱ्यांना प्रत्यक्षात किती आणि कोणत्या स्वरूपाची मदत मिळणार, याबाबत अद्याप स्पष्टता नसल्याचे त्यांनी म्हटले.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार)चे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी राज्य सरकारकडे मांडलेल्या १७ तातडीच्या मागण्यांचा संदर्भ देत देशमुख म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना सरसकट मदत देण्याचे जाहीर केले आहे. त्यामुळे पंचनाम्यांच्या औपचारिकतेत वेळ न घालवता तीन हेक्टरपर्यंत प्रतिहेक्टरी एक लाख रुपये सरसकट मदत देण्याचा निर्णय तातडीने घ्यावा.

**मदत न दिल्यास राज्यभर आंदोलन**

शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे सरकारने दुर्लक्ष केल्यास राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार)च्या वतीने राज्यभर तीव्र आणि आक्रमक आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा अनिल देशमुख यांनी दिला. निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता आणि दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तातडीची मदत, या दोन्ही मुद्द्यांवर पक्ष आक्रमक भूमिका घेणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

***अकोला व वाशिम दोन्ही जिल्ह्यात पत्रकारांशी साधला संवाद***

*राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते माजी गृहमंत्री अनिल बाबू देशमुख यांनी आपल्या अकोला व वाशिम जिल्ह्याच्या दौऱ्यात पदाधिकाऱ्यांशी संवाद साधत पक्ष संघटनेचा आढावा घेतला.*

*सोबतच दोन्ही जिल्ह्यात पत्रकार परिषद घेत पत्रकारांशी सुद्धा संवाद साधत या सर्व मुद्द्यांवर तीव्र नाराजी व्यक्त करीत आगामी काळात या दोन्ही मुद्द्यांवर सरकारने पावले उचलली नाही तर आक्रमक भूमिका पक्ष घेणार असल्याबाबत त्यांनी स्पष्ट संकेत दिले.*

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३११ ■ गुरुवार, ८ ऑक्टोबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## आपटीत संबंधांच्या वादातून लोखंडी पाईपने मारहाण करून हत्या

### दोघे आरोपी गजाआड

**पुलगाव जनमाध्यम :** अनैतिक संबंधाच्या संशयातून झालेल्या वादाचे पर्यवसान थेट हत्येत झाल्याची धक्कादायक घटना ७ ऑक्टोबर रोजी सकाळी आपटी परिसरात घडली. गिरीश पद्माकर कोल्हे (वय ४८) आणि अविनाश जनार्दन कोल्हे(वय ४३) यांनी नागसेन मारोतराव भगत (वय ४५) यांना लोखंडी पाईपने मारहाण केल्याने ते गंभीर जखमी झाले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी पुलगाव पोलिसांनी दोन्ही संशयितांना अटक केली आहे.



मृतक - नागसेन भगत ! आरोपी - गिरीश कोल्हे ! अविनाश कोल्हे

आपटी येथील नागसेन भगत यांचे एका महिलेसोबत संबंध असल्याच्या कारणावरून त्यांचा गिरीश व अविनाश कोल्हे यांच्याशी वाद सुरू होता. याच कारणावरून दोघांनी त्यांना यापूर्वी समज दिल्याचे सांगण्यात येते. मात्र, संबंध सुरू असल्याच्या कारणातून बुधवारी सकाळी ८ ते ९ वाजताच्या सुमारास पुलगाव-आपटी मार्गावरील हनुमान मंदिराजवळ नागसेन यांच्याशी दोघांचा वाद झाला. वाद वाढल्यानंतर लोखंडी पाईपने त्यांच्यावर हल्ला करण्यात आला.

या हल्ल्यात नागसेन यांच्या डोक्यासह शरीराच्या विविध भागांवर गंभीर दुखापत झाली. त्यांना तातडीने पुलगाव येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी सावंगी मेघे येथील रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

### एसपींकडून घटनास्थळाची पाहणी

हत्येच्या घटनेची माहिती मिळताच पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. वंदना कारखेले यांनी घटनास्थळ गाठून घटनास्थळाची बारकाईने पाहणी केली. तर घटनास्थळी पोहोचलेल्या फॉरेन्सीकच्या चमूने घटनास्थळावरून रक्तमिश्रीत माती, साधी माती व इतर नमुने घेत ते विश्लेषणासाठी पाठविले.

### अवघ्या काही तासांत आरोपीस बेड्या

घटनेची माहिती मिळताच पुलगाव पोलिस ॲक्शन मोडवर आले. पोलिसांनी संबंधित प्रकरणातील आरोपींचा घटनेनंतर अवघ्या काही तासांत शोध घेत त्यांना ताब्यात घेत अटक केली. ही कामगिरी सहाय्यक पोलिस निरीक्षक नितीन मदनकर, विनोद राघाटाटे, संदीप बोरबन, सोमित गनथाडे, अजय अनंतवार, अमोल बरडे यांनी कारवाई केली.

## फ्रिजच्या कॉम्प्रेसरचा स्फोट; घराला आग

### दोन गॅस सिलिंडरांमुळे धोका वाढला; अग्निशमन दलाच्या सतर्कतेने मोठा अनर्थ टळला

**देवळी जनमाध्यम :** शहरातील नगरपरिषद लेआऊट परिसरात फ्रिजच्या कॉम्प्रेसरचा अचानक स्फोट होऊन घराला आग लागल्याची घटना बुधवारी दुपारी घडली. आगीत घरातील दागिने, कपाट, गाद्या, दिवाण, दरवाजे, पंखे, कपडे आणि अन्य जीवनावश्यक साहित्य जळून खाक झाले. या घटनेत सुमारे ३ लाख रुपयांचे नुकसान झाले. सुदैवाने घटनेच्या वेळी घरात कोणीही नसल्याने जीवितहानी टळली.

नगरपरिषद लेआऊटमध्ये पांडुरंग जगोबा लेंडे यांच्या घराच्या दुसऱ्या माळ्यावर सचिन भास्कर वैद्य हे भाड्याने राहतात. बुधवारी दुपारी सुमारे २.३० वाजता घरातील फ्रिजच्या कॉम्प्रेसरचा अचानक स्फोट झाला. मोठा आवाज झाल्यानंतर घरातून धुराचे लोट बाहेर येत असल्याचे घरमालकाच्या निदर्शनास आले. त्यांनी तत्काळ देवळी नगरपरिषदेच्या अग्निशमन विभागाला माहिती दिली.

माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान बंबासह घटनास्थळी दाखल झाले. जवानांनी पाण्याचा मारा करीत आगीवर नियंत्रण मिळविले. मात्र, घटनास्थळीच दोन गॅस सिलिंडर ठेवलेले असल्याने धोका अधिक गंभीर होता. आग सिलिंडरपर्यंत पोहोचण्यापूर्वी जवानांनी प्रसंगावधान राखत दोन्ही सिलिंडर सुरक्षितपणे बाहेर काढले. त्यामुळे मोठा अनर्थ टळला.

आगीत घरातील साहित्याचे मोठे नुकसान झाले. अग्निशमन विभागाचे अभिषेक काळे, अकिल फारुखी, आसिफ शेख आणि अक्षय क्षीरसागर यांनी आग नियंत्रणात आणण्यासाठी विशेष प्रयत्न केले.



## गौवंश तस्करीचा डाव पोलिसांनी हाणून पाडला

### २२ जनावरांसह १६.४० लाखांचा मुद्देमाल जप्त ; चालक पसार



**हिंगणघाट जनमाध्यम :** नागपूर जाम मार्गावरून हिंगणघाटकडे दाटीवाटीने गौवंशाची अवैध वाहतूक करणाऱ्या मालवाहू वाहनावर हिंगणघाट पोलिसांनी बुधवारी रात्री धडक कारवाई केली. पोलिसांची चाहूल लागताच चालक वाहन सोडून पसार झाला. वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये तब्बल २२ गौवंश कोंबून नेले जात असल्याचे उघड झाले. पोलिसांनी सर्व जनावरांची सुटका करून वाहनासह एकूण १६ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

हिंगणघाट पोलिस ठाण्याचे अधिकारी आणि अंमलदार रात्रीच्या गस्तीवर असताना त्यांना गौवंशाची अवैध वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी नागपूर जाम मार्गावर लक्ष केंद्रित केले. हिंगणघाटकडे येणारे संशयित मालवाहू वाहन दिसताच पोलिसांनी थांबण्याचा इशारा केला. मात्र, चालकाने वाहन काही अंतरावर थांबवून अंधाराचा फायदा घेत घटनास्थळावरून पळ काढला.

पोलिसांनी वाहनाची झडती घेतली असता २२ जनावरे अत्यंत दाटीवाटीने भरलेली आढळली. जनावरांची निर्दयीपणे वाहतूक होत असल्याने पोलिसांनी त्यांची सुटका केली.

याप्रकरणी हिंगणघाट पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पसार चालकाचा शोध सुरू आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे, उपविभागीय पोलिस अधिकारी सुशिलकुमार नायक आणि पोलिस निरीक्षक अनिल राऊत यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली.

## समृद्धी अपघातग्रस्तांच्या कुटुंबांना तातडीचा आर्थिक आधार द्या

### मृतांच्या वारसांना १० लाख, गंभीर जखमींना ५ लाख, किरकोळ जखमींना २ लाखांची खा. अमर काळेंची मागणी

**वर्धा जनमाध्यम :** समृद्धी महामार्गावरील भीषण अपघातात सात नागरिकांचा मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या कुटुंबीयांना शासनाने तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी खासदार अमर काळे यांनी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. मृतांच्या वारसांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून प्रत्येकी १० लाख रुपये, गंभीर जखमींना ५ लाख रुपये आणि किरकोळ जखमींना २ लाख रुपये देण्याची मागणी त्यांनी पत्राद्वारे केली.



२ ऑक्टोबर रोजी पुलगाव-धामणगावदरम्यान समृद्धी महामार्गावर झालेल्या दुर्घटनेत सिंदी (मेघे) येथील नागरिकांचा मृत्यू झाला. दुर्गादेवीची मूर्ती घेऊन परतताना हा अपघात झाला. सात जणांचा मृत्यू, नऊ जण गंभीर तर सहा जण किरकोळ जखमी झाल्याचे खासदार काळे यांनी पत्रात नमूद केले आहे.

अपघातानंतर कुटुंबीयांवर आर्थिक संकट कोसळले असून, जखमींच्या उपचाराचा खर्चही मोठा आहे. त्यामुळे मदतीसाठी विलंब न करता निर्णय घ्यावा, अशी मागणी काळे यांनी केली आहे.

दरम्यान, काळे यांनी ३ ऑक्टोबर रोजी दिल्ली येथे असतानाही मृतांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांची विचारपूस केली. अपघाताचे नेमके कारण, वाहनाला महामार्गावर प्रवेश कसा मिळाला आणि सुरक्षा नियमांचे पालन झाले का, याची वस्तुनिष्ठ चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

## दुष्काळात रोजगार ठप्प; कामगारांचे हक्काचे पैसे तरी द्या

### दिवाळीपूर्वी प्रलंबित अनुदान खात्यावर जमा करा

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यात कोरड्या दुष्काळाची झळ बांधकाम कामगारांच्या संसारालाही बसली आहे. बांधकामाची कामे ठप्प झाल्याने रोजंदारी बंद झाली असून ग्रामीण भागात शेतीमजुरीचे पर्यायी कामही मिळेनासे झाले आहे. एकीकडे रोजगाराचा दुष्काळ आणि दुसरीकडे वर्षभरापासून हक्काचे अर्थसहाय्य प्रलंबित असल्याने बांधकाम कामगारांच्या कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवले आहे. त्यामुळे प्रलंबित अनुदान तातडीने मंजूर करून दिवाळीपूर्वी कामगारांच्या बँक खात्यावर जमा करण्याची मागणी स्वाभिमानी बांधकाम कामगार संघटनेने केली आहे.

संघटनेचे संस्थापक अध्यक्ष उमेश रा. अग्निहोत्री यांनी मुख्यमंत्री, कामगार मंत्री तसेच महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या सचिवांना निवेदन पाठवून ही मागणी केली आहे.

वर्धा जिल्ह्यातील नोंदणीकृत बांधकाम कामगारांचे शैक्षणिक अर्थसहाय्य, गंभीर आजाराचे अर्थसहाय्य, वैद्यकीय मदत, विविध अनुदाने आणि अन्य आर्थिक लाभांचे अर्ज सुमारे वर्षभरापासून प्रलंबित असल्याचे संघटनेने निवेदनात म्हटले आहे.

रोजगारच उपलब्ध नसताना मंडळाकडून मिळणारे हक्काचे अर्थसहाय्यही रखडल्याने कामगारांची आर्थिक कोंडी अधिकच वाढली आहे.

### दिवाळीपूर्वी विशेष मोहीम राबवा

दसरा आणि दिवाळीच्या पार्श्वभूमीवर मंडळाने वर्धा जिल्ह्यात प्रलंबित अर्जांसाठी विशेष मोहीम राबवावी. पात्र अर्जांची तातडीने छाननी करून मंजुरी द्यावी आणि लाभाची रक्कम थेट संबंधित कामगारांच्या खात्यावर जमा करावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.

प्रलंबित अर्जांची संख्या, मंजूर व नामंजूर अर्जांचा तपशील तसेच त्यावर झालेल्या कार्यवाहीची माहिती संघटनेला लेखी स्वरूपात द्यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

कामगारांच्या हाताला रोजगार नाही. अशा वेळी त्यांच्या हक्काचे अनुदानही प्रलंबित ठेवू नये. बांधकाम कामगारांच्या कुटुंबाची दिवाळी अंधारात जाऊ देऊ नका. पात्र कामगारांचे प्रलंबित अर्थसहाय्य दिवाळीपूर्वी त्यांच्या खात्यावर जमा करा, अशी ठाम मागणी उमेश रा. अग्निहोत्री यांनी केली आहे.

## आर्वीत 'सेवा ज्योती यात्रे'चा जल्लोष

### १२ तासांत भाजप कार्यकर्त्यांचे भव्य नियोजन; विकसित भारत संकल्प सभेत मोदींच्या २५ वर्षांच्या कार्याचा गौरव

**आर्वी जनमाध्यम :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मुख्यमंत्री ते पंतप्रधान अशा २५ वर्षांच्या सार्वजनिक जीवनाचा गौरव करण्यासाठी आर्वी विधानसभा क्षेत्रात 'विकसित भारत संकल्प सभा' आणि 'सेवा ज्योती यात्रा' उत्साहात पार पडली. अवघ्या १२ तासांत कार्यक्रमाचे नियोजन करून कार्यकर्त्यांनी मोठी उपस्थिती नोंदविल्याचा दावा आयोजकांनी केला.




कार्यक्रमाची सुरुवात भाजपा तालुकाध्यक्ष राजेंद्र ठाकरे यांच्या नेतृत्वातील बाइक रॅलीने झाली. त्यानंतर भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. आमदार सुमित वानखेडे, भाजपा नेते सुनील गफाट, विजय वाजपेयी, प्रशांत वानखेडे, नगराध्यक्षा स्वाती गुल्हाने यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. सुनील गफाट यांनी मोदी सरकारच्या विविध योजनांचा उल्लेख करत २५ वर्षांच्या सार्वजनिक जीवनाचा आढावा घेतला. थेट लाभ हस्तांतरण, मोफत धान्य, उज्ज्वला, स्वच्छ भारत, पीएम आवास यांसारख्या योजनांमुळे विकासाचा लाभ सामान्यांपर्यंत पोहोचल्याचे त्यांनी सांगितले. आमदार सुमित वानखेडे यांनी कार्यकर्त्यांच्या उत्साहाचे कौतुक केले. मोदींच्या नेतृत्वामुळे भाजपा जगातील मोठी राजकीय संघटना बनल्याचा दावा त्यांनी केला. यावेळी 'विकसित भारत'ची शपथ देण्यात आली.

गांधी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दुष्काळावर पथनाट्य सादर केले. तसेच भाजपा राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाषणाचे थेट प्रक्षेपण उपस्थितांनी पाहिले.

## सेवानिवृत्त न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या वतीने निवासी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**वर्धा जनमाध्यम :** दुय्यम न्यायालयांतील न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या सुधारित वेतनश्रेणीचा प्रस्ताव तब्बल २० महिन्यांपासून शासनदरबारी प्रलंबित असल्याच्या निषेधार्थ सेवानिवृत्त न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी आता आवाज उठविला आहे. या प्रलंबित प्रस्तावाला तातडीने मंजुरी देऊन न्यायालयीन कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, या मागणीसाठी सेवानिवृत्त न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या वतीने निवासी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

मुंबई उच्च न्यायालयाच्या विशेष समितीने समान कामाला समान वेतनाच्या धर्तीवर दुय्यम न्यायालयांतील कर्मचाऱ्यांसाठी सुधारित वेतनश्रेणीचा प्रस्ताव मंजूर करून राज्य शासनाकडे सादर केला आहे. मात्र, या प्रस्तावावर अद्याप निर्णय झालेला नसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. शासनाने या मागणीची तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.



या मागणीसाठी १७ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन तसेच ५ नोव्हेंबर रोजी अन्नत्याग करून साखळी उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

निवेदन देतेवेळी सेवानिवृत्त न्यायालयीन संघटनेचे अध्यक्ष विजय ठाकरे, विनोद कडू, अब्दुल खतीब, अविनाश भोळे, सुनील देशमुख, अरविंद वितोंडे, संजय देवगीरकर, देविदास चवरे यांच्यासह सेवानिवृत्त कर्मचारी उपस्थित होते. वर्ग तीनचे अध्यक्ष सतीश तांबूस्कर व सचिव संदीप मूळे यांचीही उपस्थिती होती.

## शिवाजी कॉलनीत आरोग्य शिबिर

### ३० वर्षांवरील नागरिकांची NCD तपासणी; विविध आजारांबाबत जनजागृती

**नाचणगाव जनमाध्यम :** आयुष्मान आरोग्य मंदिर नाचणगावच्या वतीने शिवाजी कॉलनी येथे 'सेवा संकल्प अभियान', 'माझे गाव आरोग्य संपन्न गाव' आणि '100 Days' कार्यक्रमांतर्गत आरोग्य शिबिर घेण्यात आले. शिबिरात ३० वर्षांवरील नागरिकांची असंसर्गजन्य आजारांसाठी ञ्ञ्‌ तपासणी करण्यात आली. उच्च रक्तदाब, मधुमेह तसेच कर्करोगाचे वेळेत निदान आणि नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व यावेळी समजावून सांगण्यात आले.



जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमन, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्निल बेले आणि तालुका आरोग्य अधिकारी डॉ. मोनाली मामीलवार यांच्या मार्गदर्शनाखाली प्राथमिक आरोग्य केंद्र नाचणगाव परिसरात आरोग्य शिबिरे व जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहेत. वैद्यकीय अधिकारी डॉ. ऋतुजा साखरकर यांनी नागरिकांना नियमित बीपी, शुगर व आवश्यक तपासण्या करून घेण्याचे आवाहन केले. आजार वाढल्यानंतर उपचार घेण्यापेक्षा वेळेत तपासणी करून प्रतिबंध करणे महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. शिबिरात अवयवदान व रक्तदानाचे महत्त्व सांगण्यात आले. '?निमिया मुक्त भारत' अभियानांतर्गत लोहयुक्त आहार, पोषण आणि रक्तक्षय प्रतिबंधाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच क्षयरोग व कुष्ठरोगाच्या लक्षणांबाबत जनजागृती करून संशयितांनी तातडीने आरोग्य संस्थेत तपासणी करून घेण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी डॉ. कांचन बाभूळकर, स्वाती धोंगडे, पल्लवी मोहरकर, प्रिया डोईफोडे, प्रसाद माळवे यांच्यासह आरोग्य विभागाचे कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

## शुल्क भरूनही ४२ फार्मसी विद्यार्थी परीक्षेपासून वंचित

### परीक्षा शुल्क विद्यापीठाकडे न भरल्याचा अभाविपचा आरोप

**आष्टी (शहीद) जनमाध्यम :** विद्यार्थ्यांकडून शुल्क वसूल करूनही ते विद्यापीठाकडे जमा न केल्यामुळे न्यू मॅनफोर्ट फार्मसी कॉलेजमधील ४२ विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिल्याचा आरोप अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने केला आहे. ७ ऑक्टोबर रोजी परीक्षा असतानाही प्रवेशपत्र उपलब्ध न झाल्याने विद्यार्थ्यांना परीक्षा देता आली नसल्याचे अभाविपने जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.



विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाकडे आवश्यक शुल्क भरले होते. मात्र, संबंधित परीक्षा शुल्क विद्यापीठाकडे वेळेत जमा न झाल्याने ही परिस्थिती निर्माण झाल्याचा दावा संघटनेने केला आहे. वर्षभर परीक्षेची तयारी केल्यानंतर ऐनवेळी परीक्षा देता न आल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे विद्यापीठाने तातडीने हस्तक्षेप करून विशेष परीक्षेची संधी द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. महाविद्यालयाकडून शुल्क घेतल्यानंतर पावत्या न देणे, अतिरिक्त शुल्क वसुली, आर्थिक व्यवहारात अनियमितता तसेच विद्यार्थ्यांवर दबाव आणल्याचे आरोपही निवेदनातून करण्यात आले आहेत. या सर्व आरोपांची प्रशासकीय चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, तसेच महाविद्यालयाची मान्यता व विद्यापीठ संलग्नीकरणाची चौकशी करावी, अशी मागणी अभाविपने केली आहे.

दरम्यान, या आरोपांबाबत महाविद्यालय प्रशासन व नागपूर विद्यापीठाची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही. चौकशीनंतरच वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे.


## जाहिर नोटिस

सर्व आम जनतेस सुचित करण्यात येते कि माझे पक्षकार जयंत पद्माकर थोटांगरे यांच्या मालकी व कब्जातील खालिल नमुद मालमत्ता आहे.

मालमत्तेचे वर्णन येणे प्रमाणेः मौजा पिंपळगांव (मा), मौजा नं. १०३, प.ह.कं. ३४ ता. हिंगणघाट, जि. वर्धा ग्राम पंचायत पिंपळगांव (मा) च्या हद्दितील शेत सर्वे कं. २१८/१/२१८/२ मधील प्लॉट कं. ८८ (२१८/१/२१८/२/८८ सातबाराप्रमाणे) ज्याची एकूण आराजी ४६.०० चौ. मी. म्हणजेच ४९४.९६ चौ. फुट व प्लॉट कं. ८९ (२१८/१/२१८/२/८९ सातबाराप्रमाणे) ज्याची एकूण आराजी ४८.८७ चौ. मी. म्हणजेच ५२५.८४ चौ. फुट. दोन्ही प्लॉट ची एकुण आराजी ९४.८७ चौ. मी. म्हणजेच १०२०.८० चौ. फुट इतकी असुन त्याची चतुःर्सिमा :-

पुर्वेसः प्लॉट कं. ७०,

पश्चिमेसः ९ मिटर रूंदीचा लेआउट रोड,

उत्तरेसः शेत सर्व्हे कं. २२०

दक्षिणेसः प्लॉट कं. ८७

वर नमुद मालमत्ता माझे पक्षकार ईक्वीटास स्माल फायनान्स बँक यांचेकडे गहाण ठेवून त्यावर रक्कम रू. २४,४०,०००/- चे कर्ज घेत आहे. वर नमुद मालमत्ता कोणत्याही बँकेकडे, कंपनीकडे अथवा संस्थेकडे गहाण असल्यास अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचा बोझा असल्यास तसेच कोणाचाही हक्क वा अधिकार असल्यास वा इतर काही भानगड असल्यास खालिल नमुद पत्यावर लेखी दस्तऐवजासह सदर नोटिस प्रकाशित झाल्यापासून ३ दिवसाच्या आत लेखी उजर नोंदवावा. त्यानंतर कोणाचाही आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही.

**ॲड. सचिन एस. कुरझडकर**
**साई नगर वर्धा**
**मो. नं. ९८६००४१३६१**

# भारत विकसित होईपर्यंत थकणार आणि थांबणार नाही, PM-CM म्हणून २५ वर्षांचा रेकार्ड






**वडनगर (गुजरात)/वृत्तसंस्था :** वी विल डू इट... आम्ही करून दाखवू.' पंतप्रधान मोदींनी बुधवारी त्यांच्या सार्वजनिक जीवनाच्या २५ वर्षांच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात ही घोषणा १९ वेळा दिली. आपल्या तासभराच्या भाषणात ते म्हणाले, 'जोपर्यंत भारताचा विकास होत नाही, तोपर्यंत मी थकणार नाही किंवा थांबणार नाही.' ते म्हणाले, 'मी महत्त्वाकांक्षेसाठी नाही, तर एका ध्येयासाठी जगतो. ज्यांनी मला खाली खेचले, त्यांनीच मला पुन्हा उभे राहायला शिकवले. ज्यांनी माझा विरोध केला, त्यांनीच मला लोकशाहीची शक्ती शिकवली.' ते म्हणाले की, २५ वर्षांकडे मागे वळून पाहताना, त्यांना कर्तृत्वापेक्षा अधिक कृतज्ञता वाटते. प्रत्येक घटनेने त्यांना काहीतरी शिकवले आणि नम्र राहायला शिकवले. त्यांनी देवाकडे प्रार्थना केली की त्यांची शिकण्याची इच्छा कधीही कमी होउ नये.

**दिल्लीतील श्री विनायक मंदिरात मोदी-** श्री विनायक मंदिर दिल्लीतील सरोजिनी नगर येथे आहे. पंतप्रधानांनी तेथे २५ मिनिटे पूजा आणि आरती केली. पंतप्रधान म्हणाले, 'भारताने प्रत्येक गोष्टीत आघाडीवर असले पाहिजे. तंत्रज्ञान, क्रीडा आणि उद्योग क्षेत्रात भारतीय ध्वज उंच फडकला पाहिजे. आज जगभरात भारतीय वैमानिकांची चर्चा होत आहे. एक दिवस असा येईल जेव्हा जग 'मेड इन इंडिया' विमानांबद्दल बोलेल. ही उद्दिष्ट्ये केवळ तेव्हाच साध्य होतील, जेव्हा आपण दूरदृष्टीची धोरणे आखू आणि परिश्रमपूर्वक काम करू.'

पंतप्रधान म्हणाले, 'आपल्या हृदयाच्या प्रत्येक ठोक्यात एकच संकल्प घुमायला नको का: आपण प्राचीन भारताचा गौरव पुन्हा जागृत केलाच पाहिजे? एकेकाळी भारताने जागतिक अर्थव्यवस्थेचे नेतृत्व केले. काळाचे चक्र बदलले, गुलामगिरीचे युग आले आणि भारताला लुटले व उद्ध्वस्त केले गेले. एकेकाळी जगाला मार्गदर्शन करणारी भारताची ग्रंथालये जाळली गेली. छोटी संकटे गंभीर झाली. दुष्काळ, अनेक संकटे आली, पण तरीही भारतमातेच्या मुलांचे धैर्य अढळ राहिले.'

पंतप्रधान मोदी म्हणाले, 'आज 'मेड इन इंडिया' फोन प्रचलित आहेत. भारतात पूर्वी वीजपुरवठा खंडित होण्याच्या बातम्या चर्चेत असायच्या, पण आज सौरउर्जा हा चर्चेचा विषय आहे. कृषी क्षेत्र हे त्याचेच एक उदाहरण आहे. स्वातंत्र्यानंतर जर कोणत्या दशकात कृषी क्षेत्राचा विकास दर सर्वाधिक राहिला असेल, तर ते दशक २०१५-२५ हे होते.'

ते म्हणाले, 'हे तेव्हाच घडते, जेव्हा हेतू स्पष्ट असतात आणि धोरणे स्पष्ट असतात. माझ्यासाठी 'सबका साथ, सबका विकास' हा सुशासनाचा आधार राहिला आहे. आपला देश मतांच्या वाट्यावरून विभागला गेला होता. जर समस्या सर्वांची असेल, तर उपायही सर्वांसाठी असेल.'

पंतप्रधान मोदी म्हणाले, 'जेव्हा मी गुजरातमध्ये आलो, तेव्हा मला प्रशासकीय व्यवस्थेचे फारसे ज्ञान नव्हते; माझा केवळ लोकशक्तीवर विश्वास होता. मी याच विश्वासाला माझ्या शक्तीत बदलले. मी लोकांना सोबत घेतले, निर्णय घेतले, धोरणे तयार केली आणि त्यांची अंमलबजावणी केली. 'आपण हे करून दाखवू...' हाच माझा मंत्र होता. जेव्हा लोक माझ्यासोबत असतात, तेव्हा परिणाम मिळणे अटळ असते. गुजरातने हे सिद्ध केले आहे.' 'आज जग ज्या टप्प्यावर पोहोचले आहे, त्याचे उदाहरण म्हणून गुजरातचा उल्लेख केला जातो. गुजरातमध्ये मला आलेल्या अनुभवांनी मला खूप काही शिकवले. मी शिकलेले अनुभव आजही उपयोगी आहेत. २०१४ मध्ये माझ्या जबाबदा-या वाढल्या. माझी कार्यकक्षा विस्तारली.' पंतप्रधान मोदी म्हणाले, 'त्यावेळी आमच्यासमोर मोठी आव्हाने होती. देशातील प्रत्येक नागरिक एका नव्या मार्गाच्या शोधात होता. भारताच्या अर्थव्यवस्थेबद्दल जग म्हणू लागले होते, 'तिची अवस्था बिकट आहे." आशेचा लवलेशही दिसत नव्हता. निराशेच्या गर्तेत बुडालेल्या देशाला आशेची गरज होती. मला जे जमत होतं, ते मी केलं. मी लोकांसोबत काम केलं आणि त्यांच्यासोबत मिळून पुन्हा पुन्हा म्हणालो, 'आपण हे करून दाखवू.' आता चित्र बदललं आहे.'

पंतप्रधान म्हणाले, 'माझ्या आयुष्यात एकच ध्येय होते: देशासाठी निस्वार्थपणे काम करणे. माझ्यासाठी कर्म हेच सर्वस्व आहे. कर्म हाच माझा धर्म आहे. गीता आपल्याला शिकवते, 'कर्मण्येवाधिकारस्ते,' आणि मी कार्मालाच माझा धर्म मानतो. मी प्रत्येक कार्य माझ्या क्षमतेनुसार सर्वोत्तम केले पाहिजे.' 'गीता असेही सांगते, 'सतत कर्म करा, अनासक्तपणे कर्म करा. कर्म थांबू नये, प्रयत्न थांबू नयेत.' त्यामुळे, कर्म ही जबाबदारी नाही; ती देशासाठी माझी आध्यात्मिक साधना आहे. मला फळांची चिंता नाही. परिस्थिती अनुकूल असल्यास, मला माझ्या देशवासियांची सेवा करण्याची सतत संधी आहे.' पंतप्रधान मोदी म्हणाले, 'आपण या राष्ट्रात जन्मलो आहोत ही जाणीव अमृतासारखी आहे. याच्या तुलनेत सत्ता आणि सुख काहीच नाही. पद आणि प्रतिष्ठा कुठेही मिळू शकते, पण भारतासारखी पवित्र भूमी तुम्हाला सापडणार नाही. ज्या भारताने अंधकारमय काळातही मानवतेला ज्ञान आणि मूल्यांचा प्रकाश दिला, त्या भारताची सेवा करण्याची संधी अनमोल आहे. गेल्या २५ वर्षांचे मूल्यमापन माझ्या कर्तृत्वावरून नव्हे, तर माझ्या देशाच्या प्रगतीवरून केले जाईल.' मोदींनी '२०४७ पर्यंत विकसित भारत, आम्ही ते करून दाखवू. तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आम्ही ते साध्य करू. आत्मनिर्भर भारत आम्ही ते करून दाखवू. ऑलिम्पिकचे आयोजन आम्ही ते करून दाखवू. अंतराळात पाउल आम्ही ते करून दाखवू. ही उर्जा, हा आत्मविश्वास अद्भुत आहे. जेव्हा या गोष्टी रक्ताच्या थारोळ्यात वाहतात, तेव्हा त्यांना कोणीही थांबवू शकत नाही. २५ वर्षांचा हा प्रवास, लोक एक उपलब्धी मानतात,' अशी घोषणा दिली. 'माझं काम नेहमीच एका संघटनात्मक कार्यकर्त्याचं होतं. मी निवडणुका लढवल्या होत्या, पण एकही निवडणूक लढवली नाही. जर मला निवडणूक राजकारणात चमकण्याची इच्छा असती, तर मी खूप आधीच मैदानात उतरू शकलो असतो, पण तो माझा स्वभाव नव्हता. माझं काय होईल याचा मी कधीच विचार केला नाही. लहानपणापासून मिळालेल्या शिक्षणामुळे मी महत्त्वाकांक्षेसाठी नव्हे, तर एका ध्येयासाठी जगणारी व्यक्ती बनलो आहे.'

## पुणे शिक्षक निवडणुकीवरून महायुतीत घमासान; फडणवीस-शिंदेमध्ये कोल्डवॉर

**पुणे/प्रतिनिधी :** विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात मोठ्या घडामोडी घडत आहेत. महायुतीत पुणे शिक्षक मतदारसंघात भाजपनंतर शिंदेसेनेनंही स्वतंत्र उमेदवार उभा केला आहे. तर दुसरीकडे, चर्चासत्र देखील सुरू आहे. मात्र, काँग्रेसच्या दाव्याने



राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. त्यामुळे पुण्यात निवडणुकीआधीच महायुतीत चुरस रंगली आहे?

विधान परिषदेच्या पाचही जागांवर महायुती आणि महाविकास आघाडीत बंडखोरी उफाळून आली आहे. मात्र सर्वाधिक चर्चेची ठरलीय ती पुणे शिक्षक मतदारसंघाची जागा. कारण या जागेवरून महायुतीतली फूट उघड झाली. कारण पुणे शिक्षक मतदारसंघात भाजपनं कौस्तुभ गावडेंना मैदानात उतरवल्यानंतरही शिंदेसेनेनं आपला स्वतंत्र उमेदवार उभा केला.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी ही निवडणूक प्रतिष्ठेची करत थेट त्यांचे ओएसडी मंगेश चिवटे यांनी उमेदवारी जाहीर केली. मंत्री उदय सामंतांच्या उपस्थितीत मंगेश चिवटेंनी उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यामुळे पुण्यात महायुतीत घमासान होण्याची चिन्हे आहेत. पुण्याच्या जागेवर दावा ठोकताना एकनाथ शिंदेंनी निवडणूक होईपर्यंत सस्पेन्स वाढवला आहे.तर मुख्यमंत्र्यांनी अजूनही चर्चेची दारे खुली असल्याचे संकेत दिले आहेत. तर दुसरीकडे, पुणे शिक्षक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने महायुतीतील नेत्यांना डिवचले आहे. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांमध्ये कोल्डवार सुरू असल्याचा दावा विजय वडेट्टीवारांनी केला आहे.पुणे शिक्षक मतदारसंघात अनेक जण रिंगणात असले तरी शिंदेंनी ही निवडणूक प्रतिष्ठेची केल्यामुळे भाजप विरूद्ध शिंदेसेना असे स्वरूप या लढतीला आले आहे. मात्र उमेदवार मागे घेण्याची मुदत ९ ऑक्टोबरपर्यंत असल्यामुळे आणखी काय खलबते होणार? शिंदेसेना माघार घेणार की भाजप? महायुतीत कोण कोणाचा गेम करणार? याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

## महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी ३७ लाखांहून अधिक अर्ज

**मुंबई / प्रतिनिधी-** महिला शेतक-यांना स्वतंत्र शेतकरी म्हणून अधिकृत आणि कायदेशीर ओळख मिळवून देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या महिला शेतकरी प्रमाणपत्र नोंदणीला राज्यभरातून मोठा प्रतिसाद मिळत आहे. ७ ऑक्टोबरपर्यंत तब्बल ३७ लाख ९३ हजार ०५१ अर्ज प्राप्त झाले असून ८९५ ग्रामपंचायतींमध्ये ग्रामसभा घेउन ६८ हजार ४३६ महिला शेतक-यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले आहे. राज्यातील प्रत्येक पात्र महिला शेतकरी या उपक्रमाशी जोडली जावी, यासाठी कृषी विभागाकडून नोंदणीला वेग देण्यात येत आहे, अशी माहिती कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.महाराष्ट्र शासनाने नुकतेच महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण कायदा, २०२६ विधेयक मंजूर केले आहे. त्यानुसार महिला शेतक-यांना स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर ओळख, समान अधिकार तसेच शासनाच्या विविध कृषी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी महिला शेतकरी प्रमाणपत्र देण्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू




झाली आहे. ग्रामसभा झाल्यानंतर पुढील १५ दिवसांत पात्र महिला शेतक-यांना प्रमाणपत्र वितरित केले जात आहे. विदर्भ, मराठवाड्यासह राज्याच्या विविध भागांतून मोठ्या प्रमाणावर नोंदणी होत आहे.

अर्जसंख्येत यवतमाळ जिल्हा २ लाख ५३ हजार ४३९ अर्जांसह आघाडीवर आहे. त्यापाठोपाठ सातारा २ लाख १४ हजार ७८७, नाशिक २ लाख १० हजार ३२७, अमरावती २ लाख ०५ हजार ०७४ आणि पुणे जिल्ह्यात १ लाख ७३ हजार ०४९ अर्ज प्राप्त झाले आहेत. बुलढाणा, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, नंदुरबार, जळगाव, नांदेड, धाराशिव, धुळे, बीड आणि जालना या जिल्ह्यांतही एक लाखांहून अधिक नोंदणी झाली आहे. तालुकानिहाय नोंदणीत सातारा जिल्ह्यातील कराड तालुका ३५ हजार ४२२ नोंदणीसह आघाडीवर आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत सेवा संकल्प अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत १७ सप्टेंबर रोजी महिला शेतकरी प्रमाणपत्राच्या ऑनलाइन पोर्टलचा शुभारंभ करण्यात आला. या अभियानात विविध विभागांच्या तुलनेत कृषी विभागात सर्वाधिक नोंदणी झाल्याचे कृषीमंत्री भरणे यांनी सांगितले. उर्वरित पात्र महिला शेतक-यांनीही ऑनलाइन नोंदणी करून या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले.

## हुथी बंडखोरांचा रियाध विमानतळावर बॅलिस्टिक क्षेपणास्त्राने हल्ला

**रियाध :** येमेनमधील इराण समर्थित हुथी बंडखोर आणि सौदी अरेबियातील संघर्ष आता वेगळ्या वळणावर पोहोचला आहे. हुथी बंडखोरांनी सौदी अरेबियाची राजधानी रियाध येथील किंग खालिद आंतरराष्ट्रीय विमानतळाला लक्ष्य करत बॅलिस्टिक क्षेपणास्त्र डागल्याचा दावा केला आहे. या हल्ल्यामुळे विमानतळावरील हवाई वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाल्याची माहिती हुथींच्या लष्करी प्रवक्त्याने दिली आहे.आमच्या सैन्याने रियाध



येथील किंग खालिद विमानतळावर बॅलिस्टिक क्षेपणास्त्राने अचूक हल्ला केला आहे. यामुळे विमानतळावरील विमानांची वाहतूक थांबली आहे, अशी माहिती हुथी लष्कराचे प्रवक्ते याह्या सारी यांनी एक्सवर पोस्ट करत दिली. याशिवाय हुथींनी अदेन येथील अंतरिम सरकारी राजधानीजवळील विमानतळावर, तसेच सौदीच्या खमीस मुशैत लष्करी तळावर आणि आभा विमानतळावर क्षेपणास्त्रे आणि ड्रोनच्या सहाय्याने एकाच वेळी हल्ले केल्याचा दावा केला आहे. अदेन आंतरराष्ट्रीय विमानतळावर दोन बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे आणि स्फोटकांनी भरलेले ड्रोन डागण्यात आले.गेल्या सात ते आठ महिन्यांपासून सुरू असलेले युद्ध संपवण्यासाठी इराणने आपल्या अणू संवर्धन क्षमतेत लक्षणीय कपात केली पाहिजे, असा स्पष्ट इशारा अमेरिकेचे उपराष्ट्रपती जे. डी. व्हान्स यांनी दिला आहे. जर इराणला अण्वस्त्रे तयार करायची नाहीत, तर त्यांना ६० टक्के संवर्धित इंधनाची काय गरज आहे? अण्वस्त्र निर्मितीचा कोणताही हेतू नसल्याचे दाखवून देण्यासाठी इराणने प्रत्यक्ष कृती करून आपली संवर्धन क्षमता कमी केली पाहिजे. ही अमेरिकेची मूळ अट आहे असे ते म्हणाले.

## ज्ञानेश कुमारला महाराष्ट्रात पाय ठेवू देणार नाही, आला तर तोंडाला काळे फासणार

**मुंबई/ प्रतिनिधी-**देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी व्होटचोरी करून भाजपाला निवडणूका जिंकून देण्यात मदत केली आहेत हे आता स्पष्ट झाले आहे. ज्ञानेशकुमार आणि त्याचे आका मोदी-शाह यांच्याविरोधात देशभरात प्रचंड संताप आहे. लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुलजी गांधी यांच्या नेतृत्वाखाली ३०० खासदार त्यांना भेटायला गेले ते त्यांना भेटत नाहीत. या व्होटचोर ज्ञानेशकुमारला काँग्रेस कार्यकर्ते महाराष्ट्रात



पाय ठेवू देणार नाहीत आला तर त्याच्या तोंडाला काळे फासणार असा इशारा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिला आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार संविधानिक पदावर बसून भाजपच्या एजंटप्रमाणे वागत आहेत. त्यांनी देशातील लोकशाहीची हत्या केली असून या देशद्रोहीविरोधात देशभरात प्रचंड संताप आहे. संपूर्ण देश रस्त्यावर उतरून ज्ञानेश कुमारच्या राजीनाम्याची मागणी करत आहे. त्यामुळे त्यांच्या नियोजित दौ-यांमध्ये सातत्याने बदल होत असून मेरठ वाराणसीनंतर आता ७ व ८ ऑक्टोबर रोजीचा छत्तीसगड दौराही स्थगित करण्यात आला आहे. फार्म ६ मध्ये बेकायदा बदल करून १८ वर्ष पूर्ण झालेल्या तरुणांना मतदानाच्या अधिकारापासून वंचित ठेवण्याचे पाप केले आहे. या पापाची शिक्षा ज्ञानेशकुमार आणि संरक्षण देणा-या आकांना भोगावीच लागणार आहे. लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल जी गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्ष मतदारांच्या हक्कांसाठी आणि निष्पक्ष निवडणूक प्रक्रियेसाठी संघर्ष करत राहील असे सपकाळ यांनी स्पष्ट केले.

## ज्ञानेश हटावो, लोकशाही बचावोच्या घोषणांनी लक्ष वेधले

### इंडिया आघाडीचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

**नांदेड/प्रतिनिधी :** मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी भाजपा निवडणूक जिंकण्यासाठी वेळोवेळी काम केले आहे हे आता सिद्ध झाले आहे. ज्ञानेश कुमार यांनी मनमानी कारभार करत गैर पद्धतीने एसआयआर मोहीम राबवली आहे. जो पर्यंत ज्ञानेश कुमार राजिनामा देत नाही, निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता येत नाही तोपर्यंत आंदोलन सुरू राहिल असे ठाम प्रतिपादन खा. रवींद्र चव्हाण यांनी महामोर्चा दरम्यान केले.



मुख्य निवडणूक आयुक्तज्ञानेश कुमार यांच्या राजिनाम्यासह एसआयआर रद्द करा व निवडणूका ईव्हीएम ऐवजी मतपत्रिकेद्वारे घ्या या प्रमुख मागण्यांसह इतर मागण्यांसाठी काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) शिवसेना (उबाठा), सीपीआय, आम आदमी पार्टीसह इंडिया आघाडीच्या वतीने बुधवार दि. ७ रोजी शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते जिल्हाधिकारी कार्यालय दरम्यान महामोर्चा काढण्यात आला. यावेळी खा. रवींद्र चव्हाण हे बोलत होते. ज्ञानेश कुमार हटावो, लोकशाही बचावो अशी प्रचंड घोषणाबाजी यावेळी करण्यात आली. या महामोचार्ला प्रचंड मोठा प्रतिसाद मिळाला.एसआयआर प्रक्रिया आणि देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या कारभारामुळे संताप निर्माझ झाला असून विरोधकही आता एकवटले आहेत. देशस्तरावर सुरू असलेल्या आंदोलनातंर्गत नांदेड शहरातही बुधवारी इंडिया आघाडीच्या वतीने हा महामोर्चा काढण्यात आला.

या मोर्चात काँग्रेस दक्षिण जिल्हाध्यक्ष तथा खासदार रवींद्र चव्हाण, माजी मंत्री माधवराव पाटील किन्हाळकर, माजी आ. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, माधवराव पाटील जवळगावकर, रोहीदास चव्हाण, काँग्रेसचे उत्तर जिल्हाध्यक्ष डा. विठ्ठल पावडे, काँग्रेस महानगराध्यक्ष अब्दुल गफ्फार, प्रा. यशपाल भिंगे, सुरेशदादा गायकवाड, डा. श्रावण रँपनवाड, तिरुपती पाटील कोंडेकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष भगवानराव पाटील आलेगावकर, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बबन बारसे, जिल्हाप्रमुख भुजंग पाटील, प्रदिप नागापूरकर, तालुकाप्रमुख सुनील पाटील कदम, सतीश उमरेकर, नगरसेवक मुन्ना अब्बास, सीपीएमचे विनोद गोविंदवार, राष्ट्रवादीचे तातेराव पाटील आलेगावकर, माजी उपमहापौर आनंद चव्हाण, महानगरप्रमुख मनोज यादव, सीपीआयचे का. गंगाधर गायकवाड, अनिल मोरे, राजेश पावडे, आनंदराव गुंडिले, बालाजी गाडे, कुमार कुर्तडीकर, शिवाजी पाटील पाचपिपळेकर, नगरसेवक सत्यपाल सावंत, पाशा भाई, शोहब हुसेन, मोसिम खान, शहबाज फहिज, मो. इब्राहिम, राजू गोडबोले, महेश देशमुख तरोडेकर, गणेश ढगे, अजिज कुरेशी, मुन्तजिब, शेर अली, डा. बाकी, संदिप देशमुख, , प्रकाश दिपके, अझर शेख, आदीसह इंडिया आघाडीतील सर्वच पक्षाचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते महामोर्च्यात मोठ्या संख्याने सहभागी झाले होते.

## दुष्काळात कोट्यवधींच्या जाहिरातींची ऊधळपट्टी

**मुंबई /प्रतिनिधी-** राज्यातील दुष्काळ आणि सरकारच्या कारभारावर बोलताना त्यांनी ताशेरे ओढले, पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्यांच्या राजकीय कारकिर्दीला २५ वर्षे झाली म्हणून दुष्काळी महाराष्ट्रात शेकडो कोटी रुपयांच्या सरकारी जाहिरातींचे रकानेच्या रकाने छापून आणले जात आहेत. दुष्काळात होरपळणा-या गरीब शेतक-यांच्या खात्यात थेट मदत देण्याऐवजी जाहिरातींवर ४०० ते ५०० कोटी रुपये उधळले जात आहेत. हुकूमशहाला चमचेगिरी आवडते आणि सध्या केवळ एकतर्फी लाचारी व चमचेगिरी सुरू असल्याची टीका शिवसेना ठाकरे गटाचे खासदार



संजय राउत यांनी केली आहे.दिल्लीतील खासदारांचे आंदोलन, महाराष्ट्रातील भीषण दुष्काळात सरकारकडून होणारी जाहिरातबाजी, एमपीएससी व आदिवासी विद्यार्थ्यांची दडपशाही आणि सर्वोच्च न्यायालयात शिवसेना पक्ष-चिन्हाबाबत न्यायमूर्तींनी उपस्थित केलेल्या रोखठोक प्रश्नांवर संजय राउत यांनी केंद्र व राज्य सरकारवर चौफेर तोफ डागली.दिल्लीत निवडणूक आयोगाच्या कार्यालयावर काढण्यात आलेल्या विरोधी पक्षांच्या मोर्चावर बोलताना संजय राउत म्हणाले, पावणेतीनशे खासदारांना निवडणूक आयोगाच्या निर्वाचन सदन मुख्यालयाकडे जाताना रस्त्यावर बॅरिकेड्स आणि सशस्त्र दल उभे करून रोखण्यात आले. लोकप्रतिनिधींना मुख्य निवडणूक आयुक्तांना भेटू न देणे हे कोणत्या लोकशाहीत बसते? रात्री महिला खासदारांशी पोलिसांनी अत्यंत गैरवर्तन केले आणि रात्री साडेअकरा वाजता राहुल गांधींची सुटका झाली. जगासमोर भारताच्या लोकशाहीची ही विदारक स्थिती समोर गेली आहे. ज्ञानेश कुमार आणि मोदी-शाहांच्या संगनमताने हा खेळ सुरू आहे. एवढा मोठा उद्रेक देशात सुरू असताना गृहमंत्री अमित शाह कुठे भूमिगत झाले आहेत आणि पंतप्रधान का मौन बाळगून आहेत? हा लढा आता मागे हटणार नाही; राहुल गांधी यांच्या नेतृत्वात हे आंदोलन दिल्लीसह देशभर तीव्र केले जाईल. पुण्यातील स्पर्धा परीक्षांचे आंदोलन आणि मुंबईत आदिवासी विद्यार्थ्यांवर झालेल्या मध्यरात्रीच्या कारवाईवर ते म्हणाले, नाशिकहून पायी चालत मुंबईत दाखल झालेल्या आदिवासी विद्यार्थ्यांना राहण्यासाठी सरकारी विश्रामगृह, आमदार निवास किंवा हाटेल्समध्ये जागा दिली नाही.

## ट्रॅव्हल्सचा भीषण अपघात, २ जणांचा मृत्यू, ८ प्रवासी गंभीर जखमी

**नाशिक :**जिल्ह्यातील पेठ तालुक्यात असलेल्या सावळघाट परिसरात ६ ऑक्टोबर उशीरा रात्री नाशिक-अहमदाबाद प्रवास करणा-या खासगी बसचा भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत २ जणांचा मृत्यू झाला असून ८ प्रवासी जखमी झाले आहेत. अपघाताची माहिती मिळताच प्रशासन आणि बचाव यंत्रणांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. पोलिस या घटनेचा पुढील तपास करत असून जखमींना पुढील उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.मिळालेल्या माहितीनुसार,




नाशिकहून अहमदाबादच्या दिशेने खासगी बस प्रवास करत होती. सावळघाटातील वळणाच्या परिसरात रात्रीच्या सुमारास बसचा भीषण अपघात झाला. अपघाताची तीव्रता मोठी असल्याने बसमधील प्रवाशांमध्ये एकच गोंधळ उडाला. स्थानिक नागरिकांनीही घटनास्थळी मदतीसाठी धाव घेतली. या दुर्घटनेत महेंद्र पाल आणि राहुल ओझा या दोघांचा मृत्यू झाला आहे. हे दोघेही गुजरात राज्यातील रहिवासी असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. तर अपघातात आठ जण जखमी झाले असून त्यांना तातडीने उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.जखमींपैकी काहींची प्रकृती गंभीर असल्याची माहिती मिळत आहे. दरम्यान, या अपघाताची माहिती थेट पंतप्रधान कार्यालयाला देण्यात आल्याने संबंधित यंत्रणांनीही तातडीने हालचाली सुरू केल्या. प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली बचावकार्य वेगाने राबवण्यात आले. अपघातग्रस्त बसमधील प्रवाशांना बाहेर काढून जखमींना तातडीने वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्यात आली.

## ५ मजली इमारत अचानक कोसळली

### अनेक जण ढिगा-याखाली अडकल्याची भीती, एकाचा मृत्यू

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** दिल्लीच्या ईशान्य भागातील सीमापुरी परिसरात बुधवारी दुपारी एक मोठी दुर्घटना घडली. साडेतीन वाजण्याच्या सुमारास एक ५ मजली जुनी इमारत अचानक कोसळली. या भीषण दुर्घटनेत एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, अनेक नागरिक ढिगा-याखाली अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे. दुर्घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या चार गाड्या दाखल झाल्या असून बचावकार्य सुरू आहे. या दुर्घटनेबद्दल सविस्तर वृत्त दी इंडियन एक्सप्रेसने दिले आहे. शाहदरा विभागाचे पोलीस उपायुक्त राजेंद्र प्रसाद मीणा यांनी दिलेल्या माहितीनुसार, स्थानिक नागरिकांच्या मदतीने काही जणांना ढिगा-यातून सुखरूप बाहेर काढून तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मात्र, अद्यापही २ ते ३ जण ढिगा-याखाली अडकले असण्याची शक्यता आहे. ते ढिगा-याखालून आतून बोलत असून त्यांना सुरक्षित बाहेर काढण्यासाठी युद्धपातळीवर बचावकार्य सुरू आहे, असे पोलिसांनी सांगितले.

## मिथुन चक्रवर्ती यांचावर भाजपाने सोपवली मोठी जबाबदारी,

### थेट कॅबिनेट मंत्र्यांचा दर्जा मिळणार



**नवी दिल्ली/ वृत्तसंस्था :** पाश्चिमा बंगालमध्ये मागील काही दिवसांपासून मोठ्या घडामोडी पाहायला मिळत आहेत. सुवेंदू अधिकारी यांनी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यापासून अनेक मोठे निर्णय घेतले आहेत. त्यामुळे त्यांची सध्या देशभरात चर्चा सुरू आहे. आता मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांच्या सरकारमध्ये ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांच्यावर एक मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे.पश्चिम बंगाल सरकारमध्ये मिथुन चक्रवर्ती यांची माहिती व सांस्कृतिक व्यवहार विभागाचे मुख्य सल्लागार म्हणून अधिकृत नियुक्ती करण्यात आली आहे. आता या नव्या पदासह मिथुन चक्रवर्ती यांना थेट कॅबिनेट मंर्त्याचा दर्जा मिळणार आहे. मिथुन चक्रवर्ती यांची ही नियुक्ती पुढील आदेशापर्यंत राहणार आहे. मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी हा निर्णय घेतला आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.दरम्यान, मिथुन चक्रवर्ती यांच्यावर ही मोठी जबाबदारी दिल्यामुळे आता पश्चिम बंगालमधील भारतीय जनता पक्षाचं संघटन आणि सांस्कृतिक क्षेत्रातील स्थान आणखी मजबूत करण्यासाठी फायदा होईल असं बोललं जात आहे. या नियुक्तीमागे देखील काही राजकीय गणित असल्याचं सांगितलं जात आहे. मिथुन चक्रवर्ती यांची मुख्य सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आलेला माहिती आणि सांस्कृतिक व्यवहार विभाग हा मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांच्या अखत्यारीत येतो. या पदाला कॅबिनेट मंर्त्याचा दर्जा देण्यात आलेला आहे.

# संपादकीय

**प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे**

## पाणीटंचाईचे सावट

**रा**ज्य सरकारने आतापर्यंत २६ जिल्ह्यांतील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला आहे. दुष्काळाच्या निकषात न बसणाऱ्या आणखी १९ तालुक्यांचा फेरविचार करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. राज्यात सर्वाधिक दुष्काळी जिल्ह्यांमध्ये यवतमाळ, नागपूर, जळगाव, अहिल्यानगर, नांदेड, बुलढाणा, अमरावती, सोलापूर, चंद्रपूर, परभणी, छत्रपती संभाजीनगर, बीड, लातूर यांचा समावेश आहे. दुष्काळी जिल्ह्यांत नाशिक व सिंधुदुर्ग जिल्ह्याचा समावेशही होणे तसे धक्कादायक व पावसाच्या लहरीपणावर शिक्कामोर्तब करणारे आहे. पावसाच्या तुटवड्यामुळे शेतीचे ७५ टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान झाल्याचे सरकारने मान्य केले आहे. शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी सरकारी यंत्रणेची धावपळ सुरू आहे. राज्यातून मोसमी पाऊस परतल्याचे हवामान विभागाने जाहीर केले आहे. राज्यातील बहुसंख्य भागांमध्ये पावसाने ओढ दिल्यामुळे खरीप पिकांवर मोठा परिणाम झाला आहे. सोयाबीन, कापूस, मका, बाजरी, तूर, मूग आणि उडदासह विविध पिकांची स्थिती चिंताजनक आहे. पिकांची वाढ खुंटल्याने व कीड-रोगांचा प्रादुर्भाव वाढल्याने उत्पादनात मोठी घट होणार आहे. मुगाच्या उत्पादनात मोठी घट झाल्याने सुरवातीलाच मुगाचे दर ९ हजार रुपये क्विंटल झाले आहेत. सर्वच कडधान्यांच्या दरांमध्ये तसे घडणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांबरोबर सामान्यांचे बजेटही कोलमडणार आहे. राज्यातील तांदूळ उत्पादन करणाऱ्या पट्ट्यातही शेवटी म्हणजे गेल्या २०-२५ दिवसांपासून अजिबात पाऊस न झाल्यामुळे भाताच्या उत्पादनावरही विपरित परिणाम होण्याची भीती आहे. राज्यात विहीर बागायतीवर होणारे कांद्याचे उत्पादन मोठे आहे. यंदा विहिरींमध्ये पाण्याचे प्रमाण अल्प असल्याने शेतकऱ्यांना ते स्वतःच्या जनावरांच्या पिण्यासाठी राखून ठेवावे लागणार आहे. त्यामुळे कांद्याचे उत्पादनही घटणार आहे. रब्बीच्या पेरणीच्या वेळी अजिबात पाऊन न झाल्याने यंदा सोलापूर, अहिल्यानगर, अमरावती, बुलढाणा व मराठवाड्यात ज्वारीच्या पेरण्या होऊ शकलेल्या नाहीत. आता ती वेळही निघून गेली आहे. ज्वारीचा दर आताच क्विंटलमागे साडेसात हजारांच्या पलीकडे गेला आहे. पुढे यात मोठी वाढ होणार आहे. विहिरींमध्येही यंदा पाण्याची पातळी कमी असल्याने त्याचा परिणाम गहू व हरभऱ्याच्या उत्पादनावर होणार आहे. राज्याच्या बहुतांशी भागात जनावरांच्या चाऱ्याची परिस्थितीही गंभीर होण्याची शक्यता आहे. या वेळच्या दुष्काळात सरकारची प्राधान्यक्रम रेशन कार्डधारकांसाठी जी मोफत धान्यवितरणाची योजना आहे, तिचा आधार होणार आहे. पण, इतरांसाठीही बाजारपेठेतील अन्नधान्यांचे दर नियंत्रणात ठेवण्याचे सरकारपुढे आव्हान असणार आहे. कमी पावसाचा परिणाम धरणांतील पाणीसाठ्यांवरही झाला आहे. सर्व लघु, मध्यम व मोठ्या जलप्रकल्पांचा विचार केला, तर सर्व विभागांतील पाणीसाठ्यांत १३ टक्क्यांची तूट आहे. राज्यातील ३०३२ लघु, मध्यम व मोठ्या जलप्रकल्पांत केवळ ७४.१७ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. गेल्या वर्षी तो ८९.५७ टक्के होता. यंदा फक्त कोकण, पुणे व नाशिक या विभागांतील पाणीसाठी ८२ टक्क्यांपेक्षा अधिक आहे. मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) विभागातील स्थिती अतिशय भयावह आहे. मराठवाड्यातील मध्यम प्रकल्पांमध्ये २३.६९ टक्के आणि लघु प्रकल्पांमध्ये केवळ १६.४१ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. मराठवाड्यातील ९२९ प्रकल्पांत यंदा फक्त ४५ टक्के पाणीसाठा नोंदवला गेला. अनेक लघु प्रकल्प कोरडे पडल्याने तीव्र पाणीटंचाईचे सावट आहे. अमरावती विभागात २७७ प्रकल्पांत अवघा ६३ टक्के, नागपूर विभागात ३८७ धरणांत ७१ टक्के पाणी साठा आहे. सध्याचा पाणीसाठा पुढच्या वर्षाच्या ३१ ऑगस्टपर्यंत म्हणजे नऊ महिने पुरवण्याचे प्रशासनापुढे मोठे कठीण आव्हान असणार आहे. शेतीबरोबरच पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही आताच गंभीर होण्याची चिन्हे आहेत. सरकारने पाणीपुरवठ्यात दहा टक्क्यांची कपात करण्याचे आदेश दिले आहेत. ही कपात वाढत जाण्याची शक्यता आहे. सरकारने धरणांतील पाणी वापराचा पिण्याचे पाणी,औद्योगिक व शेती, असा प्राधान्यक्रम निश्चित केला आहे. पण, आवर्तनांच्या वेळी शेतकऱ्यांच्या दवावाचा रेटा निर्माण होऊन या प्राधान्यक्रमात तडजोड करण्याची वेळ सरकारवर येण्याची भीती आहे. कारण विरोधक ही संधी सोडणार नाहीत. दुष्काळी परिस्थितीला तोंड देताना सरकारला मोठी कसरत करावी लागणार, याची आतापासूनच चिन्हे आहेत. सरकारला अजिबात उसंत मिळू न देण्याचा विरोधकांचा पावित्रा आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना सरसकट मदतीचे आश्वासन दिले, पण या संबंधांतील परित्रकात सरसकट मदत जाहीर करण्यात आली नसल्याची तक्रार विरोधकांनी आतापासूनच करण्यास सुरवात केली आहे. कर्जवसुलीला स्थगिती देण्याऐवजी तातडीने कर्जमाफी करायला हवी होती. सरकारने कर्जाचे पुनर्गठन करण्याचा निर्णय घेतला आहे, म्हणजे शेतकरी पुन्हा कर्जाच्या ओझ्याखाली जाणार. २०२५ नंतर २०२६-२७ याच्यामध्ये आता जी काही कर्ज थकणार आहे, त्याचा सुद्धा समावेश कर्जमाफीमध्ये केला पाहिजे, अशी विरोधक मागणी करत आहेत. तसे पाहिले तर, नियमित कर्जदारांवर कर्जमाफीमध्ये नेहमीच अन्याय होतो. पण, आताच्या दुष्काळी परिस्थितीत त्यांना सुद्धा दोन लाखाची कर्जमाफी दिली पाहिजे.या संकटात सरकारने प्रामाणिकपणे व भक्कमपणाने शेतकऱ्यांच्या मागे उभे राहण्याची आवश्यकता आहे. गेल्यावर्षी अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. यंदा दुष्काळ सर्वांच्या डोळ्यांतून पाणी काढणार आहे. अशा वेळी नियमित पीक कर्जदारांसह संपूर्ण कर्जमाफी, तसेच पिकांचे जे नुकसान झाले आहे त्याची किंमत भरून देणे, तातडीने राज्यभर जनावरांसाठी चारा डेपो उभारणे, असे उपाय केल्यास बळीराजा पुन्हा उभा राहू शकणार आहे.

**शेतकरी हा केवळ एक मतदार किंवा केवळ अन्न पिकवणारे यंत्र नाही तर तो या देशाच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा आहे. जोपर्यंत आपण त्याला वेळेवर सोयी–सवलती, हक्काचा बाजारभाव आणि समाजात सन्मानाचे जीवन देत नाही, तोपर्यंत त्याची अस्वस्थता संपणार नाही. बळीराजाला आत्महत्येपासून रोखायचे असेल, तर संपूर्ण समाजाने आणि सरकारने त्याच्या पाठीशी प्रत्यक्ष कृतीतून खंबीरपणे उभे राहणे ही मोठी गरज आहे.**

# बळीराजाची अस्वस्थता दूर करण्यासाठी..

**‘ज**गाचा पोशिंदा’ म्हणून मिरवणारा भारतीय शेतकरी आज अत्यंत अस्वस्थ आहे. ज्याच्या घामातून संपूर्ण देशाची भूक भागते, तो बळीराजा आज स्वतःच्याच अस्तित्वाची आणि आत्मसन्मानाची लढाई लढत आहे. मशागतीपासून ते थेट पीक बाजारात जाईपर्यंतचा त्याचा प्रवास एवढ्या अनिश्चिततेने भरलेला आहे की, शेवटी हतबल होऊन तो आत्महत्येसारखे अत्यंत दुर्दैवी पाऊल उचलत आहे. आजही वर्तमानपत्र उघडले तर निरनिराळ्या भागात शेतकऱ्याच्या आत्महत्येचे वृत्त वाचायला मिळते. उन्हातान्हात जमीन तयार करून, चांगल्या बियाण्यांची आणि योग्य किमतीत खतांची वाट पाहण्यापासून शेतकऱ्याचा संघर्ष सुरू होतो. परंतु, बाजारात पाऊल ठेवताच खते आणि बियाण्यांमधील भ्रष्टाचार, काळाबाजार आणि बनावट मालाची फसवणूक त्याला सुरुवातीलाच आर्थिक फटका देते. त्यात भर म्हणून वेळेवर पाऊस पडणे आणि निसर्गाची कृपा राहणे या संपूर्णपणे नशिबाच्या गोष्टी बनल्या आहेत. गेल्या काही वर्षांत हवामान बदलामुळे निसर्गाचे चक्र पूर्णपणे कोलमडले आहे. कधी ओला दुष्काळ, तर कधी कोरडा दुष्काळ अशा निसर्गाच्या अवकृपेमुळे हाता-



तोंडाशी आलेला घास एका रात्रीत हिरावून घेतला जातो, ज्यामुळे लागवडीचा खर्चही निघत नाही.

शेतीसाठी भांडवल उभे करताना शासकीय बँकांचे उंबरठे झिजवणे हा शेतकऱ्याच्या आयुष्यातील दुसरा मोठा मनस्ताप आहे. बँक कर्ज वेळेवर मिळणे ही एक अत्यंत क्लिष्ट आणि दिरंगाईची प्रक्रिया झाली आहे. कागदपत्रांची पूर्तता करता करता पिकाचा हंगाम निघून जातो, ज्यामुळे लहान शेतकऱ्यांना नाइलाजाने गावातील खासगी सावकारांच्या दारात जावे लागते आणि सावकारांचे प्रचंड व्याजदर त्याला कर्जबाजारीपणाच्या खाईत लोटतात. या दुष्टचक्रातून शेतकऱ्याला बाहेर काढण्यासाठी सरकारकडून कर्जमाफीच्या घोषणा केल्या जातात खरे, पण प्रत्यक्षात ती रक्कम मिळायला प्रशासकीय पातळीवर प्रचंड दिरंगाई होते. यात सर्वात मोठा अन्याय नियमित कर्जफेड करणा-या प्रामाणिक शेतकऱ्यांवर होतो. त्यांच्यासाठी प्रोत्साहनपर रक्कम जाहीर तर केली जाते, पण ती वेळेवर कधीच मिळत नाही. यामुळे शेतक-यांमध्ये ‘नियमित कर्ज भरून काय फायदा?’ अशी भावना निर्माण होते आणि प्रामाणिकपणे कर्ज भरणा-यांमध्ये कर्ज थकवण्याची वृत्ती बळावते.

या अशा बिकट परिस्थितीत पिकांचे नुकसान झाल्यावर शेतकऱ्याला आधार देण्यासाठी ‘पीक विमा’ (Crop Insurance) नावाची व्यवस्था उभी केली गेली आहे. परंतु, आज ही व्यवस्थाच शेतकऱ्याच्या अस्वस्थतेचे एक मोठे कारण बनली आहे.पिकांचे अतोनात नुकसान झाल्यावरही विमा कंपन्यांकडून वेळेवर आणि योग्य नुकसानभरपाई मिळत नाही. नुकसानीचे पंचनामे करण्याच्या पद्धती, गुंतागुंतीचे निकष आणि कंपन्यांची टोलवाटोलवी यामुळे शेतकरी पुरता खचून जातो. अनेकदा तर जाचक अटींमुळे प्रत्यक्ष शेतात १०० टक्के नुकसान होऊनही कागदावर मात्र शेतकरी विम्याच्या हक्काच्या रकमेपासून वंचित राहतो. विम्याचा हप्ता भरताना बँक खात्यातून पैसे तात्काळ कापले जातात, पण जेव्हा विम्याची रक्कम मिळण्याची वेळ येते, तेव्हा शेतकऱ्याला विमा कंपन्यांच्या कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागतात.

ऑनलाइन तक्रार नोंदवण्यातील अडचणी आणि तांत्रिक घोळामुळे हजारो शेतकरी मदतीपासून दूर राहतात. नैसर्गिक आपत्तीने आधीच कंबरडे मोडलेले असताना, विम्याच्या पैशांसाठी करावी लागणारी ही लाचारी शेतक-याला आत्मक्लेश देणारी ठरते.या सर्व संकटांवर मात करून जेव्हा शेतकऱ्याचा माल कसातरी घरात येतो, तेव्हा खरी लढाई बाजारभावाची सुरू होते. वर्षभर रक्ताचे पाणी करून पिकवलेल्या मालाला बाजारात योग्य किंमत मिळत नाही. मागणी आणि पुरवठ्याचे गणित असे काही फिरवले जाते की, शेतीमाल बाजारात येताच भाव अचानक गडगडतात. दलालांची आणि व्यापाऱ्यांची साखळी शेतकऱ्याचे शोषण करते, ज्यामुळे ग्राहकाला महाग मिळणारी वस्तू शेतकऱ्याकडून कवडीमोल भावाने खरेदी केली जाते. नफा मात्र व्यापारी मंडळीच कमावतात. पिकाला रास्त भाव किंवा किमान आधारभूत किंमत न मिळाल्यामुळे शेतकरी सातत्याने तोट्यात राहतो. या आर्थिक कोंडीसोबतच शेतकऱ्याला आज सामाजिक पातळीवरही उपेक्षेला सामोरे जावे लागत आहे. शासकीय कार्यालयात किंवा बँकेत काम घेऊन गेल्यावर त्याला सन्मानाची वागणूक मिळत नाही. निवडणुका आल्या की घोषणांचा पाऊस पडतो, पण निवडणुका संपल्या की आश्वासनांची पूर्तता होत नाही. ही सततची आर्थिक ओढाताण, पीक विम्यातील फसवणूक, डोक्यावर साचत जाणारा कर्जाचा डोंगर आणि कुटुंबाच्या जबाबदाऱ्यांमुळे शेतकरी मानसिकदृष्ट्या पूर्णपणे खचून जातो. जेव्हा त्याला सन्मानाने जगण्याचा कोणताही मार्ग दिसत नाही, तेव्हा तो हतबल होऊन आत्महत्या करतो.

महाराष्ट्रावर यावेळी भीषण दुष्काळाचे संकट आहे. त्यामुळे बळीराजाची अस्वस्थता आणखी वाढली आहे. ही अस्वस्थता दूर करायची असेल, तर केवळ तात्पुरत्या घोषणांची मलमपट्टी नको, तर मूळ समस्येवर थेट उपाय करणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांच्या मालाला उत्पादन खर्चावर आधारित योग्य आणि शाश्वत हमीभाव मिळालाच पाहिजे. खते आणि बियाण्यांमधील काळाबाजार रोखण्यासाठी कडक कायदे करून दोषींना तात्काळ शिक्षा झाली पाहिजे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, पीक विम्याची प्रक्रिया संपूर्णपणे पारदर्शक आणि सुटसुटीत करून, कोणतीही दिरंगाई न करता विम्याची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या खात्यात वेळेवर जमा झाली पाहिजे. विमा कंपन्यांच्या नफेखोरीला चाप लावून त्यांना शेतकऱ्यांप्रती उत्तरदायी बनवले पाहिजे. बँकिंग व्यवस्थेत सुधारणा करून नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना तात्काळ प्रोत्साहनपर लाभ देणे गरजेचे आहे, जेणेकरून प्रामाणिकपणाची कदर होईल.शेतकरी हा केवळ एक मतदार किंवा केवळ अन्न पिकवणारे यंत्र नाही तर तो या देशाच्या अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा आहे. जोपर्यंत आपण त्याला वेळेवर सोयी-सवलती, हक्काचा बाजारभाव आणि समाजात सन्मानाचे जीवन देत नाही, तोपर्यंत त्याची अस्वस्थता संपणार नाही. बळीराजाला आत्महत्येपासून रोखायचे असेल, तर संपूर्ण समाजाने आणि सरकारने त्याच्या पाठीशी केवळ आश्वासने देऊन नाही, तर प्रत्यक्ष कृतीतून खंबीरपणे उभे राहणे ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज आहे.

**दिलीप देशपांडे**

## ऑक्टोबर २०२६ पासून ११ टक्के नाही तर २० टक्के आयात शुल्क जाहीर करा

**आदरणीय नरेंद्र मोदी,**
**पंतप्रधान, भारत सरकार, नवी दिल्ली**

**विषय- ‘एल निनो’च्या पार्श्वभूमीवर ११ टक्के नव्हे, तर २० टक्के आयात शुल्क जाहीर कराव**

**सप्रेम नमस्कार,**

गेल्यावर्षी ऑक्टोबर २०२५ मध्ये देशातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी कापूस ७,००० ते ७,२०० रुपये प्रति क्विंटल दराने विकला. तेव्हा किमान आधारभूत किंमत ८,१०० रुपये प्रति क्विंटल होती. केंद्रीय कापूस महामंडळाने (CCI) केवळ १० दशलक्ष गाठी कापूस खरेदी केला. २०२६-२०२७ मध्ये देशातील कापूस उत्पादन ३३ दशलक्ष गाठी होते. सुरुवातीला भाव कमी होते कारण अमेरिकेच्या बाजारात भाव ७० सेंट प्रति पाउंड (अर्धा किलो) होता.त्यानंतर भावामध्ये अधिक वाढ झाली.भारतात ४८,००० ते ५०,००० रुपये किंमत होती.नंतर ७०,००० ते ७२,००० रुपयांपर्यंत पोहोचली. भारत सरकारने गिरणी मालकांच्या दबावामुळे, ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत आयात शुल्क शून्यावर आणण्यात आले. यामुळे, आतापर्यंत अंदाजे ७० लाख गाठींची आयात झाली आहे.

गेल्या १५ दिवसांपासून अमेरिका आणि ब्राझीलमध्ये कापसाच्या दरात घट झाली आहे. अमेरिकेत डॉलरचा भाव ८९-९० सेंट प्रति पाउंडवरून घसरला आहे. कापसाचा भाव ९४ सेंटवरून ७७-७८ सेंटपर्यंत खाली आला आहे. याचा परिणाम असा झाला आहे की, ७०,०००-७२,००० रुपये प्रति नग असलेला कापसाचा भाव आजच ६२,०००-६३,००० रुपयांपर्यंत खाली आला आहे. हरियाणा-राजस्थान-गुजरातचे शेतकरी ९,५०० रुपये प्रति नग या भावाने कापूस वाचवत होते, आज किमान आधारभूत किंमत ८,५०० रुपयांवरून ८७,००एंएसपी रुपयांपर्यंत खाली आली आहे.

यावर्षी शेतकरी सुपर ‘एल निनो’मुळे चिंतेत आहेत. यावर्षी पिण्याच्या पाण्याची समस्या आहे. कापसाचे उत्पादन ४ टक्क्यांनी घटेल.जर तुमच्या सरकारने आयात कर वाढवले नाहीत तर कापसाचे भाव खाली होतील. कमी किमतींमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट कसे होईल?

या पार्श्वभूमीवर, ‘एल निनो’चा फटका बसलेल्या शेतकऱ्यांच्या आर्थिक हिताचे रक्षण करण्यासाठी,आम्ही तुम्हाला विनंती करतो की, ३१ ऑक्टोबर २०२६ पासून ११ टक्के नाही तर २० टक्के आयात शुल्क जाहीर करावे. कमी उत्पादनाच्या पार्श्वभूमीवर,आम्ही तुम्हाला सी.सी. आयला २० टक्के बोनससह एमएसपीवर खरेदीची मागणी करण्याची विनंती करतो.

**विजय जावंधिया,**
शेतकरी संघटना पाईक
मो.९४२१७२७९९८

# २०२७ मध्ये ‘अल-निनो’चा महाराष्ट्रावर जिल्हानिहाय होणारा परिणाम

**म**हाराष्ट्रात २६५ तालुक्यांत दुष्काळ आहे व त्याची व्याप्ती वाढत आहे. गेल्या दोन महिन्यात मराठवाड्यातून मुंबईला जाण्याची दररोज रेल्वेची क्षमता १५ हजार प्रवास्यांची असताना ३० हजार प्रवासी प्रवास करीत आहेत म्हणजेच गेल्या दोन महिन्यात मुंबई-पुणे-नाशिक या औद्योगिक पट्टात ५- १० लाख लोक कामाच्या शोधात स्थलातरीत झाले आहेत. विदर्भाची स्थिती फारशी वेगळी नाही. स्वतंत्र भारताच्या इतिहासातील सर्वात मोठ्या स्थलातराच्या उंबरठ्यावर आपण यावर्षी आहोत.पण खरी भीती पुढील वर्षीची आहे. दर महिन्याला प्रसिद्ध होणाऱ्या जागतिक हवामान संस्थाच्या हवामान अहवाला नुसार आपल्यावर होणाऱ्या संभाव्य परिणामाचा विचार करावा लागेल.

जागतिक हवामान संस्थेने (IRI, कोलंबिया विद्यापीठ) २१ सप्टेंबर रोजी दिलेल्या रिपोर्टनुसार अल-निनो आता ‘Very Strong' झाला आहे.

-Nino ३.४ निर्देशांक +३.० डिग्रीवर पोहोचला आहे.

- २२ पैकी २२ मॉडेल्स सांगत आहेत की हा अल-निनो २०२६-२७ च्या हिवाळ्यापर्यंत तीव्र राहील.

- फेब्रुवारी २०२७ पर्यंत ‘अल-निनो’ची शक्यता १००% आहे

- आणि हा अल-निनो २०२७ पर्यंत टिकणार आहे, असा दुसरा रिपोर्ट सांगतो आहे.म्हणजे २०२७ चा मान्सून सुद्धा ‘अल-निनो’च्या सावलीतच असणार. भारतात ‘अल-निनो’ म्हणजे मान्सून कमकुवत, पाऊस १५-२०% कमी.

**महाराष्ट्रावर जिल्हानिहाय काय परिणाम**

१. सर्वात जास्त फटका-मराठवाडा-८ जिल्हे पूर्ण धोक्यात.

बीड, जालना, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली.

**परिणाम-**येथे आधीच भूजल ४५० फूट खाली आहे. अल-निनोमध्ये जूनमध्ये पाऊस ३-४ आठवडे लांबेल. सोयाबीन, कापूस, तूर या पिकांच्या पेरण्या होणारच नाहीत. २०२३ च्या अल-निनोमध्ये मराठवाड्यात ४२% पेरण्या कमी झाल्या होत्या, तसेच २०२७ मध्ये होईल. बीड, धाराशिवमध्ये टँकरची संख्या ५०० वरून १५०० वर जाईल.

**उपाय -** आत्तापासून प्रत्येक गावात ५ माती नाला बांध. शेततळे खोदून ठेवा. कमी पाण्याचे पीक - बाजरी, हरभरा याकडे वळा.

२. दुसरा फटका-उत्तर महाराष्ट्र व खानदेश.

धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक ,अहिल्यानगर (नगर)

**परिणाम-**तापी, गिरणा, गोदावरी नद्यांना पाणीच कमी येईल.शिरपूर, साक्री, शिंदखेडा येथे कापसाच्या परिणाम होईल.

नाशिकच्या पूर्व भागात (सिन्नर, येवला) द्राक्ष बागांना पाणी कमी पडेल. धुळे जिल्ह्यातील ४ ही तालुके आधीच दुष्काळसदृश्य यादीत आहेत, २०२७ मध्ये ते पूर्ण दुष्काळी होतील.

**उपाय -** हाच शिरपूर पॅटर्न.नदी खोलीकरण, गाळ शेतात टाकणे, विहीर पुनर्भरण. एका उन्हाळ्यात ३०० कोटी लिटर पाणी अडवता येते हे शिरपूरने दाखवले आहे.

३. तिसरा फटका - पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळी पट्टा.

सोलापूर (११ च्या ११ तालुके), सांगली (जत, आटपाडी, कवठेमहांकाळ), सातारा (माण, खटाव, फलटण), पुणे (बारामती, इंदापूर, दौंड)

**परिणाम** - उजनी धरण २०२६ मध्ये ८०३ भरले असेल तरी २०२७ च्या मे पर्यंत १०% वर येईल. सोलापूरला पुन्हा भीषण पाणीटंचाई. जत, आटपाडीमध्ये चारा टंचाई, जनावरे जगवावी कशी असा प्रश्न निर्माण होईल. बारामती, इंदापूरमध्ये ऊस शेती वर साखर कारखा कृषी तज्ञांच्या सल्लाने घ्या.

**उपाय -** ऊस लागवड ५०% कमी करा. उजनीचे पाणी पिण्यासाठी राखून ठेवा. मनरेगातून नाला खोलीकरण करा.

४. विदर्भ - पिकांचा धोका.

बुलढाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर

**परिणाम -**कापूस आणि सोयाबीनला फटका. पाऊस लांबला तर दुबार पेरणीचे संकट.

२०२३ च्या अल-निनोमध्ये विदर्भात ३०% उत्पादन घटले होते.२०२७ मध्ये तसेच होण्याची शक्यता आहे.

**उपाय-** तूर, मूग यासारखी कमी दिवसाची पिके घ्या.

५. कोकण आणि घाटमाथा-तुलनेने सुरक्षित पण धोका कायम

रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, ठाणे, पालघर, कोल्हापूर (पश्चिम), पुणे (पश्चिम)

**परिणाम -** येथे पाऊस १०-१५% कमी होईल, पण तरी २००० मिमी पेक्षा जास्त पाऊस राहील. त्यामुळे दुष्काळ नाही, पण भातशेतीला फटका.आंबा, काजू उत्पादन २०% कमी होईल.

**उपाय-**पावसाचे पाणी अडवून ठेवा, ते समुद्राला जाऊ देऊ नका.

माझे अंतिम आवाहन - २०२७ साठी आत्तापासून तयारी. ‘अल-निनो’२०२७ पर्यंत टिकणार आहे, हे आता नक्की झाले आहे. मग आपण काय करणार?

१. ऑक्टोबर २०२६ ते मे २०२७ - जलक्रांती मोहीम - प्रत्येक तालुक्यात शिरपूरचे सुरेश खानापूरकर / अमरिशभाई पटेल यांचा पॅटर्न - नाला खोलीकरण, सिमेंट बंधारे, विहीर पुनर्भरण. हीच खरी तयारी.

२. सरकारने GR काढावा.‘अल-निनो पूर्वतयारी योजना’.प्रत्येक गावाला १० लाख फक्त जलसंधारणासाठी.

३. शेतकऱ्यांनी पीक बदलावे - पुढील वर्षी ऊस, भात नाही, ज्वारी, बाजरी, हरभरा असा निर्णय एप्रिल मे २७ च्या हवामान खात्याच्या रिपोर्ट नुसार करावा लागेल.

लक्षात ठेवा - दुष्काळ येणार हे कळल्यावर पण तयारी केली नाही, तर तो नशिबाचा नाही, आपल्या निष्काळजीपणाचा असेल.

पाणी अडवा, नाहीतर २०२७ मध्ये भिषन पाणी टंचाईला सामोरे जावे लागले.

**-प्राचार्य प्रशांत पाटील**

गुरूवार, दि. ८ ऑक्टोबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

# जिल्हाधिकारी यांच्या 'बोअरबंदी'ला ठेंगा दाखवणे पडले महागात!

## बांगर नगरातील विनापरवानगी बोअरवेलप्रकरणी गुन्हा दाखल, वाहन जप्तीचे आदेश

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**जनमाध्यमच्या बातमीचा इम्पॅक्ट..**

**बातमीचा इम्पॅक्ट आणि प्रशासनाची तत्काळ कारवाई यामुळे 'आदेश कागदावर कारवाई प्रत्यक्षात' या प्रश्नाला उत्तर मिळाले आहे. आता जप्तीची कारवाईही किती काटेकोरपणे होते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.**



**यवतमाळ, दि. ७ :** दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी लागू केलेल्या बोअरवेल खोदकाम बंदीला केराची टोपली दाखवत बांगर नगर परिसरात विनापरवानगी बोअरवेल खोदल्याप्रकरणी अखेर प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे.

याप्रकरणी बोअरवेल वाहन मालक सुनील रामकृष्ण ताजणे यांच्याविरुद्ध आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ तसेच भारतीय न्याय संहिता (BNS) कलम २२३ अंतर्गत यवतमाळ शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधित बोअरवेल वाहन जप्त करण्याचे आदेशही उपविभागीय अधिकाऱ्यांनी दिले आहेत. 'जिल्हाधिकाऱ्यांच्या बोअरबंदीला 'गायत्री'चा ठेंगा!' या मथळ्याखाली दैनिक जनमाध्यमने यवतमाळातील बांगर नगर परिसरात सुरू असलेल्या बोअरवेल खोदकामाचा मुद्दा प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिला होता. त्यानंतर संबंधित यंत्रणेने हालचाली वाढवत विनापरवानगी खोदकामाची प्रत्यक्ष पाहणी करून कारवाई केली. महसूलविभागाच्या लेखी तक्रारीनुसार, ३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास बांगर नगरातील महावीर किराणा समोर सुरेश झांबड यांच्या घराजवळ MH-२९ CJ-५०७३ क्रमांकाच्या वाहनाद्वारे बोअरवेल खोदकाम सुरू असल्याचे आढळले. पाहणी वेळी वाहन मालक सुनील ताजणे हे घटनास्थळी उपस्थित असल्याचे तक्रारीत नमूद आहे. जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या १ ऑक्टोबरच्या आदेशानुसार नवीन विहीर व बोअरवेल खोदण्यावर निर्बंध लागू आहेत. त्याचे उल्लंघन झाल्यास मशीन व साहित्य जप्त करून कायदेशीर कारवाईचे स्पष्ट निर्देश आहेत.

# रात्री शेतात पाणी देताना बिबट्याची दहशत, वन विभागाच्या कारवाईची प्रतीक्षा!

## वन विभागाच्या उपाययोजनांसह दिवसा विद्युत पुरवठ्याची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**बाबुळगाव, दि. ७ :** अंतरगाव पिकांना पाणी देण्यासाठी रात्री शेतात गेलेल्या शेतकऱ्यांना बिबट्याचे दर्शन झाल्याने अंतरगाव शिवारात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रात्री सुमारे ११ वाजता बिबट्या दिसून आल्याने शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

गेल्या महिनाभरापासून परिसरात बिबट्याचा वावर असल्याचा दावा शेतकऱ्यांनी केला आहे. कपाशी व तूर पिके वाचविण्यासाठी शेतकऱ्यांना रात्री १० नंतर शेतात पाणी द्यावे लागते. त्यामुळे अंधारात शेतात जाणाऱ्या शेतकऱ्यांवर वन्यप्राण्यांच्या हल्ल्याचा धोका वाढला आहे. मोठी दुर्घटना घडल्यानंतरच उपाययोजना होणार का? असा संतप्त सवाल शेतकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे. दरम्यान, मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी महावितरण कंपनीने शेतकऱ्यांना दिवसा पुरेसा व नियमित विद्युत पुरवठा देण्याची मागणी पुढे आली आहे.मात्र सद्यस्थितीत महावितरण कंपनी शेतकऱ्यांना रात्री दहा वाजता वीज पुरवठा सुरू करत आहे. दिवसा वीज उपलब्ध झाल्यास शेतकऱ्यांना उजेडात पिकांना पाणी देता येईल आणि रात्री शेतात जाण्याची वेळ टाळता येईल. शेतकरी तसेच वन्यप्राण्यांच्या सुरक्षिततेलाही हातभार लागणार आहे. वन विभागाने तातडीने घटनास्थळी पाहणी करून बिबट्याच्या वावराचा मागोवा घ्यावा, आवश्यक प्रतिबंधात्मक उपाय करावेत आणि महावितरणने शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी शेतकऱ्याकडून होत आहे.

# संस्कृती संवर्धन विद्यालयात पंधरावा स्मृतिदिन..!

**राळेगाव, दि. ७ :** संस्कृती संवर्धन महिला संस्था, यवतमाळद्वारा संचालित संस्कृती संवर्धन विद्यालयात वैदर्भीय कवयित्री तथा संस्थापिका स्व. विजयाताई एंबडवार यांचा पंधरावा स्मृतिदिन विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. प्रतिमापूजन व माल्यार्पणानंतर विद्यार्थ्यांनी त्यांच्या जाणीवा, बालजगत, शैला या काव्यसंग्रहातील रचनांचे काव्यगायन करून काव्यपुष्पांजली अर्पण केली. मुख्याध्यापक दिनेश उघडे यांनी विजयाताईंच्या कार्याला उजाळा देत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी सेवानिवृत्त शिक्षक देवेंद्र मून, कर्मचारी विलासराव ठाकरे यांचा सत्कार करण्यात आला. दहावीतील सुजल वाऱ्हेकर व प्रतीक्षा कुडमेथे यांचा गुणवंत म्हणून गौरव झाला. अध्यक्षस्थानी जानराव गिरी, तर प्रमुख पाहुणे दिनेश गंधे होते. सूत्रसंचालन राकेश नक्षिणे यांनी केले.

## थोडक्यात

### अमली पदार्थांच्या विळख्यात युवक असल्यास, पोलिसांना माहिती द्या!

**गांजा, एमडीसह अमली पदार्थांची विक्री, वाहतूक व सेवनाविरोधात महागाव पोलिसांचा इशारा**

**महागाव :** शहर व ग्रामीण परिसरात अमली पदार्थांची विक्री, खरेदी,



वाहतूक अथवा सेवन होत असल्याचे निदर्शनास आल्यास नागरिकांनी तात्काळ पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन पोलीस निरीक्षक सेवानंद वानखडे यांनी केले आहे.

गांजा, एमडीसह इतर अमली पदार्थांच्या सेवनामुळे युवक व विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात येण्यासोबतच सामाजिक वातावरणावरही गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अमली पदार्थमुक्त समाजासाठी नागरिकांनी पोलिसांच्या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे. माहिती देणाऱ्या नागरिकाचे नाव व ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येणार असून, संबंधित व्यक्तीच्या सुरक्षिततेचीही आवश्यक ती काळजी घेतली जाईल. त्यामुळे कोणत्याही दबावाला अथवा भीतीला बळी न पडता अमली पदार्थांच्या गैरप्रकाराची माहिती पोलिसांना द्यावी, असे पोलिसांनी स्पष्ट केले. माहितीसाठी ८७६६०६५३३५ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



### विवेकानंद अभ्यासिकेत घडला डॉक्टर! सोहम गावंडेची एमबीबीएसला झेप..

**महागाव :** प्रतिकूल परिस्थितीला न जुमानता मेहनत, जिद्द आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर स्वामी विवेकानंद अभ्यासिकेतील विद्यार्थी सोहम संदीप गावंडे याने वैद्यकीय प्रवेश परीक्षेत उल्लेखनीय यश मिळविले. ७२० पैकी ५५६ गुण मिळवत त्याने स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई येथे एमबीबीएस अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळविला.
सोहमच्या या यशाने केवळ त्याचे वैद्यकीय क्षेत्रातील स्वप्न साकार होण्याचा मार्ग खुला झाला नसून, स्वामी विवेकानंद अभ्यासिकेच्या गुणवत्तेवरही शिक्कामोर्तब झाले आहे. शिस्तबद्ध वातावरण, सातत्यपूर्ण अभ्यास आणि जिद्द यांची सांगड घातल्यास ग्रामीण भागातील विद्यार्थीही मोठी शैक्षणिक झेप घेऊ शकतात, हे सोहमने सिद्ध केले. या यशाबद्दल अभ्यासिकेच्या वतीने सोहमचा सत्कार करण्यात आला. उपस्थित विद्यार्थी व पदाधिकाऱ्यांनी त्याचे अभिनंदन करून भावी वैद्यकीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. समाजसेवेचे स्वप्न उराशी बाळगणाऱ्या भावी डॉक्टर सोहमवर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### स्वच्छ गावासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्या; रोगराईला द्या आळा : भास्कर पेरे पाटील

**झरी :** गावात अस्वच्छता निर्माण करण्यापेक्षा गाव स्वच्छ व सुंदर



ठेवण्यासाठी प्रत्येक नागरिकाने पुढाकार घ्यावा. स्वच्छ परिसरामुळे रोगराईला आळा बसतो आणि नागरिकांचे आरोग्यही चांगले राहते. त्यामुळे गावाच्या स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य देऊन नागरिकांनी सामूहिक प्रयत्न करावेत, असे आवाहन पाटोदा गावचे सरपंच भास्कर पेरे पाटील यांनी केले.
मुकुटबन येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सोमवारी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी त्यांनी ग्रामस्वच्छता, पर्यावरण संवर्धन, स्वच्छ पाणी आणि नागरिकांची सामाजिक जबाबदारी यावर मार्गदर्शन केले. "गावचा सरपंच हा गावाचा म्होरक्या असतो. मात्र गाव स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी केवळ सरपंच किंवा ग्रामपंचायतीची नसून प्रत्येक ग्रामस्थाची आहे. नागरिकांनी पहाटेपासूनच स्वच्छतेला सुरुवात करून रस्ते, सार्वजनिक ठिकाणे आणि गावचा परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी पुढाकार घ्यावा," असे पेरे पाटील यांनी सांगितले.गावातील नागरिकांना स्वच्छ पिण्याचे पाणी मिळणे अत्यंत आवश्यक आहे. नदी, नाले व जलस्रोत प्रदूषित होणार नाहीत, याची काळजी प्रत्येकाने घ्यावी. मृत व्यक्तीच्या अंत्यसंस्कारानंतरची राख नदी अथवा पाण्यात न टाकता शेतात टाकावी, जेणेकरून जलप्रदूषण टाळता येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. पर्यावरण संवर्धनासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्याचे आवाहन करताना पेरे पाटील म्हणाले की, "झाडे ही आपल्या जीवनाचा आधार आहेत. फळझाडांसह विविध प्रकारची झाडे लावून त्यांचे संगोपन करणे गरजेचे आहे." झाडांमुळे शुद्ध हवा, ऑक्सिजन आणि निसर्गरम्य वातावरण मिळते. तसेच पर्यावरणाचा समतोल राखण्यास आणि पावसाचे प्रमाण वाढण्यासही मदत होते, असे त्यांनी नमूद केले.

# उपोषणस्थळी धाव घेत सीईओंनी निवेदन स्वीकारले,कलावंतांना न्यायाचे आश्वासन..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ७ :** ज्येष्ठ कलावंत निवड प्रक्रियेत झालेल्या कथित अनियमिततेविरोधात सुरू असलेल्या साखळी उपोषणाची अखेर प्रशासनाने दखल घेतली. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी बुधवारी उपोषणस्थळी भेट देऊन आंदोलनकर्त्या कलावंतांशी संवाद साधला. त्यांचे निवेदन स्वीकारत मागण्यांबाबत योग्य कार्यवाही करून न्याय मिळवून देण्याचे आश्वासन दिले.

यावेळी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कलावंत वारकरी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी निवड प्रक्रियेतील अनियमितता, अन्यायग्रस्त कलावंतांचे प्रश्न आणि प्रलंबित मागण्या सीईओंसमोर मांडल्या. या प्रश्नावर जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी तसेच संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनात तातडीची बैठक घेण्यात येणार आहे. दरम्यान, आंदोलनाच्या सहाव्या दिवशी वणी, मारेगाव व झरी-जामणी तालुक्यातील कलावंत सहभागी होणार असून भजन गायन आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ८ ऑक्टोबरला आर्णी, केळापूर व घाटंजी तालुक्यातील कलावंत साखळी उपोषणात सहभागी होणार आहेत. प्रशासनाने ८ ऑक्टोबरपर्यंत ठोस निर्णय न घेतल्यास सोळाही तालुक्यांतील प्रत्येकी एक कलावंत आमरण उपोषण सुरू करेल, असा इशारा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. श्याम खंडारे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

# खड्डे बुजवण्याच्या नावाखाली मुरुमाचा लेप, अपघातांचा धोका गडद !

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. ७ :** शहरातील अनेक डांबरी रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली असताना खड्डे बुजविण्याच्या नावाखाली दगड-मिश्रित मुरूम टाकून रस्त्यांवर लेप देण्याचा प्रकार सुरू आहे. ५ ऑक्टोबरपासून सुरू असलेल्या या कामामुळे खड्डे बुजण्याऐवजी वाहनधारकांच्या अडचणी वाढल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.

स्टेट बँक चौक ते परिवार मॉलमार्गे लक्ष्मीनगर पुलापर्यंतचा रस्ता गेल्या पाच-सहा वर्षांपासून खराब असून, नव्याने डांबरीकरण अथवा सिमेंट रस्त्याची मागणी सातत्याने होत आहे. मात्र, कायमस्वरूपी उपाययोजना करण्याऐवजी मुरूम टाकून तात्पुरती मलमपट्टी केली जात असल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. दरवर्षी शहरातील १५ प्रभागांमधील खड्डे बुजविण्यासाठी लाखो रुपयांचे ठेके दिले जात असल्याचे सांगितले जाते. मात्र, दगडयुक्त मुरूम रस्त्यावर टाकल्याने दुचाकीस्वार, ऑटोचालक, विद्यार्थी तसेच पादचाऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. वाहनांच्या टायरखालील दगड उडून घरांच्या व दुकानांच्या काचा तसेच नागरिकांना दुखापत होण्याचा धोका निर्माण झाला आहे. नवीन रस्त्याची प्रक्रिया तातडीने सुरू करा, अन्यथा जनआंदोलन छेडू, असा इशारा भीमशक्ती सामाजिक संघटनेचे संतोष अंभोरे यांनी दिला आहे.

# खड्ड्यांत हरवला गुंज-सवना, कलगाव रस्ता!

## डांबरीकरणाच्या प्रतीक्षेत नागरिक

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**गुंज, उमरखेड/महागाव, दि. ७ :** गुंज–सवना व कलगाव या महत्त्वाच्या मार्गाची दुरवस्था आता वाहनधारकांच्या जीवावर बेतण्याची स्थिती निर्माण झाली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित असलेल्या या रस्त्यावर ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून, डांबर उखडल्याने मार्गाची अक्षरशः चाळण झाली आहे.

त्यामुळे हा रस्ता सध्या 'अपघाताचा मार्ग' ठरत असल्याचे चित्र आहे. गुंज, सवना, कलगावसह परिसरातील नागरिकांसाठी हा मार्ग दळणवळणाचा प्रमुख आधार आहे. मात्र खड्डे, खडबडीत पृष्ठभाग आणि उखडलेल्या डांबरीकरणामुळे दुचाकीस्वार व चारचाकी वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रात्रीच्या वेळी खड्डे स्पष्ट दिसत नसल्याने अपघाताचा धोका अधिकच वाढला आहे. नागरिकांनी आणखी किती दिवस जीव मुठीत घेऊन प्रवास करायचा? असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. रस्त्याची पाहणी करून तातडीने दुरुस्ती व दर्जेदार डांबरीकरण करण्याची मागणी होत असतानाही प्रशासनाची उदासीनता कायम आहे. मोठी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का? असा सवाल नागरिकांकडून केला जात असून, सार्वजनिक बांधकाम विभाग व लोकप्रतिनिधींनी आश्वासनांपलीकडे जाऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# लाडकी बहीण योजनेत पात्र महिलांची फरफट,पुसद काँग्रेसचा जनता दरबार

## प्रशासकीय अडचणी दूर करून लाभ मिळवून देणार - डॉ. मोहम्मद नदीम

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. ७ :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ पात्र असूनही विविध प्रशासकीय अडचणींमुळे वंचित राहिलेल्या महिलांच्या तक्रारी जाणून घेण्यासाठी पुसद तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने जनता दरबार घेण्यात आला.

अर्जातील त्रुटी, केवायसी, कागदपत्रे, बँक खाते व आधार संलग्नता तसेच पात्रता असूनही लाभ न मिळण्याच्या तक्रारी महिलांनी मांडल्या. या वेळी प्रदेश काँग्रेसचे महासचिव डॉ. मोहम्मद नदीम यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम झाला. डॉ. सारिका सचिन नाईक, ॲड. वासिम अहमद, ज्ञानदीप कांबळे, शहराध्यक्ष झिया शेख यांच्यासह पदाधिकारी व नगरसेवक उपस्थित होते. पात्र महिलांना केवळ प्रशासकीय अडचणींमुळे योजनेपासून वंचित ठेवले जाऊ नये. प्राप्त तक्रारींचा संबंधित विभागाकडे पाठपुरावा करून न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू अशी भूमिका डॉ. नदीम यांनी मांडली. जनता दरबाराला असंख्य महिला उपस्थित होत्या.

# घोषणांचा पाऊस थांबवा, शेतकऱ्यांना मदतीचा हात द्या!

## पीकविमा व कर्जमाफीसाठी सचिन मनवर यांचे बेमुदत अन्नत्याग

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. ७ :** कापूस, सोयाबीन व तूर पिकांवर पावसाच्या खंडाचा गंभीर परिणाम झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. जिल्ह्यातील सर्व १६ तालुके दुष्काळाच्या छायेत असताना शासनाने केवळ घोषणा न करता प्रत्यक्ष मदत द्यावी, या मागणीसाठी शेतकरी चळवळ, यवतमाळ ग्रामीणच्या माध्यमातून सचिन मनवर यांनी बुधवार, ७ ऑक्टोबरपासून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेसमोर बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरू केले.

महासम्राट बळीराजाला अभिवादन करून तसेच कापूस, सोयाबीन व तुरीची पूजा करून आंदोलनाला सुरुवात करण्यात आली. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये नुकसानभरपाई, २०२४ ते २०२६चा प्रलंबित पीकविमा, दोन लाखांचे प्रोत्साहनपर अनुदान, कर्जमाफी आणि तातडीने पीककर्ज उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे. रब्बी हंगामासाठी पाणी, वीज व कर्जाची स्वतंत्र व्यवस्था करावी, तसेच तलाव, बंधारे व जलसाठ्यांच्या माध्यमातून कायमस्वरूपी सिंचनाचे नियोजन करावे, अशीही मागणी आहे. "घोषणांपेक्षा आता प्रत्यक्ष मदत हवी," अशी भूमिका घेत मागण्या मान्य होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार मनवर यांनी व्यक्त केला.

# मानकर यांना मतदारांचा वाढता कौल,मोघे समोर महायुतीचे आव्हान

✦जनमाध्यम | प्रतिनिधी





**यवतमाळ, दि. ७ :** दिग्रस यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीची रणधुमाळी आता निर्णायक टप्प्यात पोहोचली असून, अनुसूचित जाती मतदारसंघातील मिलिंद मानकर विरुद्ध संजय मोघे या थेट लढतीकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

महायुतीकडून मिलिंद मानकर, तर महाविकास आघाडीकडून संजय मोघे मैदानात असल्याने या निवडणुकीला स्पष्ट राजकीय रंग चढला आहे. सहकार क्षेत्रातील अनुभव, मतदारांशी थेट संपर्क आणि यापूर्वी दोन वेळा पंचायत समिती सभापती म्हणून केलेले काम या जोरावर मिलिंद मानकर मतदारांमध्ये आपली पकड मजबूत करण्याचा प्रयत्न करीत आहेत. रामदास आठवले मागासवर्गीय कापूस उत्पादक शेतकरी सहकारी सूतगिरणीचे संस्थापक अध्यक्ष तसेच दिग्रस बाजार समितीचे संचालक म्हणून त्यांची सहकार क्षेत्रातील भूमिका अधोरेखित होत आहे. दुसरीकडे, संजय मोघे यांनीही पंचायत समिती सभापती म्हणून केलेल्या कामाचा आधार घेत मतदारांशी संपर्क वाढविला आहे. त्यामुळे ही लढत केवळ दोन उमेदवारांची नसून महायुती विरुद्ध महाविकास आघाडीच्या प्रतिष्ठेची ठरत आहे. सध्या मतदारांचा कल मानकरांच्या बाजूने असल्याची चर्चा असली, तरी अंतिम फैसला ११ ऑक्टोबरच्या मतदानातून होणार आहे. १२ ऑक्टोबरचा निकाल कोणाच्या राजकीय प्रभावावर शिक्कामोर्तब करतो, याकडे सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

# पाणी कपातीपूर्वी गळती रोखा,हजारो लिटर पाण्याचा अपव्यय थांबवा..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**वितरण पाइपलाइन मधूनच पाण्याची नासाडी**
**संदीप रत्नपारखींनी प्रशासनाला धरले धारेवर**

**दिग्रस, दि. ७ :** शहरात पाणी बचतीचे आवाहन केले जात असतानाच नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा यंत्रणेतील विविध ठिकाणच्या गळतीमधून मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात असल्याचा मुद्दा सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार तथा शिवसेना उपशहर प्रमुख संदीप रत्नपारखी यांनी उपस्थित केला आहे. एकीकडे नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन केले जाते; तर दुसरीकडे नगरपरिषदेच्या वितरण पाइपलाइनमधूनच मोठ्या प्रमाणात पाण्याचा अपव्यय होत असल्याचे निदर्शनास येत असल्याचे रत्नपारखी यांनी म्हटले आहे. त्यामुळे नागरिकांवर पाणी कपातीचे निर्बंध लादण्यापूर्वी प्रशासनाने स्वतःच्या पाणीपुरवठा यंत्रणेतील गळती रोखावी, अशी मागणी त्यांनी केली. मुख्य जलस्त्रोतापासून शहरातील विविध भागांपर्यंतच्या संपूर्ण पाणीपुरवठा यंत्रणेची तपासणी करणे गरजेचे



आहे. पाइपलाइन, व्हॉल्व्ह, जोडण्या तसेच इतर तांत्रिक बाबींची पाहणी करून ज्या ठिकाणी गळती आहे ती तातडीने दुरुस्त करावी, अशी मागणी रत्नपारखी यांनी केली.आधी गळती बंद करा, मगच पाणी कपातीचा विचार करा,अशी भूमिका घेत उपलब्ध पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण होत असताना एकीकडे नागरिकांना पाणी बचतीचे आवाहन करणे आणि दुसरीकडे वितरण व्यवस्थेतील गळतीकडे दुर्लक्ष करणे योग्य ठरणार नाही, असेही त्यांनी म्हटले. नगरपरिषद प्रशासनाने पाणी कपातीचा निर्णय घेण्यापूर्वी शहरातील संपूर्ण पाणीपुरवठा यंत्रणेचे सर्वेक्षण करून गळतीच्या ठिकाणांची दुरुस्ती करावी आणि पाण्याचा होणारा अपव्यय थांबवावा, अशी मागणी संदीप रत्नपारखी यांनी केली आहे.

# कौटुंबिक वादातून ६० वर्षीय इसमाची आत्महत्या

## नागापूर रुपाळा येथील घटना,चिठ्ठीच्या आधारे तिघांविरुद्ध गुन्हा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. ७ :** तालुक्यातील नागापूर रुपाळा येथे मारोती परसराम कांबळे (६०) यांनी ७ ऑक्टोबर रोजी पहाटे राहत्या घरासमोरील लिंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. घटनास्थळी पोलिसांना त्यांच्या खिशात चिठ्ठी आढळली. कौटुंबिक वादातून व धमक्यांमुळे वडिलांनी आत्महत्या केल्याचा आरोप मुलगा पवन कांबळे (२३) याने तक्रारीत केला आहे. चिठ्ठीत उल्लेख असलेल्याच्या आधारे सुनीता कांबळे (३५), दत्ता विनकरे (४०) आणि सारजाबाई दुधडकर (७०) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास फौजदार गणेश मुंडे करीत आहेत.

# मुकूटबन पोलिसांचा नशाविरोधात कडक इशारा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

> **"अमली पदार्थांमुळे तरुणांचे भविष्य धोक्यात येऊ नये, यासाठी नागरिकांनी पुढाकार घेऊन अशा गैरप्रकारांची माहिती पोलिसांना द्यावी."**
> **— सतीश जाधव, पोलीस निरीक्षक, मुकूटबन पोलीस ठाणे**

**झरी, दि. ७ :** शहरासह ग्रामीण भागात अमली पदार्थांच्या वाढत्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी मुकूटबन पोलिसांनी कडक भूमिका घेतली आहे. गांजा, एमडी तसेच इतर अंमली पदार्थांची विक्री, सेवन किंवा साठवणूक करणाऱ्या व्यक्तींविषयी माहिती तातडीने पोलिसांना द्यावी, असे आवाहन पोलीस निरीक्षक सतीश जाधव यांनी केले आहे.

मुकूटबन पोलीस ठाण्याच्या हद्दीत अमली पदार्थांशी संबंधित कोणताही प्रकार निदर्शनास आल्यास नागरिकांनी तत्काळ पोलिसांशी संपर्क साधावा. माहिती देणाऱ्या व्यक्तीचे नाव पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येईल. तसेच माहिती देणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेची पुरेपूर काळजी घेतली जाईल, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. अमली पदार्थांच्या विळख्यात तरुणाई सापडू नये आणि परिसर नशामुक्त व्हावा, यासाठी पोलिसांकडून जनजागृतीसोबतच आवश्यक ती कारवाई करण्यात येत आहे.

## गणोरी येथे सेवा संकल्प अभियानांतर्गत आरोग्य शिबीर



**अमरावती-** सेवा संकल्प अभियान तसेच 'माझे गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियानांतर्गत गणोरी तालुका भातकुली येथे श्री संत महंमद खान महाराज पुण्यातिथी महोत्सवानिमित्त विविध आरोग्यविषयक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. आयुष्मान आरोग्य मंदिर, उत्तमसरा तसेच श्री संत महंमद खान महाराज संस्थान गणोरी यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिर, नेत्र तपासणी शिबिर आणि आरोग्य तपासणी व एनसीडी कॅम्प उत्साहात पार पडला.

श्री संत महंमद खान महाराज संस्थानच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात बालाजी रक्तपेढीच्या सहकार्याने ३७ रक्तदात्यांनी रक्तदान केले. महात्मे आय हॉस्पिटलच्या वतीने घेण्यात आलेल्या नेत्र तपासणी शिबिरात १२३ लाभार्थ्यांची नेत्र तपासणी करण्यात आली.

यामध्ये ४६ रुग्णांना मोतीबिंदूचे निदान झाले असून, त्यांना पुढील उपचार व शस्त्रक्रियेसाठी संदर्भित करण्यात आले. तसेच १२ लाभार्थ्यांमध्ये रिफ्रॅक्शन एरर आढळून आला.

शिबिरात नागरिकांची रक्तदाब व रक्तशर्करा तपासणी करण्यात आली. एकूण ११० लाभार्थ्यांनी एनसीडी तपासणीचा लाभ घेतला. तपासणीदरम्यान ३ नवीन रक्तदाबाचे रुग्ण, २ नवीन दमा रुग्ण आढळून आले, तर १ लाभार्थ्यास हृदयरोगाच्या पुढील तपासणीसाठी संदर्भित करण्यात आले.

# सिंभोरा धरणाचा घटलेला जलस्तर आणि पाणीपुरवठ्याचे गणित

**अमरावती/का.प्र.**

यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने जिल्ह्यातील जलसाठ्याची स्थिती चिंताजनक बनली असून, त्याचा परिणाम भविष्यात पिण्याच्या पाणीपुरवठ्यावरही होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शहरासह ग्रामीण भागातील काही गावांना सिंभोरा येथील उर्ध्व वर्धा धरणातून पाणीपुरवठा केला जातो. मात्र, गतवर्षीच्या तुलनेत यंदा धरणातील पाणीसाठा मोठ्या प्रमाणात कमी असल्याने आगामी काळात पाणी कपातीचे संकट निर्माण होण्याची शक्यता आहे.

जिल्ह्यातील विविध धरणात यंदा गतवर्षाच्या तुलनेत जलसाठ्यात तब्बल २५ टक्क्यांहून अधिक घट झाली आहे. जिल्ह्यातील एकमेव मोठ्या प्रकल्पातील उर्ध्व वर्धा अर्थात सिंभोरा धरणात सध्या ३२८.३४ दशलक्ष घनमीटर म्हणजे ५८.२१ टक्के उपयुक्त पाणीसाठा आहे.

या धरणातून अमरावती शहरासह ग्रामिण भागातही पाणीपुरवठा केला जात असल्याने धरणातील उपलब्ध साठ्याचे



नियोजन अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. मजीप्रासाठी सुमारे ५८ दशलक्ष घनमीटर पाणी आरक्षित ठेवण्यात आले आहे. या आरक्षित पाण्यातूनच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून सुमारे १ लाख ४ हजार ग्राहकांना एक दिवसाआड पाणीपुरवठा केला जातो. एका ग्राहकाला प्रतिदिन १३५ लिटर या प्रमाणात पाणीपुरवठा केला जात असल्याने मजीप्राला दररोज सुमारे १५० दशलक्ष लिटर पाण्याची आवश्यकता असते. सध्या पाणीपुरवठा नियमित असला तरी धरणातील साठा कमी होत गेल्यास पाणीपुरवठ्याच्या नियोजनावर त्याचा परिणाम होऊ शकतो.

**बाष्पीभवनामुळेही पाणीसाठ्यात घट**

ऑक्टोबरपासून उन्हाची तीव्रता वाढत असल्याने धरणातील पाण्याचे मोठ्या प्रमाणावर बाष्पीभवन होण्याची शक्यता आहे. उपलब्ध पाण्यापैकी सुमारे १०० दशलक्ष घनमीटर पाणी बाष्पीभवनामुळे कमी होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. याशिवाय धरणातील पाणी सिंचन, औद्योगिक वापर आणि अन्य गरजांसाठीही आरक्षित आहे. उन्हाळ्यात धरणातील जलस्तर आणखी खालावल्यास पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्यावरही परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे नागरिकांनी आतापासूनच पाण्याचा काटकसरीने वापर करून अपव्यय टाळण्याची गरज आहे.

## मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयात आर्थिक साक्षरतेवर मार्गदर्शन

**अमरावती/का.प्र.**

श्री. शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीद्वारा संचालित मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयात 'आर्थिक साक्षरता' या विषयावर मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. आजच्या आधुनिक आणि बदलत्या आर्थिक युगात पैशाचे महत्त्व, बचत, योग्य गुंतवणूक, आर्थिक फसवणूक टाळण्याचे उपाय तसेच वृद्धापकाळात आर्थिक सुरक्षितता कशी निर्माण करता येईल, याबाबत अतुल खराडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. दैनंदिन व्यवहारातून मिळणाऱ्या उत्पन्नातील काही रक्कम नियमितपणे बाजूला काढून तिची योग्य ठिकाणी गुंतवणूक केल्यास कालांतराने त्याचे मोठ्या रकमेत रूपांतर होऊ शकते.यावेळी शेअर बाजार, म्युच्युअल फंड तसेच विविध गुंतवणूक पर्यायांमध्ये गुंतवणूक करताना कोणती काळजी घ्यावी, आर्थिक व्यवहारांमध्ये सुरक्षितता कशी राखावी आणि फसवणुकीपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे, याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले. बचत आणि गुंतवणूक ही केवळ मोठ्या उत्पन्न असलेल्या व्यक्तींसाठी नसून, नियमितपणे थोडी-थोडी बचत करून प्रत्येक व्यक्ती आपले आर्थिक भविष्य सुरक्षित करू शकते, असे त्यांनी स्पष्ट केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. स्मिता देशमुख होत्या. अध्यक्षीय मनोगतात त्यांनी विद्यार्थ्यांना लहान वयापासूनच बचतीची आणि योग्य गुंतवणुकीची सवय लावण्याचे आवाहन केले. आज केलेली छोटीशी गुंतवणूक भविष्यात मोठा आधार ठरू शकते. त्यामुळे आर्थिक नियोजनाची सवय विद्यार्थीदशेपासूनच विकसित होणे गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे संचालन अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. जे. डी. सांगोडे यांनी केले. आपल्या मार्गदर्शनात त्यांनी अर्थशास्त्र विषयाचे दैनंदिन जीवनातील महत्त्व स्पष्ट केले. पैसा, त्याचा योग्य वापर, बचत



आणि गुंतवणूक यांचा परस्पर संबंध समजून घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.कार्यक्रमास महाविद्यालयातील मोठ्या संख्येने प्राध्यापकवृंद, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते. आर्थिक साक्षरतेसारख्या महत्त्वाच्या विषयावर मिळालेल्या मार्गदर्शनाचा उपस्थितांना भविष्यातील आर्थिक नियोजनासाठी निश्चितच लाभ होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त केला.

# त्रिवेणी संगम परिसरातील शिवारात बिबट्याचा वावर

## शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण

**अचलपूर/वार्ताहर**

शहरातील चांदुर बाजार नाका ते चांदूरबाजार मार्गावरील त्रिवेणी संगम परिसरात काल ७ ऑक्टोबर रोजी सकाळी शेतात काम करीत असताना दोन शेतकऱ्यांना बिबट्याचे दर्शन झाल्याची माहिती समोर आली आहे.याबाबत वनपरिक्षेत्र विभाग परतवाडा कडे शेतकऱ्यांनी तक्रार ही दिली आहे.या परिसरात वनपरिक्षेत्र विभागाचे पथक आता त्या बिबट्याचा शोध घेणार आहे.

एकीकडे गेल्या काही दिवसांपासून निजामपूर - बोपापूर शिवारात बिबट्याचा वावर असल्याची चर्चा मोठ्या प्रमाणात सुरू आहे.यामुळे शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.काही शेतकऱ्यांना बिबट्याचा हालचाली दिसल्याने याबाबत वनपरिक्षेत्र विभाग परतवाडा कडे तक्रारी देण्यात आल्या होत्या.त्यानंतर वनपरिक्षेत्र विभाग परतवाडा तर्फे १२ कर्मचाऱ्याचे पथक गस्तीवर असून त्या बिबट्याचा शोध घेत होते.यासाठी वनपरिक्षेत्र विभाग परतवाडा कडून बोपापूर भागात पिंजरा सुद्धा लावण्यात आला होता.आणि बिबट्याचा हालचाली वर लक्ष ठेवण्यासाठी ड्रॉनकेमरा, सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा माध्यमातून लक्ष ठेवले जात होते .मात्र या कॅमेरे मध्ये बिबट्याची हालचाली



कैद झाली नसल्याची माहिती परतवाडा वनपरिक्षेत्र अधिकारी निशा मोकाशे यांनी बोलताना दिली .आता त्रिवेणी संगम परिसरात काल ७ ऑक्टोबर रोजी सकाळी बिबट्याचे दर्शन शेतकऱ्यांना झाल्याने शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.प्राप्त माहितीनुसार ,त्रिवेणी संगम परिसरात जीवनपुरा निवासी अरुण पांडे यांचे शेत आहे .काल ७ ऑक्टोबर रोजी सकाळी ते शेतात काम करीत होते. त्यांच्या सोबत हिरापुरा येथील शेतकरी हसन खा सुद्धा उपस्थितीत होते.एकीकडे चमक ,नायगाव बोर्डी नंतर बोपापूर ,निजामपूर परिसरात बिबट्याचा वावर अनेक शेतकऱ्यांना दिसला होता.

वनपरिक्षेत्र विभागाचे पथक सुद्धा त्या बिबट्याचा शोध घेत आहे.मात्र त्या बिबट्याचा शोध लावण्यात वनपरिक्षेत्र विभागाला यश आलेले नाही. कोणतीही अनुचित घटना घडण्यापूर्वी ठोस उपाययोजना वनपरिक्षेत्र विभाग परतवाडा ने राबविण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

**-निशा मोकाशे,**
वनपरिक्षेत्र अधिकारी,परतवाडा

## ऑफ्रोहच्या राज्याध्यक्षपदी डॉ.दीपक केदार, कोषाध्यक्ष म्हणून मनिष पंचगाम

**अमरावती/का.प्र.**

ऑर्गनायझेशन फॉर राईट्स ऑफ ह्युमन (ऑफ्रोह) महाराष्ट्र या संघटनेच्या राज्याध्यक्ष पदी अमरावती येथील डॉ.दीपक केदार यांची नुकत्याच झालेल्या राज्यव्यापी अधिवेशनात निवड करण्यात आली. यापुर्वी ते महासचिव पदावर कार्यरत होते.



ऑफ्रोहच्या राज्य विषय नियामक मंडळ ची बैठक व सर्वसाधारण सभेच्या उद्घाटन समारंभ चे उद्घाटन आमदार मा प्रविणभाऊ तायडे यांचे हस्ते झाले. प्रमुख अतिथी म्हणून महानगरपालिकेच्या शिक्षण सभापती प्रिर्ती हर्षल रेवणे या होत्या. माजी राज्याध्यक्ष शिवानंद सहारकर हे सभेच्या अध्यक्षस्थानी होते.कार्यक्रमाचे अध्यक्ष शिवानंद सहारकर यांनी ऑफ्रोहच्या निर्मिती व वाटचालीवर प्रकाश टाकला.

राज्याध्यक्ष राजेश सोनपरोते यांनी आपलया प्रास्ताविक भाषणात महाराष्ट्र शासन संघटीत आदिवासी लोकप्रतिनिधींना हाताशी धरून असंघटित आदिवासीं जनतेवर कसा अन्याय करते यावर प्रकाश टाकला.नवीन राज्य कार्यकारिणीतील नवनिर्वाचित सदस्यांनी अमरावती येथील डॉ.दीपक केदार यांची राज्याध्यक्ष या पदावर निवड केली. नागपूरचे नरेंद्र निमजे यांची महासचिव म्हणून, राज्य कार्याध्यक्ष या पदावर सोलापूर चे सुधाकर सुसलादी, राज्य कोषाध्यक्ष पदी अमरावतीचे मनिष पंचगाम यांची निवड करण्यात आली. महिला आघाडीच्या राज्य अध्यक्षपदी मुंबई येथील प्रिया खापरे, महासचिवपदी पुणे वनिता नंदनवार व कार्याध्यक्षपदी साताराच्या भारती धुमाळ, कोषाध्यक्ष पदी बुलढाण्याच्या पुष्पा कोळी यांची निवड करण्यात आली.

स्वागताध्यक्ष म्हणून डॉ.दीपक केदार यांनी सर्वांचे स्वागत करून आभार व्यक्त केले.कार्यक्रमासाठी अमरावती जिल्हा शाखेचे जिल्हाध्यक्ष यशवंत वरूडकर, कार्याध्यक्ष रतन नाथे, सुहास पंचभैय्ये, डॉ. प्रमोद पाटणकर, भगवंत पखाले, कुंदन ठाकुर, पवन ठाकूर, निताताई सोमवंशी यांनी परिश्रम घेतले.

## डासांचा प्रादुर्भाव वाढल्याने डेंग्यू व मलेरियाचे रुग्ण वाढले

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यात डासांचा प्रादुर्भाव वाढल्याने डेंग्यू, मलेरिया आणि तापाच्या रुग्णसंख्येत झपाट्याने वाढ होत असल्याचे चित्र आहे.



जिल्हा सामान्य रुग्णालयात अवघ्या वीस दिवसांत डेंग्यूचे १०, मलेरियाचे ७, तर व्हायरल फिव्हरचे तब्बल १३७ रुग्ण उपचारासाठी दाखल झाले. जिल्हा सामान्य रुग्णालयातच डेंग्यू, मलेरिया आणि व्हायरल फिव्हरच्या रुग्णांची संख्या वाढली आहे.

त्यामुळे खासगी विशेषतः पावसाळ्यात ठिकठिकाणी साचलेल्या पाण्यामुळे डासांच्या उत्पत्ती वाढत आहे. डेंग्यूचा प्रसार करणाऱ्या एडिस डासांची उत्पत्ती स्वच्छ पाण्यातही होत असल्याने नागरिकांनी अधिक खबरदारी घेण्याची गरज आहे. ताप, अंगदुखी, डोकेदुखी, अशक्तपणा यांसारखी लक्षणे आढळणाऱ्या रुग्णांची संख्या वाढत आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार, १ जानेवारी ते १७ सप्टेंबरदरम्यान जिल्ह्यात डेंग्यूचे १३६ पॉझिटिव्ह रुग्ण आढळले आहेत. त्यामुळे डेंग्यूचा प्रादुर्भाव दिवसेंदिवस वाढत असल्याचे दिसून येत आहे. जिल्हा सामान्य रुग्णालयात १४ ते २० सप्टेंबर या कालावधीत विविध आजारांवर उपचार घेण्यासाठी तब्बल ३४ हजार ८१२ रुग्ण आले होते. त्यापैकी ३ हजार ५४७ रुग्णांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. याच कालावधीत डेंग्यूचे १०, मलेरियाचे ७ आणि व्हायरल फिव्हरचे १३७ रुग्ण दाखल झाले.

# तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेत जी.एम. पेटे विद्यालय व श्रीधरपंत बनसोड कनिष्ठ महाविद्यालयाचा विजय

**ब्राम्हणवाडा थडी/वार्ताहर**

क्रीडा व युवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अमरावती यांच्या वतीने आयोजित तालुकास्तरीय खो-खो स्पर्धा तळवेल येथे उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत जी. एम. पेटे विद्यालय, श्री. श्रीधरपंत बनसोड उच्च माध्यमिक विद्यालय, ब्राम्हणवाडा थडी येथील १९ वर्षांखालील मुलींच्या संघाने आपल्या उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत तालुकास्तरावर दणदणीत विजय मिळविला.

या शानदार विजयासह संघाने जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळविली.संघाच्या कर्णधार मोहिनी संतोष सावरकर हिच्या नेतृत्वाखाली संघातील सर्वच खेळाडूंनी मैदानावर आपल्या खेळातील कौशल्य, चपळता,



वेग आणि उत्तम निर्णयक्षमता यांचा प्रभावी प्रत्यय दिला. प्रत्येक खेळाडूने प्रसंगावधान राखत प्रतिस्पर्धी संघाच्या खेळाचा अचूक अंदाज घेत उत्कृष्ट बचाव व आक्रमण केले. खेळाडूंच्या तरबेज खेळासोबतच सांघिक भावना, एकजूट, आत्मविश्वास आणि खेळाडूवृत्ती यामुळे संघाला विजय मिळविणे शक्य झाले.

वैशाली शनवारे, माही ठाकूर, अंजली इंगळे, अपर्णा तायडे, सलोनी धुर्वे, ईश्वरी गहरे, भावना लोखंडे, प्रतीक्षा आमझरे, आरुषी गवई, दर्शना माने, आरुषी इंगळे आणि प्रिया भालेकर यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत संघाच्या विजयात मोलाची भूमिका बजावली. मैदानावर एकमेकींना प्रोत्साहन देत, योग्य समन्वय साधत आणि संघाच्या विजयाला प्राधान्य देत या खेळाडूंनी सांघिक खेळाचे उत्तम उदाहरण निर्माण केले.या सामन्यांमध्ये खेळाडूंनी दाखविलेली चिकाटी, जिद्द, शिस्त, आत्मविश्वास आणि प्रतिस्पर्ध्यांप्रती आदराची भावना विशेष उल्लेखनीय ठरली.

या यशाबद्दल महात्मा फुले शिक्षण संस्था, ब्राम्हणवाडा थडीचे सचिव श्री. अशोकराव बनसोड, अध्यक्ष राहुलदादा बनसोड, मुख्याध्यापक अतुल बनसोड तसेच पर्यवेक्षक एन. एम. बोडखे,एच. एस. भगत, व्ही. आर. नेरकर, व्ही. एस. शिरनाथ, डी. बी. गावनेर, आर. डी. धुर्वे, ए. एस. सोनार, श्री. एस. के. दामदर, एम. जे. भातकुले, आर. आर. उसरबर्से, कु. डी. एम. भडके, एस. एस. कदम, बी. व्ही. राजपूत, एस. डी. पाटील, श्री. जी. व्ही. आमझरे,एस. बी. बोडखे, जी. व्ही. मेस्कर आणि श्री. डी. एस. गवई यांनी विजयी खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.संघाला शारीरिक शिक्षण शिक्षक एन. के. बोडखे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी सातत्याने सराव, शिस्त आणि मेहनतीच्या जोरावर आपल्या खेळात प्रगती साधली.

## ग्रामोन्नती फाउंडेशनकडून शेतकऱ्यांना जैविक निविष्ठांचे वाटप



**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**

गांधी जयंतीचे औचित्य साधून ग्रामोन्नती फाउंडेशन, अमरावतीच्या वतीने दोनोडा येथे शेतकऱ्यांना विविध नैसर्गिक व जैविक निविष्ठांचे मोफत वाटप करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष नाना डवंगे यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला. ग्रामोन्नती फाउंडेशन ही सेवाभावी संस्था शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीबाबत मार्गदर्शन व सहकार्य करण्याचे कार्य करीत आहे. याच उपक्रमाचा भाग म्हणून शेतकऱ्यांना दशपर्णी अर्क, निमार्क, चिकट सापळे, ट्रायकोडर्मा, रायझोबियम तसेच कामगंध सापळे आदी जैविक निविष्ठांचे निशुल्क वितरण करण्यात आले. यावेळी दोनोडा ग्रामपंचायतीचे सरपंच सुरेंद्र चौखंडे यांच्या हस्ते शेतकऱ्यांना निविष्ठांचे वाटप करण्यात आले. ग्रामोन्नती फाउंडेशनचे विश्वस्त श्रीकृष्ण गव्हाळे यांच्या प्रयत्नातून हा उपक्रम यशस्वी झाल्याचे अध्यक्ष नाना डवंगे यांनी सांगितले.नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देणाऱ्या या उपक्रमाबद्दल परिसरातील शेतकऱ्यांनी ग्रामोन्नती फाउंडेशनचे आभार मानले.

# रायसोनी विद्यापीठात पीएचडी.शोधार्थ्यांसाठी पाच दिवसीय संशोधन पद्धतीवर कार्यशाळा

**अमरावती/का.प्र.**

जी एच रायसोनी विद्यापीठ, अमरावती (जीएचआरयूए) च्या पीएच.डी. सेलने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या बॅच-सातव्याच्या नव्याने प्रवेशित पीएच.डी. शोधार्थ्यांसाठी नुकतेच पाच दिवसीय संशोधन पद्धती कार्यशाळेचे यशस्वी आयोजन केले. या कार्यशाळेत ५७ शोधार्थ्यांनी सहभाग घेतला. संशोधन पद्धतीमध्ये मजबूत पाया तयार करणे तसेच सुव्यवस्थित व प्रभावी पीएच.डी. संशोधनासाठी आवश्यक ज्ञान, कौशल्ये आणि नैतिक दृष्टिकोन विकसित करणे हा या कार्यशाळेचा उद्देश होता.



कार्यशाळेचे उद्घाटन मुख्य अतिथी डॉ. राहुल रालेगांवकर, प्राध्यापक, व्हीएनआयटी नागपूर यांच्या उपस्थितीत झाले. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. विनायक देशपांडे आणि कुलसचिव डॉ. स्नेहिल जायसवाल उपस्थित होते पाच दिवस विविध प्रतिष्ठित संस्थांतील ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ आणि तज्ज्ञांनी संशोधनाशी संबंधित महत्त्वाच्या पैलूंवर व्याख्याने दिली. यात संशोधनाची मूलभूत तत्त्वे व समस्या निर्माण, संशोधन प्रक्रिया, साहित्य समीक्षा, संशोधन लेखन व विद्वत्तापूर्ण संवाद,नमुना निवड व अनुमान, मापन व आकडेवारी संकलन, संशोधन नैतिकता,शैक्षणिक प्रकाशन, एआय साधनांचा जबाबदार वापर, संशोधन समस्येची ओळख, पीएच.डी.च्या बौद्धिक व मानसिक आव्हाने, शिकलेले ज्ञान व्यवहारात उतरवणे तसेच पाठ्य व दुय्यम आकडेवारीवर आधारित डेटा-ड्रिव्हन व्यवस्थापन संशोधनाच्या संधी या विषयांचा समावेश होता.

कार्यशाळेदरम्यान व्हीएनआयटी नागपूरचे डॉ. राहुल रालेगांवकर व डॉ. प्रांतिक बनर्जी, सी.पी. अँड बेरार ई.एस. कॉलेज, नागपूरचे डॉ. आशीष लिंगे, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे प्रा. डॉ. मोहम्मद अतीक, आयआयएम नागपूरचे डॉ. कपिल कौशिक तसेच जीएचआरयूएचे कुलगुरू व प्राध्यापक डॉ. श्रीकांत चवाटे, डॉ. सचिन पडोळे, डॉ. विनायक देशपांडे, डॉ. विश्राम बापट आणि डॉ. स्नेहिल जायसवाल यांनी विविध विषयांवर शोधार्थ्यांना मार्गदर्शन केले.सत्रांमध्ये केवळ पद्धतीगत कौशल्यांवरच नव्हे, तर टीकात्मक तसेच विश्लेषणात्मक विचार, बौद्धिक जिज्ञासा, दृढता, नैतिक जबाबदारी, लवचिकता आणि ज्ञानाला अर्थपूर्ण योगदानामध्ये रूपांतरित करण्याच्या क्षमतेवरही भर देण्यात आला. शोधार्थ्यांनी व्यावहारिक अंतर्दृष्ट्यांचे कौतुक केले. यामुळे त्यांना अधिक स्पष्टता, आत्मविश्वास आणि कठोरतेने डॉक्टरल संशोधन करण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले. कुलगुरू प्रा. डॉ. विनायक देशपांडे, कुलसचिव डॉ. स्नेहिल जायसवाल आणि विद्यार्थी कल्याण अधिष्ठाता डॉ. प्रशांत अवचट यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यशाळेचे आयोजन पीएच.डी. सेल प्रभारी डॉ. श्रीकांत चवाटे यांनी केले. डॉ. सचिन पडोळे, डॉ. स्नेहा बोहरा तसेच संपूर्ण पीएच.डी. सेल टीमच्या सदस्यांनी विशेष सहकार्य केले.

## शहराच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्रीय मंत्र्यांना निवेदन

**अचलपूर/वार्ताहर**

शहराच्या प्रलंबित विकासकामांना गती देण्यासाठी आणि पायाभूत सुविधांचा विस्तार करण्यासाठी अचलपूर नगरेपरिषदेचे नगरसेवक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी नुकतीच देशाचे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान अचलपूर शहरातील दळणवळण, रस्ते आणि इतर नागरी समस्यांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली असून, विकासात्मक मागण्यांचे निवेदन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना देण्यात आले.या शिष्टमंडळात माजी नगरसेवक विक्की सोनपरोते, नगरसेवक चंद्रेश बहोरिया, सामाजिक कार्यकर्ते नितीन आखुड, विनोद



पोटे, देविदास इंगळे, अनिकेत मिश्रा हे उपस्थित होते.

अचलपूर शहराला जोडणाऱ्या प्रमुख रस्त्यांची दुरुस्ती, वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी आवश्यक उपाययोजना, राष्ट्रीय महामार्गाशी संबंधित विविध विकासकामांवर केंद्रीय मंत्री गडकरी यांच्याशी या शिष्टमंडळाने सकारात्मक चर्चा केली. अचलपूर शहराच्या सौंदर्यीकरणासाठी आणि दळणवळणाच्या सोयी-सुविधा वाढवण्यासाठी केंद्र सरकारकडून विशेष निधी व सहकार्य मिळावे, अशी मागणी यावेळी निवेदनाद्वारे करण्यात आली.केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी शिष्टमंडळाचे म्हणणे आस्थापूर्वक ऐकून घेतले आणि अचलपूर शहराशी संबंधित रस्ते व दळणवळणाच्या प्रश्नांवर योग्य ती सकारात्मक कारवाई करण्याचे आश्वासन उपस्थित पदाधिकाऱ्यांना दिले.

# ग्राहकहिताचे पाऊल

**खाद्यपदार्थांवरील हिरवे आणि तपकिरी चिन्ह पाहून शाकाहारी- मांसाहारी पदार्थ ओळखण्याची सवय भारतीय ग्राहकांना झाली आहे. आता साबण, शाम्पू, टूथपेस्ट, फेसवॉशसह दैनंदिन वापराच्या सौंदर्यप्रसाधनांवरही अशाच प्रकारची खूण दिसणार आहे. एखाद्या उत्पादनात प्राणिजन्य घटक आहेत की नाहीत, हे स्पष्टपणे सांगण्याची जबाबदारी उत्पादकावर टाकणारा हा बदल स्वागतार्ह आहे.**



खाद्यपदार्थ खरेदी करताना पाकिटावरील हिरवा किंवा लाल संकेत पाहून त्यात शाकाहारी की मांसाहारी घटक आहेत, हे सहज समजते. आता साबण, शाम्पू, टूथपेस्ट आणि वैयक्तिक वापराच्या इतर वस्तूंबाबतही अशीच व्यवस्था लागू होण्याची शक्यता आहे. या उत्पादनांमध्ये प्राणिजन्य घटकांचा वापर झाला आहे की वनस्पतिजन्य घटकांचा, याची स्पष्ट माहिती ग्राहकांना पाकिटावरच देण्याच्या दृष्टीने सरकारने पावले उचलली आहेत. यामागचा मुख्य उद्देश ग्राहकांना उत्पादन खरेदी करण्यापूर्वी त्यातील घटकांचे स्वरूप समजावे आणि त्यानुसार निवड करता यावी, हा आहे. विशेषतः धार्मिक श्रद्धा, वैयक्तिक जीवनशैली किंवा शाकाहार-मांसाहाराबाबत विशिष्ट भूमिका असलेल्या ग्राहकांसाठी ही माहिती महत्त्वाची ठरू शकते. सध्या खाद्यपदार्थांच्या पाकिटावर हिरव्या किंवा तपकिरी संकेताद्वारे उत्पादन शाकाहारी आहे की मांसाहारी, हे दर्शविण्याची व्यवस्था आहे; मात्र साबण, शाम्पू, टूथपेस्ट, सौंदर्यप्रसाधने आणि वैयक्तिक वापराच्या अनेक वस्तूंमध्येही वनस्पतिजन्य तसेच प्राणिजन्य घटक वापरले जातात. अशा उत्पादनांच्या पाकिटावरील घटकांची यादी सामान्य ग्राहकासाठी अनेकदा गुंतागुंतीची असते. एखाद्या रासायनिक किंवा तांत्रिक नावामागे नेमका कोणत्या प्रकारचा घटक आहे, हे ग्राहकाला सहज समजत नाही. त्यामुळे खाद्यपदार्थांप्रमाणेच या वस्तूंवरही सहज ओळखता येईल असा संकेत असावा, अशी भूमिका पुढे आली आहे.

नियमांमध्ये बदल : यासाठी ग्राहक व्यवहार विभागाने वैधानिक मापनशास्त्र (पॅकेज्ड कमोडिटीज) नियम, २०११ मध्ये बदल करण्याच्या दिशेने पावले उचलली आहेत. या नियमांमध्ये सुधारणा करून पॅकबंद वस्तूंवर त्यांच्या घटकांच्या स्वरूपाविषयी अधिक स्पष्ट माहिती देण्याची व्यवस्था करण्याचा प्रस्ताव आहे. अशा प्रकारच्या व्यवस्थेबाबत २०१४मध्येही चर्चा झाली होती. त्यावेळी काही उत्पादनांवर शाकाहारी-मांसाहारी स्वरूप दर्शविण्याबाबत विचार करण्यात आला होता; मात्र आता ग्राहकांच्या माहितीच्या अधिकाराला अधिक महत्त्व देत हा मुद्दा पुन्हा पुढे आला आहे. नव्या व्यवस्थेत साबण, शाम्पू, टूथपेस्टसारख्या उत्पादनांमध्ये वापरण्यात आलेले घटक प्राणिजन्य आहेत की वनस्पतिजन्य, हे संकेताद्वारे स्पष्ट करण्याचा विचार आहे.

**ग्राहकांना नेमका फायदा काय?**

आज एखादा ग्राहक ही उत्पादने खरेदी करतो, तेव्हा त्याच्या पाकिटावर घटकांची यादी असते; मात्र त्यातील प्रत्येक घटकाचा उगम समजणे सर्वसामान्यांसाठी सोपे नसते. काही घटक वनस्पतींपासून मिळतात, तर काही प्राणिजन्य स्रोतांपासून मिळू शकतात. त्यामुळे केवळ रासायनिक नाव वाचून त्याचे मूळ ओळखणे कठीण ठरते. नव्या संकेत पद्धतीमुळे ग्राहकाला उत्पादन हातात घेतल्यानंतरच त्याचे स्वरूप समजू शकेल. यामुळे विशेषतः शाकाहारी उत्पादने वापरण्याला प्राधान्य देणाऱ्या ग्राहकांना अधिक स्पष्टपणे निवड करता येईल. धार्मिक कारणांमुळे काही विशिष्ट प्राणिजन्य घटक टाळणाऱ्या ग्राहकांसाठीही ही माहिती उपयुक्त ठरेल.

**कंपन्यांसमोर मात्र नवे आव्हान**

अर्थात, ही व्यवस्था प्रत्यक्षात आणणे तितके सोपे नाही. साबण किंवा टूथपेस्टसारख्या उत्पादनांमध्ये अनेक घटक वापरले जातात. त्यापैकी काहींचा उगम वनस्पतिजन्य असू शकतो, तर त्याच प्रकारचा घटक दुसऱ्या उत्पादनात प्राणिजन्य स्रोतापासून मिळालेला असू शकतो. त्यामुळे कंपन्यांना आपल्या पुरवठा साखळीतील प्रत्येक घटकाचा स्रोत तपासावा लागेल. कच्चा माल कुठून आला, त्याची निर्मिती कशी झाली आणि प्रक्रियेदरम्यान अन्य कोणते घटक वापरण्यात आले, याची नोंद ठेवण्याची जबाबदारी वाढू शकते. एखाद्या उत्पादनात अनेक प्रकारचे घटक असतील, तर त्याचे वर्गीकरण नेमके कसे करायचे, हा प्रश्नही महत्त्वाचा ठरणार आहे. त्यामुळे नियम लागू करताना सरकारला उत्पादनांच्या विविध श्रेणी आणि त्यांच्या निर्मितीप्रक्रियेचा विचार करावा लागेल.

येथे एक बाब स्पष्ट असणे आवश्यक आहे. उत्पादनावरील हिरवा किंवा अन्य संकेत हा त्या उत्पादनाच्या गुणवत्तेचा किंवा सुरक्षिततेचा दर्जा ठरवणारा शिक्का नसेल. तो केवळ उत्पादनातील घटकांचे स्वरूप ग्राहकाला समजावून सांगण्यासाठी असेल. म्हणजे हिरवा संकेत असलेले उत्पादन अधिक चांगले आणि दुसरा संकेत असलेले उत्पादन कमी दर्जाचे, असा त्याचा अर्थ काढता येणार नाही. ग्राहकाला उत्पादनात कोणत्या प्रकारचे घटक वापरले आहेत, याची माहिती देणे एवढाच त्यामागचा हेतू असेल. त्यामुळे संकेत पाहतानाच ग्राहकांनी उत्पादनाची गुणवत्ता, उपयोग, किंमत, वापरण्याची पद्धत आणि इतर आवश्यक माहितीही तपासणे गरजेचे आहे.

अर्थशास्त्रातील सिद्धांतानुसार उत्पादक आणि ग्राहक यांच्यात नेहमीच माहितीची मोठी विषमता असते. प्रसाधनांमध्ये वापरण्यात येणारे घटक सामान्यतः अत्यंत गुंतागुंतीच्या रासायनिक संज्ञांमध्ये लिहिलेले असल्यामुळे त्यातील घटक वनस्पतिजन्य आहेत की प्राणिजन्य, हे सर्वसामान्य ग्राहकाला सहज ओळखता येत नाही. उत्पादनाच्या दर्शनी भागावर सोपी रंगीत खूण अनिवार्य केल्यामुळे ग्राहकाचा माहिती मिळवण्याचा वेळ वाचू शकतो. कोणतीही वस्तू खरेदी करताना त्या पॅकेटच्या आत नेमके काय आहे, हे जाणून घेण्याचा पहिला हक्क ग्राहकाचाच आहे. कोणत्याही उत्पादनातील 'इनग्रेडियंट्?स' किंवा वापरण्यात आलेले घटक खरोखरीच कोणते आहेत, हे उत्पादकांना शंभर टक्के माहिती असते. त्यामुळे त्याची माहिती देण्याची प्राथमिक जबाबदारीही त्याचीच असायला हवी. निवडीसाठी आवश्यक असणारी सर्व माहिती उपलब्ध असते तेव्हाच निवड करण्याचा अधिकार अर्थपूर्ण ठरतो.

या बदलामागे एक मोठी न्यायालयीन प्रक्रिया आहे. हा विषय केवळ पाकिटावर लाल किंवा हिरवे निशाण नमूद करण्यापुरता मर्यादित नव्हता. रेकिट बेंकिझर इंडिया या ग्राहक उत्पादने बनवणाऱ्या कंपनीने या तरतुदीला न्यायालयात आव्हान दिले होते. ही कंपनी साबण आणि वैयक्तिक स्वच्छतेशी संबंधित उत्पादने बनवते. दिल्ली उच्च न्यायालयात हे प्रकरण अनेक वर्षांपासून प्रलंबित होते. ७ फेब्रुवारी रोजी न्यायालयाने या प्रकरणात सुनावणी करताना विधिक मापविज्ञान विभाग आणि औषध नियंत्रक यांना या विषयावर स्पष्ट भूमिका मांडण्याचे निर्देश दिले होते. न्यायालयासमोर वेगवेगळ्या नियमांमधील आणि नियमन व्यवस्थेमधील कोणत्या तरतुदीनुसार शाकाहारी किंवा मांसाहारी मूळ दर्शवण्याची जबाबदारी आणि कायदेशीर आधार कसा लागू व्हावा, हा मुख्य प्रश्न होता. तसेच मूळ तरतूद २०१४ पासून अस्तित्वात असूनही तिच्या अंमलबजावणीवर वाद निर्माण होत होता. या पार्श्वभूमीवर सरकारने आता केलेला बदल म्हणजे जुन्या तरतुदीला नियमांच्या नव्या रचनेत समाविष्ट करण्याची कायदेशीर प्रक्रिया आहे. अर्थात, ही व्यवस्था प्रत्यक्षात किती परिणामकारक ठरते, हे अंतिम नियमांचे स्वरूप, उत्पादनांचे वर्गीकरण आणि कंपन्यांकडून दिल्या जाणाऱ्या माहितीच्या स्पष्टतेवर अवलंबून राहील.

**ग्राहकांच्या माहितीच्या हक्काला बळ**

पॅकबंद वस्तूंच्या बाजारपेठेत गेल्या काही वर्षांत मोठे बदल झाले आहेत. ग्राहक आता केवळ किंमत किंवा ब्रँड पाहून वस्तू निवडत नाही. उत्पादनात नेमके काय आहे, ते कसे तयार झाले, कोणते घटक वापरले गेले आणि ते आपल्या वैयक्तिक पसंतीशी जुळते का, याचाही विचार केला जातो. त्यामुळे उत्पादनाविषयी शक्य तितकी स्पष्ट माहिती देण्याची जबाबदारी उत्पादकांवर वाढत आहे. साबण, शाम्पू आणि टूथपेस्ट या रोजच्या वापरातील गोष्टीतील घटकांबद्दल बहुतांश ग्राहक फारसा विचार करत नसले, तरी उत्पादनाच्या लेबलवर सहज समजणाऱ्या पद्धतीने माहिती उपलब्ध झाली, तर ग्राहक स्वतःच्या पसंतीनुसार निर्णय घेऊ शकतो.

**सूर्यकांत पाठक**





# वैद्यकीय दरोडे रोखण्यासाठी...

**रुग्णाला सलाइन लावण्यासाठी वापरला जाणारा साधा सेट, एखादे कॅथेटर किंवा कर्करोगावरचे इंजेक्शन... या गोष्टींची खरी किंमत काय आहे, हे रुग्णाला कळायला मार्ग नसतो. घरातला माणूस अतिदक्षता विभागात असताना कुटुंब बिलाची छाननी करण्याच्या स्थितीतही नसते. या हतबलतेवरच आपल्या आरोग्यव्यवस्थेतील अवाजवी नफ्याचा बाजार उभा आहे.**

गेल्या काही दिवसांतील दोन घडामोडींनी हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणला आहे. पहिली म्हणजे महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासनाचे (एफडीए) आयुक्त तुकाराम मुंढे यांनी केंद्र सरकारकडे मांडलेली बाजार सर्वेक्षणाची निरीक्षणे. दुसरी म्हणजे सर्वोच्च न्यायालयात या विषयावर सुरू असलेली सुनावणी.आयुक्त मुंढे यांनी १० ऑगस्ट रोजी केंद्रीय औषध विभाग आणि राष्ट्रीय औषध किंमत नियंत्रण प्राधिकरण (एनपीपीए) यांना पत्र पाठवले. आंतररुग्ण सेवेत रोज वापरल्या जाणाऱ्या इंट्राव्हेनस इन्फ्युजन सेट, सिरिंज, नेब्युलायझर, ऑक्सिजन मास्क आणि कॅथेटर या वस्तूंचा त्यात आढावा आहे. खासगी रुग्णालयांची खरेदी किंमत आणि रुग्णांकडून आकारलेली रक्कम किंवा छापील कमाल किरकोळ किंमत (एमआरपी) यांची तुलना त्यात आहे. त्याचे निष्कर्ष धक्कादायक आहेत. ३१० रुपये एमआरपी असलेले कॅथेटर रुग्णालयाने प्रति नग सुमारे २९.४१ रुपयांना खरेदी केले. ११.०५ रुपयांना खरेदी केलेल्या आयव्ही इन्फ्युजन सेटसाठी रुग्णाला ३२५ रुपयांचे बिल लावले गेले. काही प्रकरणांत खरेदी किंमत आणि एमआरपी यांतील फरक २,८४१ टक्क्यांपर्यंत पोहोचला.

उत्पादन रुग्णापर्यंत पोहोचण्याआधीच उत्पादक आणि मध्यस्थ त्यात मोठा नफा जोडतात का, याची चौकशी एनपीपीए करत आहे. पंजाब, राजस्थान आणि तामिळनाडूतील औषध नियंत्रकांकडूनही अशाच तक्रारी आल्याचे वृत्त असून, ही समस्या एका राज्यापुरती नाही, हेच यातून दिसते.दुसरीकडे, कर्करोगावरील औषधांच्या किमतींबाबतच्या एका याचिकेत सर्वोच्च न्यायालयाने तीव्र संताप व्यक्त केला. न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठाने हा प्रकार म्हणजे रुग्णांवर 'भरदिवसा टाकलेला दरोडा' असल्याचे म्हटले. किरकोळ विक्रेत्याला ज्या किमतीत औषधे मिळतात, त्यांच्या तुलनेत रुग्णांकडून दहापट रक्कम वसूल केली जाते, असा मुद्दा न्यायालयासमोर आहे. कारवाई करण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, ते अधिकारी शांत आहेत, अशी टिप्पणीही न्यायमूर्तींनी केल्याचे सांगितले जाते. नंतरच्या सुनावणीत न्यायालयाने किरकोळ विक्रेत्याचा नफा १६ टक्क्यांपर्यंत मर्यादित करण्याचा विचार करावा, असेही सुचवले आहे.

**औषध 'जीवनावश्यक वस्तू; पण...**

औषध जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ अंतर्गत जीवनावश्यक वस्तू म्हणून अधिसूचित आहे. त्यामुळे या कायद्याखाली निघणाऱ्या आदेशांद्वारे, उदाहरणार्थ औषध किंमत नियंत्रण आदेशाद्वारे, औषधांच्या किमती नियंत्रित करता येतात. म्हणजे सरकारकडे अधिकार आहे. प्रश्न आहे तो त्याच्या वापराच्या व्याप्तीचा.

डीपीसीओ १९९५ हा खर्चाधारित (कॉस्ट-प्लस) पद्धतीचा होता. उत्पादन खर्च आणि त्यावर ठरावीक टक्के नफा धरून औषधाची किंमत ठरवली जात असे. या आदेशात ७४ बल्क ड्रग्स (एपीआय) पासून बनणारी औषधे नियंत्रित होती. नियंत्रित औषधांच्या जागी नियंत्रणाबाहेरची, थोडी बदललेली संयुगे बाजारात आणण्याचा कलही यातून वाढला.

डीपीसीओ २०१३ने पद्धतच बदलली. आता किंमत बाजाराधारित आहे. ठरावीक मर्यादेपेक्षा जास्त बाजार हिस्सा असलेल्या आघाडीच्या ब्रँड्सच्या किमतींची सरासरी काढून 'सीलिंग प्राइस' (कमाल मर्यादा) ठरते. घाऊक किंमत निर्देशांकानुसार दरवर्षी किमती वाढवण्याची किंवा घटवण्याची तरतूदही आहे.

मात्र येथे एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घ्यावी लागते. संशोधनाला चालना मिळावी आणि औषधांचे उत्पादन व उपलब्धता व्यवहार्य राहावी, या दृष्टीने सर्वच औषध-मिश्रणांच्या कमाल किमती अधिसूचित केल्या जात नाहीत. राष्ट्रीय अत्यावश्यक औषधांच्या यादीत (एनएलईएम) समाविष्ट औषधांच्याच कमाल किमती ठरवल्या जातात. इतर औषधांच्या किमतींवर केवळ देखरेख ठेवली जाते. परिच्छेद २० अंतर्गत त्यांच्या वार्षिक वाढीवर कमाल १० टक्क्यांची मर्यादा आहे. यामुळे नियंत्रणाबाहेरच्या औषधांच्या किमती ठरवण्याचे अनेक पर्याय उत्पादकांना स्वतःच्या मर्जीने उपलब्ध राहतात.

**नफ्याचे गणित**

अनेकदा उत्पादकाला फारसा नफा मिळत नाही. मात्र किरकोळ विक्रेते आणि रुग्णालयांना जास्त नफा (मार्जिन) मिळेल अशी किंमत रचना केली जाते. यातून आणखी एक प्रवृत्ती वाढली आहे. काही व्यापारी परवानाधारक उत्पादकांकडून औषधे तयार करून घेतात आणि त्यावर हवी ती 'एमआरपी' छापून अधिकाधिक नफा कमावतात. हा नफा टिकतो... कारण माहितीची अपारदर्शकता.

साबण, बिस्किटे आदी उत्पादनांच्या बाबतीत ग्राहक स्वतः ब्रँड आणि किंमत पाहून निवड करतो. मात्र, कोणते औषध किंवा कोणता ब्रँड घ्यायचा, हे रुग्ण ठरवू शकत नाही. त्याला नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकांनी लिहून दिलेल्या प्रिस्क्रिप्शनवरच अवलंबून राहावे लागते. जास्त नफा देणाऱ्या ब्रँड्सच्या आमिषाला असे काही व्यावसायिकही बळी पडण्याचा धोका असतो.

**अवाजवी नफा टिकून राहण्याची कारणे अशी:**

-रुग्णाला वस्तूची खरेदी किंमत कधीच कळत नाही. त्याला फक्त छापील एमआरपी दिसते, जी कधी कधी खऱ्या किमतीपेक्षा कैक पट असते.

-रुग्णालयात दाखल असलेला रुग्ण बाहेरून वस्तू आणू शकत नाही. बऱ्याच रुग्णालयांत बाहेरच्या औषधांना किंवा उपकरणांना परवानगीच नसते. त्यामुळे रुग्ण बंदिस्त ग्राहक ठरतो.

-ज्या ब्रँडचा एमआरपी सर्वाधिक, तोच ब्रँड अनेकदा डॉक्टर किंवा रुग्णालयाला सर्वाधिक फायदा देतो. त्यामुळे लिहून दिला जाणारा ब्रँड रुग्णाच्या हितापेक्षा कमिशनवर ठरण्याचा धोका असतो.

-एमआरपी ही 'कमाल' किंमत आहे, पण तिचा खरेदी खर्चाशी संबंध कायद्याने बांधलेला नाही. उत्पादक एमआरपी हवी तितकी वाढवू शकतो, कारण त्या किमतीवर रुग्णालय आणि विक्रेता आपले मार्जिन घेतात.

-वितरक, घाऊक विक्रेता, किरकोळ विक्रेता आणि रुग्णालय यांच्या नफ्यावर सर्वसाधारणपणे मर्यादा नाही. तिथेच ३०० टक्क्यांपासून २,८४१ टक्क्यांपर्यंतची तफावत तयार होते.

**यावर उपाय काय? व्यापार नफ्याचे तर्कसंगतीकरण**

वितरक, किरकोळ विक्रेते आणि रुग्णालये या साखळीतील प्रत्येक टप्प्यावर मान्य नफ्याची मर्यादा ठरवली पाहिजे. यासाठी पूर्वानुभवही आहे. डीपीसीओ २०१३च्या परिच्छेद १९ अंतर्गत एनपीपीएने यापूर्वी काही वैद्यकीय उपकरणे आणि कर्करोगावरील औषधांचा व्यापार नफा मर्यादित केला आहे. २०१९ मध्ये ४२ निवडक कर्करोग औषधांवरील व्यापार नफा ३० टक्क्यांपर्यंत मर्यादित केला गेला, आणि अनेक औषधांच्या किमतीत मोठी घट झाली. आता तोच धडा रुग्णालयातील रोजच्या वस्तू (कंझ्युमेबल्स) आणि इतर उपकरणांना लागू करण्याची गरज आहे. सर्वोच्च न्यायालयाने किरकोळ विक्रेत्याचा नफा १६ टक्क्यांवर मर्यादित करण्याचा विचार करण्यास सुचवले आहे; तो याच दिशेचा संकेत आहे. रुग्णालये आपल्या खर्चाची भरपाई आणि वाजवी नफा जरूर मिळवू शकतात; मात्र तो वाजवी असला पाहिजे, दहापट-तीसपट नव्हे.

**रुग्णांना माहिती आणि निवडीचा अधिकार**

रुग्णालयाच्या बिलात प्रत्येक वस्तूची एमआरपी, प्रत्यक्ष आकारलेली किंमत आणि उत्पादकाचे नाव स्वतंत्रपणे दाखवणे बंधनकारक करावे.

एकाच श्रेणीतील सर्व उपलब्ध ब्रँड्सची यादी आणि त्यांच्या किमती रुग्णालयात दर्शनी भागात आणि डिजिटल स्वरूपात उपलब्ध असाव्यात. स्टेंटसारख्या बाबतीत रुग्णाला सर्व पर्याय आणि दर सांगून निर्णय घेण्याची संधी द्यायला हवी.

डॉक्टरांनी औषधे शक्यतो जेनेरिक नावाने लिहावीत आणि जेनेरिक व ब्रँडेड पर्यायांच्या किमतींतील फरक रुग्णाला सांगावा.

रुग्णाला बाहेरून वस्तू किंवा औषधे आणण्याची मुभा असावी आणि रुग्णालये ती नाकारू शकणार नाहीत, अशी तरतूद असावी.

**औषध विपणन पद्धतींसाठी एकसमान संहिता**

औषधांच्या विपणनासाठी (मार्केटिंग) केंद्र सरकारने एकसमान संहिता तयार केली आहे. भेटवस्तू, परदेशी सहली, 'परिषद प्रायोजकत्व' आणि रोख कमिशन यांसारख्या गोष्टींवर ती निर्बंध घालते. ती मुख्यतः ऐच्छिक स्वरूपाची असल्याने तिची अंमलबजावणी कमकुवत आहे. ती कायद्याचा भाग झाल्यास उल्लंघनावर दंड, परवाना निलंबन आणि फौजदारी कारवाई शक्य होईल. कमिशनची साखळी तुटली की उच्च एमआरपीचे कारणच संपते, कारण अवाजवी एमआरपी अनेकदा याच कमिशनची भरपाई करण्यासाठी ठेवलेली असते.

**काही अतिरिक्त उपाय**

उत्पादकाची विक्री किंमत आणि छापील एमआरपी यांतील कमाल फरक ठरवावा. ज्या दिवशी एमआरपी खऱ्या किमतीशी जोडली जाईल, त्या दिवशी अनेक विसंगती आपोआप संपतील.

राज्यांचे औषध नियंत्रक बाजारात जाऊन जे सर्वेक्षण करतात, ते एनपीपीएच्या डेटाशी जोडले गेले पाहिजे. महाराष्ट्राचे सर्वेक्षण आणि इतर राज्यांच्या तक्रारी यांचे एकत्रित विश्लेषण नियामक कारवाईचा भक्कम आधार ठरू शकते.

सरकारी आरोग्य योजनांमध्ये ठरवलेले पॅकेज दर आणि वस्तूंचे दर खासगी रुग्णालयांसाठी संदर्भ किंमत म्हणून वापरता येतील.

क्लिनिकल आस्थापना कायद्यांतर्गत दर प्रदर्शित करण्याच्या तरतुदींची काटेकोर अंमलबजावणी व्हावी आणि अवाजवी आकारणीबाबत तक्रारीसाठी जलद, स्वतंत्र व्यासपीठ असावे.

रुग्णालये, वितरक किंवा उत्पादकांमधील कर्मचाऱ्यांनी अवाजवी दरांबाबत माहिती दिल्यास त्यांना संरक्षण आणि प्रोत्साहन द्यावे.

एक रुपयाची वस्तू ३० रुपयांना आणि २७०० रुपयांचे औषध २७,००० रुपयांना विकले जात असेल, तर तो बाजाराचा खेळ नसून आजारपणातील असहायतेचे शोषण आहे. सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केलेला संताप, महाराष्ट्र एफडीएचे आकडेवारीवर आधारित सर्वेक्षण आणि इतर राज्यांच्या तक्रारी, हे सर्व एकाच दिशेने बोट दाखवतात. आता निर्णायक कृतीची वेळ आली आहे.

महाराष्ट्राने स्टेंटच्या वेळी देशाला दिशा दाखवली होती. आता व्यापार नफ्याचे तर्कसंगतीकरण, रुग्णांसाठी पारदर्शकता आणि औषध विपणन संहितेला कायदेशीर बळ या तीन सूत्रांवर काम झाले, तर आरोग्यसेवा अधिक परवडणारी आणि विश्वासार्ह होऊ शकते. शेवटी प्रश्न इतकाच आहे: आजारी माणसाच्या असहायतेतून नफा कमावला जाणे आपण किती काळ सहन करणार?

**निलेश गांधी**

## त-ड-का

### वैराग्य व त्याग ..!

सांसारीक समस्यापायी
जो धारण करे वैराग्य
तो मनस्वी असे दुःखी
कसे उजळेल त्याचे
भाग्य...

आधी येते वैराग्य मग
स्वखुशीने होतो त्याग
त्यात अहंपणाचा
इवलासाही नसतो
डाग.. !

खायला असून
पंचपक्वान
जो करे स्वच्छेने
एकादशी
तद्वत सुखे असता
सेवेशी
जो त्यागी तो खरा
वैरागी..!



**प्रा.अशोक सारडा,**
मेहकर
९४२१३९४३३९

## भारताचा मानबिंदू : भारतीय वायुदल

२०२६ मध्ये भारतीय वायुदल आपला ९४ वा वायुदल दिन साजरा करत आहे. देशाच्या आकाशाचे रक्षण करण्याची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेणाऱ्या भारतीय वायुदलाच्या शौर्याला, पराक्रमाला आणि त्यागाला अभिवादन करण्याचा हा दिवस आहे.भारतीय वायुदलाची सुरुवात अत्यंत मर्यादित साधनसामग्री आणि मोजक्या विमानांपासून झाली. मात्र स्वातंत्र्यानंतरच्या काळात भारतीय वायुदलाने सातत्याने आधुनिकीकरण केले. विविध देशांकडून अत्याधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करण्याबरोबरच आज भारत स्वदेशी संरक्षण तंत्रज्ञान विकसित करण्याच्या दिशेनेही वेगाने वाटचाल करत आहे. तेजससारखे स्वदेशी लढाऊ विमान, सुखोई-३० एमकेआय, राफेल, मिराज-२००० यांसारखी अत्याधुनिक लढाऊ विमाने भारतीय वायुदलाच्या सामर्थ्यात भर घालत आहेत. आधुनिक रडार, क्षेपणास्त्र प्रणाली, हवाई इंधन भरण्याची क्षमता, उपग्रहाधारित दळणवळण, नेटवर्क-केंद्रित युद्धप्रणाली आणि ड्रोन तंत्रज्ञानामुळे वायुदलाची क्षमता.

भारतीय वायुदलाची ताकद केवळ लढाऊ विमानांमध्ये नाही. वैमानिक, तंत्रज्ञ, अभियंते, हवाई वाहतूक नियंत्रक, वैद्यकीय पथके आणि जमिनीवर अहोरात्र काम करणारे हजारो कर्मचारी हे त्याचे खरे सामर्थ्य आहेत. विमान आकाशात झेपावण्यापूर्वी त्यामागे असंख्य हातांचे कष्ट असतात. देशाच्या सुरक्षेसाठी हे सर्व जण आपले कर्तव्य अत्यंत निष्ठेने पार पाडतात. भारतीय वायुदलाचे कार्य केवळ युद्धापुरते मर्यादित नाही. पूर, भूकंप, चक्रीवादळ यांसारख्या नैसर्गिक आपत्तींच्या काळात बचावकार्य, अन्न व औषधांची वाहतूक, दुर्गम भागात मदत पोहोचविणे आणि नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविणे अशा मानवतावादी कार्यातही वायुदल नेहमीच आघाडीवर राहिले आहे.पारंपरिक लढाऊ विमानांबरोबरच ड्रोन, कृत्रिम बुद्धिमत्ता, सायबर युद्ध, इलेक्ट्रॉनिक युद्ध, उपग्रह तंत्रज्ञान आणि मानवरहित युद्धप्रणाली यांचे महत्त्व वाढत आहे. त्यामुळे भारतीय वायुदलाला भविष्यातील आव्हानांचा सामना करण्यासाठी सातत्याने आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारावे लागणार आहे. त्याचबरोबर स्वदेशी संरक्षण उत्पादनाला अधिक चालना देणेही गरजेचे आहे.

**श्याम ठाणेदार**



# पारस फाटा खून प्रकरणातील दोन अनोळखी आरोपी जेरबंद!

## सीसीटीव्ही ठरले निष्फळ; खबऱ्यांच्या जाळ्यातून पोलिसांना मिळाला धागा

■ प्रतिनिधी | अकोला ■

बाळापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत पारस फाटा उड्डाणपुलाजवळ झालेल्या खळबळजनक खून प्रकरणातील दोन अनोळखी आरोपींच्या मुसक्या आवळण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले. सीसीटीव्ही फुटेजमधून आरोपींचा ठोस माग लागत नसतानाही तांत्रिक विश्लेषण आणि खबऱ्यांच्या जाळ्याच्या आधारे पोलिसांनी वैभव पुरुषोत्तम शितळे (२२) आणि गौरव गजानन घुगे (२६) या दोघांना ताब्यात घेतले.

२९ सप्टेंबर रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास फिर्यादी व त्यांचे मित्र अमरावतीहून सामानाची खरेदी करून अर्टिगा कारने बाळापूरकडे परतत होते. दरम्यान, रस्त्यावरून झालेल्या वादाचा राग मनात धरून पल्सर मोटारसायकलवरून आलेल्या दोन इसमांनी पारस फाटा उड्डाणपुलाजवळ त्यांच्या कारला कट मारून गाडी अडवली. त्यानंतर शिवीगाळ व वादाला सुरुवात झाली. वादाचे रूपांतर काही क्षणांतच हाणामारीत झाले. आरोपींनी जवळील चाकूने फिर्यादी व त्यांचे मित्र मोईन गवळी यांच्यावर प्राणघातक हल्ला केला आणि घटनास्थळावरून पसार झाले. गंभीर जखमी मोईन गवळी यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याने प्रकरणात भारतीय न्याय संहिता कलम १०३(१) अन्वये खुनाचे कलम वाढविण्यात आले.



सहा-सात दिवसांच्या तपासानंतर एलसीबीची कारवाई

### ना नाव, ना नंबर... पोलिसांसमोर तपासाचे आव्हान

या प्रकरणात आरोपी आणि फिर्यादी यांची पूर्वी कोणतीही ओळख नव्हती. त्यामुळे आरोपींची नावे, मोबाईल क्रमांक किंवा दुचाकीचा क्रमांक पोलिसांकडे उपलब्ध नव्हता. घटनास्थळाच्या परिसरातही उपयुक्त सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याने तपास अधिकच गुंतागुंतीचा बनला. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने बाळापूरपासून अकोला तसेच खामगावकडे जाणाऱ्या मार्गावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे मागील सहा-सात दिवस फुटेज तपासले. मात्र संशयित आरोपी स्पष्टपणे दिसून येत नसल्याने पोलिसांसमोर गुन्हा उघडकीस आणण्याचे आव्हान कायम होते.

### सीसीटीव्ही फेल; खबऱ्यांनी दिला 'क्लू'

सीसीटीव्हीमधून तपासाला अपेक्षित यश मिळत नसतानाच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला खबऱ्यांच्या माध्यमातून महत्त्वाची गोपनीय माहिती मिळाली. या माहितीची तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे पडताळणी करण्यात आली. तपासाची दिशा वैभव शितळेकडे वळली आणि त्याने साथीदारासह हा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पोलिसांनी सापळा रचून वैभव पुरुषोत्तम शितळे, रा. जिल्हा परिषद कॉलनी, खडकी, अकोला आणि गौरव गजानन घुगे, रा. बोर्डे यांच्या घराजवळ, म्हाडा कॉलनी, खडकी, अकोला यांना ताब्यात घेतले. कसून चौकशी केली असता कारला कट लागल्याच्या कारणावरून झालेल्या वादातून हल्ला केल्याची कबुली दोघांनी दिल्याची माहिती पोलिसांनी दिली. दोन्ही आरोपींना पुढील कायदेशीर कारवाईसाठी बाळापूर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून, गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

### वरिष्ठांच्या सूचनेनंतर तपासाला गती

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांना गुन्हा तातडीने उघडकीस आणण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार लेव्हरकर यांनी विशेष पथक तयार करून तपासाला वेग दिला. सीसीटीव्हीमधून धागा मिळत नसतानाही तांत्रिक विश्लेषण आणि खबऱ्यांच्या माहितीच्या आधारे आरोपींपर्यंत पोहोचण्यात पथकाला यश आले.

### कारवाईतील पथक

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अतिरिक्त पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी निलेश देशमुख, गोपाल जाधव, विष्णु बोडखे, माजीद पठाण, अनिल चव्हाण तसेच पोलीस अंमलदार शेख हसन, उमेश पराये, सुलतान पठाण, फिरोज खान, भारकर धोत्रे, अमीत दुबे, अब्दुल माजिद, रविंद्र खंडारे, महेंद्र मलिये, किशोर सोनोने, खुशाल नेमाडे, मंगेश इंगळे, वसीमोद्दीन, एजाज अहमद, राहुल गायकवाड, खप्नील खेडकर, श्रीकांत पातोंड, अन्सार अहमद, राज चंदेल, आकाश मानकर, धिरज वानखडे, पवन डांबलकर, अभिषेक पाठक, मोहम्मद आमीर, सतिश पवार, अशोक सोनवणे, भिमराव दिपके तसेच चालक विनोद ठाकरे, प्रविण कश्यप, रामकिसन डोईफोडे, मनिष ठाकरे, देवानंद खरात आणि प्रकाश लोखंडे यांनी केली.

## खासगी पाणी टँकरच्या दरांवर 'कॅपिंग' करा; मनसेची मनपा प्रशासनाकडे मागणी



■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील तीव्र पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना खासगी पाणी टँकरचा आधार घ्यावा लागत आहे. मात्र, टंचाईचा फायदा घेत काही टँकरचालकांकडून मनमानी दर आकारले जात असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. त्यामुळे खासगी पाणी टँकरच्या दरांवर तातडीने कमाल दरमर्यादा (कॅपिंग) निश्चित करून ती सार्वजनिक करावी, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने महानगरपालिका प्रशासनाकडे केली आहे.

काटेपूर्णा प्रकल्पातील पाणीसाठा कमी होत असल्याने शहरातील पाणीपुरवठ्याचे अंतर वाढले आहे. परिणामी अनेक नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी खासगी टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. या परिस्थितीत टँकरचालकांकडून नागरिकांकडून अवाजवी दर आकारले जात असल्याचे मनसेचे म्हणणे आहे. मनसेचे जिल्हाध्यक्ष पंकज साबळे व शहराध्यक्ष सौरभ भगत यांनी मनपा प्रशासनाला दिलेल्या निवेदनात १ हजार, २ हजार, ५ हजार लिटर तसेच त्यापेक्षा अधिक क्षमतेच्या टँकरचे अधिकृत दर निश्चित करून जाहीर करण्याची मागणी केली आहे. तसेच जादा दर आकारणाऱ्या टँकरचालकांविरोधात तक्रार करण्यासाठी स्वतंत्र हेल्पलाइन किंवा व्हॉट्सॲप क्रमांक उपलब्ध करून द्यावा, अशी मागणीही करण्यात आली.

निश्चित केलेले दर मनपाच्या संकेतस्थळावर तसेच शहरातील सार्वजनिक ठिकाणी प्रसिद्ध करावेत. अधिकृत दरापेक्षा जादा पैसे आकारणाऱ्या टँकरचालकांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी मनसेने केली आहे. यावेळी जिल्हाध्यक्ष पंकज साबळे, शहराध्यक्ष सौरभ भगत, अमोल भेंडारकर व हर्षल अंभोरे उपस्थित होते.

### जाहीर सुचना

सर्व जनतेस व वित्तीय संस्थेस ह्या जाहीर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, सपना संजय मुडे रा. बिबी ता. लोणार जि. बुलढाणा यांनी खालील वर्णनाची मालमत्ता आय.सि.आय.सि. आय. होम फायनान्स कंपनी लि. येथे गहाण ठेवुन कर्ज मिळण्याकरिता अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन :** मौजे बिबी ग्रा. पं. बिबी ता. लोणार जि. बुलढाणा च्या हद्दीतील गट क्र. २६९/२ चा वि. उप- विभागीय अधिकारी, मेहकर यांच्या फाईल वरील मह. प्र. क्र. एन. ए.पी.-३४/बिबी/९/२०१३-१४ आदेश दि. ०१/०९/२०१८ नुसार पारित ले-आउट नकाशातील प्लॉट क्र. २४ ज्याचे एकूण क्षेत्रफळ १०५ चौ. मी. असून, ज्यास चतुर्सिमा : पुर्वेस : रस्ता, पश्चिमेस : अनिल क्षीरसागर चा प्लॉट क्र. १९, ऊत्तरेस : श्याम चव्हाण चा प्लॉट क्र. २३ -ब व दक्षिणेस : इंदुबाई उकंडे चा प्लॉट क्र. २५

येणे प्रमाणे वरील मालमत्तेचे नोंदणीकृत करारनामा दस्त क्र. १७९३ दि. ०६/११/२०२० रोजीचे मुळ दस्त जे मालमत्तेचे साखळी दस्त आहे ते हरविले/गहाळ झाले आहे. त्याकरीता पोलीस स्टेशन बिबी जि. बुलढाणा येथे दि. ०५/०९/२०२६ रोजी तक्रार दाखल केली आहे.

त्याअर्थी जर वरील मालमत्तेवर कोणाचे काही कर्ज, गहाण, बोजा, हक्क, अधिकार अथवा ताबा असल्यास त्यांनी सदर सुचना प्रकाशीत झाल्या पासुन ७ (सात) दिवसात खालील नमुद पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानीशी आक्षेप नोंदवावा. अन्यथा कोणाचाही कसल्याही स्वरुपाचा आक्षेप नाही असे समजुन आय. सि.आय.सि.आय. होम फायनान्स कंपनी लि. हे वरील मालमत्ता गहाण ठेवुन कर्जाची रक्कम वितरीत करतील. त्यानंतर कोणाचीही कसलीही हरकत वा ऊजर चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. ०७/१०/२०२६

**अधिवक्ता : संजीव रा. बोचरे,**
संतोष नगर, आगाशे गुरुकुल,
मलकापुर रोड, अकोला - ४४४००४
मोबा. ९८९०४४४८२४

### जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १६७३/२०२६ प्रोसेस नं.१२६६१/२०२६
चौ.ता. ०७/११/२०२६ दिनांक : ०५/१०/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती. लक्ष्मीबाई यशवंत गवई रा. भिम नगर, बोरगाव मंजू, ता. जि. अकोला. २. कुणाल अजय गवई रा. भिम नगर, बोरगाव मंजू, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** श्रीमती. ज्योती अजय गवई रा. ह. मु. लोहगड, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला. २. सौ. नेहा शुभम गायकवाड लग्नापुर्वीचे नाव - नेहा अजय गवई रा. हरीहर पेठ, राजराजेश्वर मंदीर जवळ, अकोला. ता. जि. अकोला. रा. ह. मु. लोहगड, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला.

**मयताचा पत्ता :-** मयत : अजय यशवंत गवई
**पत्ता :-** रा. भिम नगर, बोरगाव मंजू, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अजय यशवंत गवई यांचे दि. ३०/०८/२०२६ रोजी राहते घरी बोरगाव मंजू, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार व गैरअर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०७/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०५/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १६५२/२०२६ प्रोसेस नं.१२५६३/२०२६
चौ.ता. ०५/११/२०२६ दिनांक : ०३/१०/२०२६

**अर्जदार :** १. शांताबाई नारायण बाभुळकर रा. दहीहांडा, ता. जि. अकोला. २. किरण विजय वाळीवकर रा. वार्ड नं. ३, नेरपिंगलाई, ता. मोर्शी, जि. अमरावती.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : नारायण किसन बाभुळकर
**पत्ता :-** रा. दहीहांडा, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत नारायण किसन बाभुळकर यांचे दि. २८/०७/२०११ रोजी दहिहांडा, ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०५/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०३/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**दिवाणी न्यायालय क. स्तर बाळापुर**
दयानंद मारुती वाघमारे यांचे न्यायालयात
सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर बाळापुर, बाळापुर, अकोला.

प्रोसेस क्र. २२१३/२०२६ दिनांक - २४/०९/२०२६
एमदिवाणी किरकोळ अर्ज/ २५०/२०२६
जनार्दन काशीराम उंबरकर वि. कोणीही नाही. पुढिल तारिख : २५-११-२०२६

**अर्जदार :** १. जनार्दन काशिराम उंबरकर वय अं ७६वर्ष धंदा- शेती २. विजया बळीराम तोलनकर वय अं ४६ वर्ष धंदा- घरकाम ३. रविंद्र जनार्दन उंबरकर वय अं ४४वर्ष धंदा- मजुरी सर्व रा. माजरी ता. बाळापूर जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII १८२७ अंतर्गत वारस प्रमाणपत्र मिळणे करीता वि.न्यायालयामध्ये अर्ज केला आहे. मय्यत कमला जनार्दन उंबरकर या दिनांक १३.०८.२०२६ रोजी मौजे मांजरी ता. बाळापूर जि. अकोला येथे मरण पावल्या. वरील नमुद अर्जदार हे मय्यत कमला जनार्दन उंबरकर यांचे एकमेव वारस असल्यामुळे त्यांना शासकीय, निमशासकीय कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दिनांक २५/११/२०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक २४.०९.२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का
**आदेशानुसार**
सहायक अधिक्षक (न्यायीक)
दिवाणी न्यायालय, क स्तर, बाळापुर

### जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १५९७/२०२६ प्रोसेस नं.१२०५२/२०२६
चौ.ता. ०२/११/२०२६ दिनांक : २२/०९/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती शारदा केदारनाथ अग्रवाल रा. फ्लॅट नं. १ बी, दुसरा माळा, रामालय अपार्टमेंट, आदर्श कॉलनी, गौरक्षण रोड, अकोला. ता. जि. अकोला. २. श्री. शरद केदारनाथ अग्रवाल रा. बीएच अम्मा मंदीर, आदर्श कॉलनी, गौरक्षण रोड, अकोला. ता. जि. अकोला. ३. श्रीमती अनुराधा योगेश मित्तल रा. ८०२, प्लॅटिनम अपार्टमेंट, बिरवाज्वासी इस्टेट, उमरीगर शाळेजवळ, उमरा, सुरत. ४. श्रीमती. प्रिया संजय मित्तल रा. ७०२, प्लॅटिनम अपार्टमेंट, बिरवाज्वासी इस्टेट, उमरीगर शाळेजवळ, उमरा, सुरत. ५. श्री. समिर केदारनाथ अग्रवाल रा. फ्लॅट नं. ५०२, मानसरोवर टेरेस, ५६१ न्यू कॉलनी, नागपूर, ता. जि. नागपूर.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : केदारनाथ गंगाधरजी अग्रवाल
**पत्ता :-** रा. फ्लॅट नं. १ बी, दुसरा माळा, रामालय अपार्टमेंट, गौरक्षण रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत केदारनाथ गंगाधरजी अग्रवाल यांचे दि. १६/०८/२०२६ रोजी राहते घरी, अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०२/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २२/०९/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**दिवाणी न्यायालय क. स्तर बाळापुर**
दयानंद मारुती वाघमारे यांचे न्यायालयात
सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर बाळापुर, बाळापुर, अकोला.

प्रोसेस क्र. २२१२/२०२६ दिनांक - २४/०९/२०२६
दिवाणी किरकोळ अर्ज/ २५२/२०२६
संगीता रामदास खेतकर वि. कोणीही नाही. पुढिल तारिख : २५-११-२०२६

**अर्जदार :** १. संगिता रामदास खेतकर वय अं ७३वर्ष धंदा - घरकाम २. मोहन रामदास खेतकर वय अं ४२वर्ष धंदा -व्यवसाय ३. स्व. गुणवंत रामदास खेतकर तर्फे वारस अ. जयश्री गुणवंत खेतकर वय अं ३४वर्ष धंदा- घरकाम ब. ज्ञानेश्वरी गुणवंत खेतकर वय अं १४ वर्ष धंदा- शिक्षण क. साई गुणवंत खेतकर वय अं १२वर्ष धंदा शिक्षण ४. प्रविण रामदास खेतकर वय अं ३६वर्ष धंदा व्यवसाय सर्व रा. गायगांव ता. बाळापूर जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII १८२७ अंतर्गत वारस प्रमाणपत्र मिळणे करीता वि .न्यायालयामध्ये अर्ज केला आहे. मय्यत रामदास पुंजाजी खेतकर हे दिनांक १०.०१.२०२६ रोजी मौजे गायगांव ता. बाळापूर जि. अकोला येथे मरण पावले. वरील नमुद अर्जदार हे मय्यत रामदास पुंजाजी खेतकर यांचे एकमेव वारस असल्यामुळे त्यांना शासकीय, निमशासकीय कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दिनांक २५/११/२०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक २४.०९.२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का
**आदेशानुसार**
सहायक अधिक्षक (न्यायीक)
दिवाणी न्यायालय, क स्तर, बाळापुर

## मतदार यादी पुनरीक्षणात एलआरटी कॉलेजच्या एनसीसी कॅडेट्सचा सहभाग

■ प्रतिनिधी | अकोला ■

श्रीमती लक्ष्मीबाई राधाकिसन तोष्णीवाल वाणिज्य महाविद्यालयात मतदार यादीचे विशेष संक्षिप्त पुनरीक्षण २०२६ व मतदान जनजागृती अभियानांतर्गत कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना मतदानाचे महत्त्व, मतदारांची जबाबदारी तसेच मतदार यादीत नाव तपासण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. ३०-अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघाचे नोडल अधिकारी गोपाल सुरे यांनी मतदार यादी तपासणी व नवीन मतदार नोंदणी प्रक्रियेची माहिती दिली. सहाय्यक नोडल अधिकारी अमित डवे व प्रफुल्ल हंबीर उपस्थित होते. 'प्रारूप मतदार यादीत आजच



आपले नाव तपासा' असा संदेश देत नाव नसलेल्या नागरिकांनी नमुना क्र. ६ द्वारे नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले. अभियानात महाविद्यालयाच्या एनसीसी कॅडेट्सनी उत्स्फूर्त सहभाग घेत मतदान जनजागृती केली. कार्यकारी प्राचार्य डॉ. जी. जी. गोंडाने, एनसीसी ऑफिसर कॅप्टन डॉ. अनिल म. तिरकर, डॉ. निलेश चोटिया, डॉ. मोनिका साबू व प्रा. नीरज ठाकूर यांची उपस्थिती होती. कॅडेट्सनी कुटुंबीय व समाजातही मतदार यादी तपासणी आणि मतदानाबाबत जनजागृती करण्याचा संदेश दिला.

### जाहीर नोटीस

**वि.०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १६५४/२०२६ प्रोसेस नं.१२६६/२०२६
चौ.ता. १७/११/२०२६ दिनांक : ०५/१०/२०२६

**अर्जदार :** १. श्रीकिष्णा रामभाउ बाभुळकर रा. दहिहांडा, ता. जि. अकोला. २. दुर्गा वसंतराव चोंडके रा. वार्ड नं. ४, काकडा, ता. अचलपूर, जि. अमरावती. ३. रेखा वसंतराव सरोदे रा. अकोली रोड जवळ, वलभा नगर नं. २, अमरावती. ता. जि. अमरावती.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : रामभाउ किसन बाभुळकर
**पत्ता :-** रा. दहिहांडा, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रामभाउ किसन बाभुळकर यांचे दि. २६/०८/२००९ रोजी दहीहांडा, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १७/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०५/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**दिवाणी न्यायालय क. स्तर बाळापुर**
दयानंद मारुती वाघमारे यांचे न्यायालयात
सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर बाळापुर, बाळापुर, अकोला.

प्रोसेस क्र. २२५१/२०२६ दिनांक - ०३/१०/२०२६
दिवाणी किरकोळ अर्ज/ २५१/२०२६
शायदा बी मोहम्मद सिकंदर वि. कोणीही नाही. पुढिल तारिख : २०-११-२०२६

**अर्जदार :** १. शायदा बी मोहम्मद सिकंदर वय अं ८२ वर्ष धंदा निरंक २. सुलताना बी मोहम्मद शफी वय अं ४० वर्ष धंदा घरकाम ३. मोहम्मद इरशाद मोहम्मद शफी वय अं २५वर्ष धंदा मजुरी ४. मोहम्मद इशाक मोहम्मद शफी वय अं २४वर्ष धंदा मजुरी सर्व रा. गायगांव ता. बाळापूर जि. अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII १८२७ अंतर्गत वारस प्रमाणपत्र मिळणे करीता वि.न्यायालयामध्ये अर्ज केला आहे. मय्यत मोहम्मद शफी मोहम्मद सिकंदर हे दिनांक ०२.१०.२०२५ रोजी मौजे गायगांव ता. बाळापूर जि. अकोला येथे मरण पावले. वरील नमुद अर्जदार हे मय्यत मोहम्मद शफी मोहम्मद सिकंदर यांचे एकमेव वारस असल्यामुळे त्यांना शासकीय, निमशासकीय कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दिनांक २०/११/२०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक ०३.१०.२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का
**आदेशानुसार**
सहायक अधिक्षक (न्यायीक)
दिवाणी न्यायालय, क स्तर, बाळापुर

### जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १३२६/२०२६ प्रोसेस नं.१०३३२/२०२६
चौ.ता. १५/१०/२०२६ दिनांक : ११/०८/२०२६

**अर्जदार :** शिरीश नरेंद्र डहाके रा. न्यु आकाश नगर, मानेवाडा, नागपूर, ता. जि. नागपूर.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : नरेंद्र झिंगरासजी डहाके
**पत्ता :-** रा. राउतवाडी, जिल्हा परीषद शाळा क्र. ५ च्या मागे, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत नरेंद्र झिंगरासजी डहाके यांचे दि.२५/०२/२०२६ रोजी राहते घरी, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १५/१०/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ११/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## मूर्तिजापुरात ५३ व्या ज्युनिअर राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेचा थाटात समारोप



■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

ॲम्युचर कबड्डी असोसिएशन ऑफ विदर्भ यांच्या मान्यतेने, माई सोशल बहुउद्देशीय क्रीडा मंडळ, मूर्तिजापूर द्वारे आयोजित कै. मारोतीआप्पा विठ्ठलआप्पा पिंपळे यांच्या स्मृती प्रीत्यर्थ ५३ वी ज्युनिअर राज्य अजिंक्यपद निवड चाचणी (मुले व मुली) कबड्डी स्पर्धा २०२६-२७ अतिशय उत्साहात आणि जल्लोषात पार पडली. २ ऑक्टोबर ते ४ ऑक्टोबर दरम्यान चाललेल्या या तीन दिवसीय कबड्डीच्या महासंग्रामत मुलांच्या गटात अमरावती शहर, तर मुलींच्या गटात गडचिरोली च्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत अजिंक्यपद पटकावले.

मार्गदर्शक श्रीमती दुर्गाताई मारोतीआप्पा पिंपळे यांच्या प्रेरणेने आयोजित या स्पर्धेत विदर्भातील विविध जिल्ह्यांमधून आलेल्या खेळाडूंनी आपला दमदार खेळ सादर करत क्रीडाप्रेमींची मने जिंकली. स्पर्धेचा अंतिम निकाल:

मुले गट: प्रथम (विजेता): अमरावती शहर द्वितीय (उपविजेता): वाशिम तृतीय (संयुक्त): भंडारा व यवतमाळ मुली गट: प्रथम (विजेता): गडचिरोली द्वितीय (उपविजेता): भंडारा तृतीय (संयुक्त): चंद्रपूर व अमरावती शहर भला मोठा केक ठरला विशेष आकर्षण!

## केळी उत्पादक विलास खारोडे यांना 'केळी रत्न' पुरस्कार



■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

केळी उत्पादन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल विलास जनार्दनराव खारोडे यांना 'केळी रत्न' कार्यगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पंढरपूर येथे ४ ऑक्टोबर रोजी केळी उत्पादक शेतकरी संघ महाराष्ट्र राज्याच्या वतीने आयोजित केळी परिषद व पुरस्कार सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटन भारतीय बनाना महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष हेमंत पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी महाराष्ट्र राज्य ऊस उत्पादक संघाचे संस्थापक अध्यक्ष अतुलनाना पाटील, केळी उत्पादक शेतकरी संघाचे संस्थापक अध्यक्ष किरण भाऊ चव्हाण यांच्यासह पदाधिकारी व केळी उत्पादक शेतकरी उपस्थित होते. दरम्यान, परिषदेत केळीला किमान ३० रुपये हमीभाव, स्वतंत्र केळी महामंडळाची स्थापना, शालेय आहारात केळीचा समावेश, प्रक्रिया उद्योगाला चालना तसेच विक्री व्यवस्थापन सुधारण्यासह विविध मागण्यांवर चर्चा करण्यात आली. शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी शासनाकडे पाठपुरावा करण्याचा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज ॲंड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २९६
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :— अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# वाघांच्या जंगलात मोबाईलची ‘सफारी’; नियम फक्त फलकांवरच

## बोर व्याघ्र प्रकल्पात जिओटॅग फोटो, व्हिडीओंचा धडाका; वन विभागाच्या कारवाईकडे वन्यजीवप्रेमींचे लक्ष

**सेलू/जनमाध्यम**

बोर व्याघ्र प्रकल्पात वन्यजीवांच्या सुरक्षेसाठी घालून दिलेल्या नियमांनाच हरताळ फासला जात असल्याचा गंभीर आरोप वन्यजीवप्रेमींनी केला आहे. सफारीदरम्यान पर्यटक, जिप्सी चालक आणि गाईडकडून मोबाईलचा वापर होत असून वाघांचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर प्रसारित केले जात असल्याने व्याघ्र सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.



मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने सुओ मोटो जनहित याचिका क्रमांक १/२०२५ मध्ये १० जानेवारी २०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार सफारीपूर्वी पर्यटकांचे मोबाईल फोन गेटवर जमा करणे अपेक्षित आहे. बोरधरण आणि अडेगाव येथील तिकीट कार्यालयाजवळ याबाबत सूचना फलकही लावण्यात आला आहे. मात्र, प्रत्यक्ष सफारीत मोबाईल वापर सुरू असल्याचे समोर येत आहे.

२ ऑक्टोबर रोजी बोरधरण सफारीदरम्यान पर्यटकाने मोबाईलने टिपलेला वाघाचा फोटो सोशल मीडियावर प्रसारित झाला. त्यानंतर ४ ऑक्टोबर रोजी बांगडापूर बफर रेंजमधील ढगा जंगल सफारीत वाघाचा मोबाईलवर व्हिडीओ काढल्याचे दृश्यही समोर आले.

विशेष म्हणजे जीपीएस सुरू असलेल्या मोबाईलमधून काढलेल्या छायाचित्रांमध्ये लोकेशनची माहिती नोंदवली जाऊ शकते. ती सार्वजनिक झाल्यास वन्यजीवांच्या सुरक्षेला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. जिप्सी चालक आणि गाईडकडूनही नियमभंग होत असल्याचा आरोप आहे.नियमांचा धाक नाही की कारवाईची भीती नाही असा प्रश्न उपस्थित करत वन्यजीवप्रेमींनी मोबाईल वापरणाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

# स्वदेशी वस्तूंच्या वापरातून देशाला महासत्ता बनवूया

## विद्यार्थ्यांनी स्वदेशीचा विचार आत्मसात करण्याचे आवाहन

**वर्धा/जनमाध्यम**

स्वदेशी वस्तूंचा अधिकाधिक वापर करून देशांतर्गत रोजगाराला चालना दिल्यास भारताला महासत्ता बनविता येईल, असा विचार भाजपचे प्रदेश प्रवक्ते शिवराय कुलकर्णी यांनी व्यक्त केला.

स्वदेशी जागरण मंच वर्धातर्फे ‘२१व्या शतकात स्वदेशीचे महत्त्व’ या विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. पूर्वी भारताच्या वस्तूंचा जगभर मोठा व्यापार होत होता. आज चीन आणि अमेरिका मोठ्या प्रमाणात आपला माल जगभर विकत आहेत. त्यामुळे भारतीयांनी देशात तयार होणाऱ्या वस्तूंना प्राधान्य द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

डीमार्ट आणि वॉलमार्टसारख्या मोठ्या बाजारपेठांमुळे छोट्या दुकानदारांवर परिणाम होत आहे. त्याऐवजी स्थानिक बाजारातून भाजीपाला आणि वस्तूंची खरेदी केल्यास स्थानिक शेतकरी आणि व्यापाऱ्यांना त्याचा थेट लाभ मिळेल. स्वदेशी विचारात रोजगार निर्मितीसह समाजातील सर्व घटकांचा विचार असल्याचेही त्यांनी सांगितले.

स्पर्धेत गौरी भोमले प्रथम, वैदेही मस्के द्वितीय, कनक सोनटक्के तृतीय, तर रेणुका चांभारे यांना प्रोत्साहनपर पारितोषिक मिळाले. अध्यक्ष अजय पत्की यांनी युवकांनी आत्मनिर्भर होण्यासाठी आतापासून स्वदेशीचा विचार अंगीकारावा, असे आवाहन केले. किरण वडतकर यांनी प्रास्ताविक केले.

# श्वानांना वाचविण्याच्या नादात मालवाहू उलटला

## एक ठार : करंजी शिवारातील अपघात

**वर्धा/जनमाध्यम**

भरधाव मालवाहू वाहनासमोर अचानक आलेल्या श्वानांना वाचविण्याच्या प्रयत्नात चालकाचे नियंत्रण सुटले. वाहन रस्ता दुभाजकावर चढून उलटल्याने चालकाचा जागीच मृत्यू झाला. हा अपघात ६ ऑक्टोबर रोजी सकाळी वर्धा-मांडगाव मार्गावरील करंजी शिवारात घडला.

एजाज खान हमीद खान (२८, रा. भारतनगर, अकोला) असे मृत चालकाचे नाव आहे. एमएच ०१ सीआर ५६९७ क्रमांकाचे मालवाहू वाहन अकोला येथून शेतीविषयक औषधे घेऊन आरमोरीच्या दिशेने जात होते. करंजी शिवारात वाहन आले असता अचानक दोन ते तीन श्वान वाहनासमोर आले. त्यांना वाचविण्यासाठी चालकाने वाहन वळविण्याचा प्रयत्न केला.



यावेळी वाहनावरील नियंत्रण सुटल्याने मालवाहू रस्ता दुभाजकावर चढले आणि उलटले. या भीषण अपघातात चालक एजाज खान हमीद खान याचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच सेवाग्राम पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. अपघाताची नोंद सेवाग्राम पोलिस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

# दुःखाच्या काळात भोरे कुटुंबाच्या पाठीशी मयुरा काळे

## खासदाराच्या पत्नीने आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाची घेतली सांत्वनपर भेट

**आष्टी शहीद/जनमाध्यम**

कर्जबाजारीपणा, निसर्गाचा लहरीपणा आणि हातातोंडाशी आलेले पीक संकटात सापडल्याने मानसिक तणावातून अंतोरा येथील युवा शेतकरी प्रकाश भोरे यांनी ४ ऑक्टोबर रोजी आत्महत्या केली. या घटनेने भोरे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. या पार्श्वभूमीवर खा.अमर काळे यांच्या पत्नी मयुरा काळे यांनी ५ ऑक्टोबर रोजी अंतोरा येथे भोरे कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.



मयुरा काळे यांनी कुटुंबीयांशी संवाद साधत घटनेची माहिती जाणून घेतली. या कठीण प्रसंगी खचून न जाता धैर्याने पुढे जाण्याचा सल्ला देत त्यांनी कुटुंबीयांना धीर दिला. शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी, निसर्गाच्या लहरीपणामुळे होणारे पिकांचे नुकसान आणि त्यातून निर्माण होणाऱ्या संकटांमुळे अशा दुर्दैवी घटना घडत असल्याचे त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांना वेळेवर आर्थिक मदत तसेच शासकीय योजनांचा लाभ मिळणे आवश्यक असल्याचे मयुरा काळे यांनी नमूद केले. भोरे कुटुंबीयांनाही नियमानुसार शासकीय मदत मिळवून देण्यासाठी पाठपुरावा केला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. यावेळी मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

# किटकशास्त्रज्ञ प्रा. राजेंद्र जाणे यांचा अमरावतीत सत्कार



**आष्टी (शहीद)/जनमाध्यम**

जोलवाडी येथील किटकशास्त्रज्ञ प्रा. राजेंद्र नामदेवराव जाणे यांनी कृषी क्षेत्रात शेतकऱ्यांसाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत जाधव कुणबी समाज संस्थेच्या वतीने त्यांचा अमरावती येथे सत्कार करण्यात आला. खा.डॉ. अनिल बोंडे व वसुधा बोंडे यांच्या हस्ते शाल, प्रशस्तिपत्र व सन्मानचिन्ह देऊन त्यांना गौरविण्यात आले.

सेवानिवृत्तीनंतरही प्रा. जाणे यांनी कृषी विद्यापीठ, कृषी विभाग, रिलायन्स फाउंडेशन तसेच सर रतन टाटा ट्रस्टच्या माध्यमातून कृषी सल्लागार म्हणून कार्य सुरू ठेवले आहे. व्हॉट्सअॅप, टोल फ्री क्रमांक, मोबाईल, कृषी प्रशिक्षण, शेतकरी दिन, ऑडिओ व्हिडीओ कॉन्फरन्स, फिल्ड व्हिजिट्स, वृत्तपत्र, आकाशवाणी आणि दूरदर्शन अशा विविध माध्यमांतून त्यांनी महाराष्ट्रातील सुमारे सहा लाख शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

त्यांनी ३८४ कृषीविषयक लेख लिहिले असून प्रमुख पिके व फळपिकांवर तीन पुस्तके प्रकाशित केली आहेत. कृषी विद्यापीठातील सेवेदरम्यान २८ संशोधन निबंध आणि सात कृषी शिफारसी दिल्या. २०१० व २०११ मध्ये त्यांना संशोधन पुरस्कार मिळाले. वयाच्या ७३ व्या वर्षीही सेंद्रिय शेतीसाठी त्यांचे मार्गदर्शन सुरू आहे. विदर्भातील पाच हजार शेतकऱ्यांच्या शेतावर प्रत्यक्ष जाऊन त्यांनी मार्गदर्शन केले आहे.

# केळझरमध्ये गांजाची तस्करी उघड; तिघांवर एनडीपीएसचा गुन्हा

## १.२३ किलो गांजासह १.७१ लाखांचा मुद्देमाल जप्त; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**सेलू/जनमाध्यम**

अमली पदार्थांच्या तस्करीविरोधात कारवाई करत स्थानिक गुन्हे शाखेने केळझर येथील उड्डाणपुलाखाली गांजाची वाहतूक करणाऱ्या आरोपीला ताब्यात घेतले. त्याच्याकडून १ किलो २३ ग्रॅम गांजासह दुचाकी आणि मोबाईल असा एकूण १ लाख ७१ हजार १५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



अजयसिंग उर्फ सुखा किसनसिंग बावरी रा. केळझर असे ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव आहे. तो एमएच ४० डीडी ६२२२ क्रमांकाच्या पल्सरवरून गांजा घेऊन जात असताना पोलिसांनी सापळा रचून त्याला पकडले.

चौकशीदरम्यान अजयसिंग हा भाऊ भोलासिंग किसनसिंग बावरी याच्यासोबत गांजाची विक्री करीत असल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले. तसेच हा गांजा रायपूर हिंगणा जि. नागपूर येथील गगनसिंग अंगदसिंग दुधानी याच्याकडून खरेदी केल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी भोलासिंग आणि गगनसिंग यांनाही आरोपी केले. या प्रकरणी सेलू पोलिस ठाण्यात तिन्ही आरोपींविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्हा पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ही कारवाई केली.

# वडार समाजाच्या मागणीला ५०० ब्रासची मंजुरी

## आ. सुमित वानखेडेंच्या पाठपुराव्याला यश

**आर्वी/जनमाध्यम**

पिढ्यानपिढ्या दगडफोडी आणि गौण खनिज उत्खननाच्या पारंपरिक व्यवसायावर उपजीविका करणाऱ्या वडार समाजाच्या प्रलंबित मागणीला राज्य शासनाने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. ६ ऑक्टोबर रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत गौण खनिजाच्या स्वामित्वधनासाठी असलेली सवलत वाढविताना वार्षिक उत्खननाची मर्यादा २०० ब्रासवरून ५०० ब्रास करण्यास मंजुरी देण्यात आली. यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल नियम १९६८ मध्ये आवश्यक सुधारणा करण्यात येणार आहेत.

वडार समाजाच्या पारंपरिक व्यवसायातील वाढता खर्च लक्षात घेता २०० ब्रासची मर्यादा अपुरी ठरत असल्याची मागणी समाजाच्या वतीने करण्यात आली होती. दरम्यान, या मागणीचे निवेदन सुरज पिठेकर यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे आमदार सुमित वानखेडे यांच्या माध्यमातून सादर केले होते. या मागणीसाठी आमदार वानखेडे यांनी मंत्रालय स्तरावर पाठपुरावा केल्याचे सांगण्यात येते.

मंत्रिमंडळाच्या निर्णयामुळे पात्र वडार कुटुंबांना पारंपरिक व्यवसायासाठी अधिक उत्खननाची संधी मिळणार आहे. त्यामुळे वाढत्या मजुरी,वाहतूक,डिझेल आणि अवजारांच्या खर्चाच्या पार्श्वभूमीवर व्यवसायाला आधार मिळण्याची अपेक्षा आहे. निर्णयाचे वडार समाजाच्या वतीने स्वागत करण्यात आले असून, मागणीसाठी पाठपुरावा केल्याबद्दल आमदार सुमित वानखेडे यांचे समाजबांधवांनी आभार मानले.

# वर्धा येथील रंगली व्हॉलीबॉल लीग, साई स्पायकर्स विजेते

## डीसीसी डिफेंडर्स उपविजेता; पाच संघांत रंगली चुरशीची लढत

**वर्धा/जनमाध्यम**

मोबाईलच्या पडद्यापासून तरुणांना मैदानाकडे आणण्यासाठी मैदानी खेळांची गरज आहे. खेळामुळे शिस्त, नेतृत्व, संघभावना आणि संघर्षाची वृत्ती विकसित होते. मर्यादित साधनसामग्रीतही वर्धा जिल्ह्यात व्हॉलीबॉलची परंपरा जिवंत ठेवण्याचे जिल्हा व्हॉलीबॉल प्रशिक्षण केंद्राचे कार्य कौतुकास्पद आहे. अशा उपक्रमांतून भविष्यात जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू घडतील, असे प्रतिपादन पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी केले.



राष्ट्रीय व्हॉलीबॉलपटू स्व. रवी वानखडे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ जिल्हा व्हॉलीबॉल प्रशिक्षण केंद्रातर्फे आयोजित डीसीसी व्हॉलीबॉल लीगमध्ये साई स्पायकर्सने अंतिम सामन्यात डीसीसी डिफेंडर्सचा २-१ सेटने पराभव करीत विजेतपद पटकावले. ३ आणि ४ ऑक्टोबर रोजी जिल्हा क्रीडा संकुलातील मैदानावर ही स्पर्धा झाली.

लिलावातून पाच तुल्यबळ संघ तयार करण्यात आले होते. अनुभवी आणि युवा खेळाडूंच्या सहभागामुळे प्रत्येक सामना रंगतदार झाला. अंतिम सामन्यात दोन्ही संघांनी आक्रमण आणि बचावाचा सुरेख मेळ साधला. अखेर साई स्पायकर्सने बाजी मारली.विजेता व उपविजेत्यांना चषक आणि रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

सुजल काळे, वेदांत अडसड, जय हिवसे, चुशक गोहाने, करण चाफले आणि आर्यन देवगिरकर यांना उदयोन्मुख खेळाडू पुरस्कार देण्यात आला. उद्घाटन नगराध्यक्ष डॉ. सुधीर पांगुळ यांच्या हस्ते झाले. प्रा. नितीन घोडे यांनी समन्वयाची जबाबदारी सांभाळली.

# संक्षिप्त

## जावयाने मित्रासह सासऱ्याला मारहाण

**वर्धा** - पत्नी आणि मुलीसह जात असलेल्या व्यक्तीचा ऑटो अडवून जावयाने मित्राच्या मदतीने मारहाण केल्याची घटना सावंगी मेघे पोलिस ठाण्याच्या हद्दीत देशकंजी बसस्थानकाजवळ घडली. याप्रकरणी गणेश नारायण पिपले वय ४२ रा. आकोली हेटी ता. सेलू यांनी तक्रार दिली. पोलिसांच्या माहितीनुसार, ५ ऑक्टोबर रोजी रात्री दहाच्या सुमारास जावयाने त्याच्या मित्रासह मोटारसायकल आडवी करून ऑटो थांबविला. ऑटोमधून बाहेर आल्यानंतर पिपले यांच्या मुलाला दोघांनी गालावर व पायावर मारहाण केली. भांडण सोडविण्यास गेलेल्या पिपले यांनाही लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यात आली. शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे. तक्रारीवरून सावंगी मेघे पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## मेडिकलमध्ये कामासाठी गेलेला तरुण बेपत्ता

**वर्धा** - मेडिकलमध्ये कामासाठी घरून निघालेला २८ वर्षीय तरुण बेपत्ता झाल्याची तक्रार वर्धा शहर पोलिस ठाण्यात दाखल झाली आहे. शुभम राजकुमार गायकवाड रा. सिद्धार्थनगर, बोरगाव मेघे असे बेपत्ता तरुणाचे नाव आहे. पत्नी इथा गायकवाड यांनी पोलिसांत तक्रार दिली. ५ ऑक्टोबर रोजी सकाळी साडेसहा वाजता शुभम कामासाठी घरून निघाला. मात्र तो मेडिकलमध्ये पोहोचला नसल्याचे मालकाने पत्नीला फोन करून सांगितले. त्यानंतर शुभमच्या मोबाईलवर संपर्क साधला असता तो बंद आढळला. नातेवाईक, मित्र आणि परिसरात शोध घेऊनही त्याचा ठावठिकाणा लागला नाही.त्यामुळे कोणीतरी अनोळखी व्यक्तीने गैरउद्देशाने अपहरण केले असावे, असा संशय पत्नीने व्यक्त केला आहे. शुभमची उंची पाच फूट पाच इंच असून त्याने पांढरा शर्ट, निळी जीन्स व पांढऱ्या रंगाची चप्पल घातली होती.

## १९ वर्षीय तरुणी कॉलेजला गेली अन् परतलीच नाही

**वर्धा** - कॉलेजला जाण्यासाठी घरातून निघालेली १९ वर्षीय तरुणी बेपत्ता झाल्याची घटना पवनार परिसरात समोर आली आहे. वैष्णवी गजानन उमाटे रा. पवनार असे बेपत्ता तरुणीचे नाव आहे. याप्रकरणी तिचे वडील गजानन उमाटे यांनी सेवाग्राम पोलिसांत तक्रार दिली. ४ ऑक्टोबर रोजी सकाळी दहाच्या सुमारास वैष्णवी कॉलेजला जात असल्याचे सांगून घरातून निघाली. मात्र त्यानंतर ती घरी परतली नाही. कुटुंबीयांनी तिच्या मैत्रिणी, नातेवाईक तसेच परिसरात शोध घेतला. विविध ठिकाणी चौकशी करूनही तिचा शोध लागला नाही. त्यामुळे कोणीतरी अनोळखी व्यक्तीने तिला पळवून नेले असावे, असा संशय तक्रारीत व्यक्त करण्यात आला आहे. या तक्रारीवरून सेवाग्राम पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. वैष्णवीचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून माहिती संकलित केली जात आहे.

## शेगाव रेल्वेस्थानकावर सोडले अन् तरुण गायब

**वर्धा** - मित्राने शेगाव रेल्वेस्थानकावर सोडल्यानंतर २२ वर्षीय तरुण बेपत्ता झाल्याची घटना तुळजापूर परिसरात समोर आली आहे. दर्शन प्रफुल्लराव चावरे रा. तुळजापूर ता. सेलू असे बेपत्ता तरुणाचे नाव आहे. २७ सप्टेंबर रोजी दुपारी तीनच्या सुमारास मित्राकडे जाण्याचे सांगून दर्शन घरातून निघाला होता. त्यानंतर तो मित्रांसोबत शेगावला गेला. मोबाईल बंद झाल्याने कुटुंबीयांनी त्याच्या मित्रांकडे चौकशी केली. मित्राने ५ ऑक्टोबर रोजी सकाळी अकराच्या सुमारास दर्शनला शेगाव रेल्वेस्थानकावर सोडल्याचे सांगितले. मात्र त्यानंतर तो घरी परतला नाही. त्याचे मोबाईल क्रमांक बंद आहेत. दर्शन शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवत असल्याने त्याच्यावर कर्ज झाले असावे, असा कुटुंबीयांचा संशय आहे. दहेगाव गोपाळपूर पोलिसांनी गुन्हा दाखल करून शोध सुरू केला आहे.

## बकरी-बोकडावर चोरट्यांचा डल्ला

**पुलगाव** - घराजवळील बजरंगबली मंदिर परिसरात चरणाऱ्या बकरी आणि बोकडाची अज्ञात चोरट्याने चोरी केल्याची घटना पुलगाव परिसरात घडली. भानरेश विजयराव वानखेडे वय ४८ रा. पुलगाव यांनी पोलिसांत तक्रार दिली. वानखेडे हे सिक्युरिटी गार्ड म्हणून काम करतात. त्यांच्याकडे २२ बकऱ्या आणि एक बोकड होता. २२ सप्टेंबर रोजी सकाळी पावणेदहाच्या सुमारास त्यांनी जनावरे चारण्यासाठी सोडली होती. घरातील काम आटोपून पाहणी केली असता एक बकरी आणि बोकड दिसून आले नाही. परिसरात तसेच गावातील खाटीक आणि इतरांकडे चौकशी करूनही त्यांचा शोध लागला नाही. लाल रंगाची बकरी आणि लाल रंगाचा बोकड असा सुमारे ३० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेल्याची तक्रार आहे. पुलगाव पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## विषारी औषध प्राशन करून तरुणाचा मृत्यू

**आष्टी** - विषारी औषध प्राशन केल्याने ३० वर्षीय तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना गंगापूर शिवारात घडली. सुनील बाबाराव चौधरी रा. जळगाव असे मृताचे नाव आहे. याप्रकरणी त्याचे वडील बाबाराव चौधरी यांनी पोलिसांना माहिती दिली. ६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास सुनील शेतातील गोठ्याजवळ पडलेल्या अवस्थेत आढळला. त्याच्या तोंडातून फेस येत होता तसेच विषारी औषधाचा वास येत होता. घटनास्थळी औषधाची बाटलीही आढळली. नातेवाईकांच्या मदतीने त्याला वाहनातून आर्वी येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. सुनीलला दारूचे व्यसन असल्याचे वडिलांनी सांगितले. त्याच्या मृत्यूबाबत कोणावरही संशय नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आष्टी पोलिसांनी मर्ग दाखल करून तपास सुरू केला आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ३११
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# लायन्स क्लब 'अमरावती रियल' व 'रियल सफायर'तर्फे मोफत आरोग्य तपासणी शिबीर

## २३६ नागरिकांनी घेतला लाभ



**अमरावती/प्रतिनिधीः-** लायन्स क्लब अमरावती रियल व लायन्स क्लब ऑफ अमरावती रियल सफायर यांचे संयुक्त विद्यमाने मधुमेह ,हेल्थ चेकअप तसेच डेंटल चेकअप शिबिर रूपभजन चॅरिटेबल हॉस्पिटल राजापेठ, अमरावती येथे दिनांक ३ ऑक्टोंबर २०२६ रोजी घेण्यात आले. यावेळी २३६ लोकांचे ब्लड शुगर तपासणी, ब्लड प्रेशर तपासणी तसेच डेंटल चेकअप करण्यात आले. याप्रसंगी सर्विस चेअर पर्सन लॉयन सुनील जोशी, सर्विस वीक कॉर्डिनेटर बबनराव वैराळे ,रिजन चेअर पर्सन ॲड.प्रशांत देशमुख, कॅबिनेट ऑफिसर लायन जय तेजवानी , कॅबिनेट ऑफिसर दिनेश अग्रवाल त्याचप्रमाणे लायन क्लब अमरावती रियल चे प्रेसिडेंट डॉक्टर दीपक क-हे, सेक्रेटरी श्याम जडिया, सदस्य नितीन टवलारे, चंद्रदत्त मिश्रा, हरीश उदासी , राजा किंगराणी, मनोज मिश्रा, मंथन कडू उपस्थित होते.

लायन्स क्लब ऑफ अमरावती रियल सफायरचे प्रेसिडेंट नेहा उदासी, व्हाईस प्रेसिडेंट, रितू तेजवानी, ट्रेझर कशिश किंगराणी, ज्योती टवलारे व ज्योति क-हे उपस्थित होते. लायन्स क्लबच्या ॲक्टिव्हिटीमुळे सामान्य नागरिकांनी सुद्धा उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

# एनएमएमएस परीक्षेच्या ऑनलाइन अर्जासाठी मुदतवाढ

## १४ ऑक्टोबरपर्यंत अर्ज करता येणार

**अमरावती/प्रतिनिधीः-** राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना (एनएमएमएस) परीक्षेसाठी ऑनलाइन शाळा नोंदणी आणि विद्यार्थ्यांचे ऑनलाइन आवेदनपत्र भरण्याच्या मुदतीत वाढ करण्यात आली असून आवेदनपत्र भरण्याची प्रक्रिया महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in आणि www.mscenmms.in संकेतस्थळांवर उपलब्ध आहे. २० डिसेंबर २०२६ रोजी होणाऱ्या या परीक्षेसाठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांनी सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे.

सुधारित वेळापत्रकानुसार, नियमित शुल्कासह ऑनलाइन आवेदनपत्र भरण्याची मुदत ८ ऑक्टोबर ते १४ ऑक्टोबर २०२६ अशी करण्यात आली आहे. यापूर्वी ही मुदत ६ सप्टेंबर ते ७ ऑक्टोबर २०२६ अशी होती. तसेच विलंब शुल्कासह आवेदनपत्र भरण्याची मुदत १५ ऑक्टोबर ते २१ ऑक्टोबर २०२६ अशी निश्चित करण्यात आली आहे. मात्र, यापुढे अतिविलंब शुल्कासह आवेदनपत्रे भरण्याची सुविधा उपलब्ध राहणार नाही, असे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने स्पष्ट केले आहे. २१ ऑक्टोबर २०२६ नंतर कोणत्याही परिस्थितीत ऑनलाइन अथवा ऑफलाइन पद्धतीने आवेदनपत्र भरता येणार नाही, याची नोंद घेण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. शाळांनी आणि विद्यार्थ्यांनी अंतिम मुदतीची वाट न पाहता आवश्यक प्रक्रिया वेळेत पूर्ण करावी, असे आवाहन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्याकडून करण्यात आले आहे.

# शासकीय विदर्भ ज्ञान-विज्ञान संस्थेत गणित मॉडेल प्रदर्शन



**अमरावती/प्रतिनिधीः-** शासकीय विदर्भ ज्ञान-विज्ञान संस्था(स्वायत्त), अमरावती येथे गणित विभागाच्या वतीने Mathematical Model Exhibition आणि Mathematical Poster Presentation Competition या दोन स्पर्धांचे उत्साहात आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी गणितातील विविध संकल्पना, सिद्धांत आणि त्यांचे व्यावहारिक उपयोग नाविन्यपूर्ण मॉडेल्स व आकर्षक पोस्टर्सच्या माध्यमातून सादर केले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे व विषयतज्ज्ञ म्हणून प्राध्यापक डॉ. राजेश व्ही. बरडे सर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संचालक डॉ. केशव तुपे सर होते. यावेळी गणित विभाग प्रमुख डॉ. एस. बी. थूल सर तसेच प्रभारी प्राध्यापक डॉ. आर. एम. धायगुडे सर यांची प्रमुख उपस्थिती होती.

Mathematical Model Exhibition मध्ये विद्यार्थ्यांनी विविध गणितीय संकल्पनांवर आधारित नाविन्यपूर्ण मॉडेल्स सादर केली. यामध्ये ज्यांनी क्रमांक पटकाविला आहे असे विशेष उल्लेखनीय मॉडेल्स पुढीलप्रमाणे आहेतः- Möbius Strip, - HypeRolic Uses in Future Art and Architecture, - Kruskal's Algorithm.

मॉडेल प्रदर्शनामध्ये उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये प्रथम क्रमांक ऐश्वर्या रामकृष्ण धायगुडे, द्वितीय क्रमांक मोहम्मद अम्मान व सिद्धी माहुलकर तर तृतीय क्रमांक पायल राऊत व नेहा घनवट यांनी मिळवला.

तसेच Mathematical Poster Presentation Competition मध्ये प्रथम क्रमांक गायत्री सानप, द्वितीय क्रमांक सुहानी हळदे आणि तृतीय क्रमांक नेहा घनवट यांनी पटकावला.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला, संशोधनवृत्तीला आणि गणितीय दृष्टिकोनाला चालना मिळाली.

## जाहीर नोटीस

प्रोसेस क्र.४९९३/२०२६

**अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधिश-१, यांचे न्यायालय**

नियमित दिवाणी अपील क्र.१४६/२०२५ — ने.ता.१५/१०/२०२६

**Applicant :- Sindh Machinery Stores**

--Versus--

**Non Applicant :- Siddhi Vinayak Ginning and Pressing Unit**

**Banam** :- 1. Siddhi Vinayak Ginning and Pressing Unit through its Partners :-
A) Subhash Pardhi, R/o. Saraswati Nagar, Amravati
B) Satish Pundlikrao Malve, R/o. Nirul Gangamai, Tq. Bhatkuli, Dist. Amravati
C) Mayur Ashokrao Mathurkar R/o. Galli No.2, Saraswati Nagar, Amravati

**APPLICATION FOR SUBSTITUTED SERVICE UNDER ORDER 5 RULE 20 OF CIVIL PROCEDURE CODE, 1908**

ज्याअर्थी वरील **अर्जदार सिंध मशनरी स्टोअर्स** यांनी **वि. जिल्हा व सत्र न्यायाधिश-१, अमरावती** यांच्या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी वरिल गैरअर्जदार **सुभाष पारडी, सतीश पुंडलिकराव मालवे, मयुर अशोकराव माथुरकर** यांना वारंवार नोटीस देऊनही न्यायालयात हजर राहत नसल्यामुळे त्यांना पेपर प्रसिध्दीव्दारे नोटिस देण्यात येते की, त्यांनी अर्जाच्या सुनावणीसाठी **दि.१५.१०.२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता **वि.जिल्हा व सत्र न्यायाधिश-१, अमरावती** यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदहू अर्जाची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक ०५/१०/२०२६ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दीसाठी दिला असे.

अमरावती
दिनांक : ०५/१०/२०२६

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहा.अधिक्षक (न्यायिक विभाग)**
**जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती**

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.२०९९/२०२६**
**आरती व दोन वि.निरंक**
**पुढील ता.३०.१०.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :-**
1. **Smt. Arti Pramodrao Khedkar,** Age 66 yrs. Occ.- Housewife
2. **Tushar Pramodrao Khedkar,** Age 39 yrs. Occ.- Private Job
   Both 1 & 2 R/o. Galli No.4, Shyam Nagar, Near Rukmini Nagar, Amravati
3. **Sau. Pratiksha Amol Landge, (After Marriage)**
   **Ku. Pratiksha Pramod Khedkar (Before Marriage)**
   Age 37 yrs. Occ.- Housewife
   R/o.7, Bungalow, Prakash Vihar, Near Gajanan Maharaj Mandir, Rahatgaon, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार- NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Pramod Dadarao Khedkar** हे दिनांक **२९.०६.२०२६** रोजी **अमरावती** येथे मयत झाले. **Smt. Arti Pramodrao Khedkar+2** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Smt. Arti Pramodrao Khedkar+2** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.२९.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ८ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.२०१८/२०२६**
**हसन नुरुन्निसा अब्दुल कय्युम व इतर वि.निरंक**
**पुढील ता.०६.११.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :-**
१. **हसन नुरुन्निसा अब्दुल कय्युम,** वय ६२ वर्षे, धंदा- गृहिणी
२. **अब्दुल इमरान अब्दुल कय्युम,** वय ४२ वर्षे,धंदा-मजुरी,
३. **मोहम्मद रिजवान अब्दुल कय्युम,** वय ३६ वर्षे, धंदा-मजुरी,
४. **मोहम्मद इरफान अब्दुल कय्युम,** वय ४४ वर्षे, धंदा-मजुरी,
   सर्व रा.छाया नगर, अमरावती, ता.जि.अमरावती ४४४ ६०१
५. **शेख सुमय्या शेख रशीद,**वय ४० वर्षे, धंदा- गृहिणी
   रा.जळका जगताप, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती- ४४४ ९०४

-- विरुध्द --

**गैरअर्जदार- निरंक**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की **मयत अब्दुल कय्युम अब्दुल सलाम** हे दिनांक **०८.०२.२०१६** रोजी अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार हसन नुरुन्निसा अब्दुल कय्युम व इतर वि निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **हसन नुरुन्निसा अब्दुल कय्युम व इतर वि निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.०३.१०.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

## फ्लॅट विकणे आहे

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरेस असा फ्लॅट आहे.

**संपर्क : ९४२२८५७१६९ ९४२२१२०४०६**

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.१९३८/२०२६**
**भावना + २ वि.निरंक**
**पुढील ता.१५.१०.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :-**
1. **Bhavana Dilip Khadse,** Aged 55 yrs. Occ.- Household
   R/o. Manik Apartment Flat No. 07, Patvipura Ambagate, Amravati
2. **Chetana Dilip Khadse,** Aged 27 yrs. Occ.- Private Job
   R/o. Manik Apartment Flat No. 07, Patvipura Ambagate, Amravati
3. **kshitij Dilip Khadse,** Age 25 yrs. Occ.- Private Job
   R/o. Manik Apartment Flat No. 07, Patvipura Ambagate, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार- NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Dilip Namdorao Khadse** हे दिनांक **२२.०६.२०२५** रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **Bhavana Dilip Khadse + 2** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Bhavana Dilip Khadse + 2** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.२३.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

## -जाहीर नोटीस-

**विद्यमान ए.बी. कट्टे साहेब न्यायदंडाधिकारी प्र.श्रेणी अमरावती यांचे न्यायालय (कोर्ट नं.०१)**

**कि.कि.अर्ज क्र.११२८/२०२६**

**अर्जदार-** **गोवर्धन सकारुजी राठोड, वय ५४ वर्ष, रा.बोडणा, अमरावती, ता.जि.अमरावती**
**गैरअर्जदार-** **रजिस्टार, अमरावती महानगरपालिका, ता.जि.अमरावती**

ज्या अर्थी यातील अर्जदाराने मा.कोर्ट क्र.१ मध्ये जन्म व मृत्यू ची नोंदणी अधिनियम १९६६ चे कलम १३ (३), ३ (ए) प्रमाणे यातील अर्जदार **गोवर्धन सकारुजी राठोड** यांनी **विक्की गोवर्धन राठोड** यांच्या जन्माची नोंद दिनांक ०७/१०/२००१ रोजी झाली आहे. अशी नोंद करणेचा हुकूम होणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर अर्जाबाबत कोणाची काही तक्रार अगर हरकत असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आंत आपण आपल्या वकिलामार्फत अगर स्वतः मा.कोर्ट नं. १ यांनी नेमलेल्या तारखेपासून म्हणजेच दिनांक १६/११/२०२६ रोजी अगर त्यापुर्वी हजर होऊन म्हणणे मांडावे. सदर मुदतीत कोणाचीही तक्रार न आपल्या मा.कोर्ट नं. २ पुढील योग्य तो हुकुम करतील याची नोंद घ्यावी.

शिक्का

**आदेशानुसार**
**सही/-**
**(क.लिपिक)**
**सह दिवाणी न्यायालय, क.स्तर**
**अमरावती**

**No. 2**
**CIVIL JUDGE SENIOR DIVISION**
**IN THE COURT OF Vishaka B. Patil**
**10th Jt.Civil Judge Sr.Dn., Amravati, Amravati, Amravati.**

**SUMMONS FOR SETTLEMENT OF ISSUES**

(O. 5, R. 1, 5.)

**R.C.S./58/2026**
**Arvind Pandurang Thakare Vs Shrikant Arvindrao Thakare**
**NEXT DATE: 16-11-2026**

To,

**Shrikant Arvindrao Thakare**
**R/o Morshi Tq. Morshi Dist. Amravati., Morshi, AMRAVATI, MAHARASHTRA**

**Whereas Arvind Pandurang Thakare** has instituted a suit against you for you are hereby summoned to appear in this Court in person, or by a pleader duly instructed, and able to answer all material questions relating to the suit, or who shall be accompanied by some persons able to answer all such questions, on the **16-11-2026 at 11:00 o'clock in the forenoon,** to answer the claim; and further you are hereby directed to file on that day a written statement of your defence and to produce on the said day all documents in your possession or power upon which you base your defence or claim for set-off or counter-claim, and where you rely on any other document whether in your possession or power or not, as evidence in support of your defence or claim for set-off or counter-claim, you shall enter such documents in a list to be annexed to the written statement.

Take notice that, in default of your appearance on the day before mentioned, the suit will be heard and determined in your absence.

Given under my hand and the seal of the Court, this **06-10-2026**

**10th Jt.Civil Judge Sr.Dn., Amravati**

**Notice.** 1. Should you apprehend your witnesses will not attend of their own accord, you can have a summons from this Court to compel the attendance of any witness, and the production of any document that you have a right to call on the witness to produce, on applying to the Court and on depositing the necessary expenses.

2. If you admit the claim, you should pay the money into Court together with the costs of the suit, to avoid execution of the decree, which may be against your person or property, or both.Visit ecourts.gov.in for updates or download mobile app 'eCourts Services' from Android or iOS

**The** process is system generated and tränsmitted in secured manner by authorised user as such physical signature not applied.

शिक्का

महाराष्ट्र शासन

**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), अ.व.प्र.क्र.४,**
**जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती**

ई-मेल - SLAOUWP4@gmail.com — दूरध्वनी क्र. ०७२१-२६६३४४९

क्र./मं.अ./कावि/२९०/२०२६ — दिनांक - ०६/१०/२०२६

**दुरुस्तीपत्रक**

**संदर्भ** - या कार्यालयाचे कलम ११ अधिसूचना क्र. मं.अ./उपजि/भू.सं./अ.व.प्र.क्र.४/कावि/२००/२६, दि. २०/०८/२०२६ उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), अ.व.प्र.क्र. -४ अमरावती यांच्या फाईल वरील भूसंपादन प्रकरण क्र. ७३/४७/२०२५-२६, मौजा बासलापुर, ता. चांदुर रेल्वे जि. अमरावती या प्रकरणात कलम ११ ची अधिसूचना प्रसिद्ध झालेली आहे. त्यातील अनुसूची १ मध्ये खालील प्रमाणे दुरुस्ती वाचावी.

**अनुसूची - एक**

| ऐवजी | | | असे वाचावे | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | सर्व्हे नंबर/ गट नंबर | अंदाजित क्षेत्र (हेक्टर आर) | अ. क्र. | सर्व्हे नंबर/ गट नंबर | अंदाजित क्षेत्र (हेक्टर आर) | अ.क्र. | सर्व्हे नंबर/ गट नंबर | अंदाजित क्षेत्र (हेक्टर आर) |
| १ | १० | ०.१५ | १ | १० | ०.१५ | १३ | ६९ | ०.७४ |
| २ | १५ | ०.२० | २ | १५ | ०.२० | १४ | ७० | १.४७ |
| ३ | १६ | ०.८१ | ३ | १६ | ०.८१ | १५ | ७१ | ०.७९ |
| ४ | १७/१ १७/२ | ०.६९ | ४ | १७/१ १७/२ | ०.६९ | १६ | ७२ | ०.०१ |
| ५ | १८ | ०.२८ | ५ | १८ | ०.२८ | १७ | ९१ | ०.०३ |
| ६ | १९ | ०.४० | ६ | १९ | ०.४० | १८ | ९२ | ०.०३ |
| ७ | २० | ०.२१ | ७ | २० | ०.२१ | १९ | ९३ | ०.३८ |
| ८ | २१ | ०.२५ | ८ | २१ | ०.२५ | २० | ९४ | ०.३५ |
| ९ | २२ | ०.००३ | ९ | २२ | ०.००३ | २१ | ९५ | ०.३१ |
| १० | २५ | ०.०००१ | १० | २५ | ०.०००१ | एकूण क्षेत्र हे. आर. | | ७.१९ |
| ११ | ६७ | ०.०९ | ११ | ६७ | ०.०९ | | | |
| एकूण क्षेत्र हे. आर. | | ७.१९ | १२ | ६८ | ०.००४ | | | |

स्वा/-
**(प्रसन्नजीत प्रतिभा प्रकाश चव्हाण)**
*उपजिल्हाधिकारी (भूसंपादन),*
*अ.व.प्र.क्र.४, अमरावती*

## जाहीर नोटीस

विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) चांदुर बाजार, जि. अमरावती

**आर.एम.जे.सी. ४८७/२०२६** — **ने. ता. २७/११/२०२६**

**अर्जदार :-** १. **सुखदेव डोमाजी मेस्कर,** वय ७६ वर्षे, व्यवसाय मजुरी
२. **धनराज डोमाजी मेस्कर,** वय ६५ वर्षे, व्यवसाय मजुरी
दोन्ही रा. ब्राम्हणवाडा थडी ता. चांदुर बाजार जि. अमरावती

**विरुध्द.......**

**गैरअर्जदार :-** निरंक

**बॉम्बे स्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठीकाणी राहतात. **मृतक डोमाजी पुंजाजी मेसकर** यांचा **मृत्यु दि. १२/०९/२००८** रोजी तसेच **मृतक रेनाबाई डोमाजी मेसकर** हिचा **मृत्यु दि. १७/०९/१९९७** रोजी रा. ब्राम्हणवाडा थडी ता. चांदुर बाजार जि. अमरावती येथे झालेला आहे.

वारस नाहीत. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराव्यतीरिक्त इतर कोणीही कायदेशीर

अर्जदारांना मय्यताचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरीता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) चांदुर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.नं. ४८७/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. ०७/१०/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय क.स्तर , चांदूर बाजार

## जाहिरनामा

**विद्यमान न्यायाधिश साहेब (कनिष्ठ स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात**

**आर.एम.जे.सी क्र. ६४०/२०२६** — **ने. ता.२४/११/२०२५**

**अर्जदार-**
**१. नाजीम खान मनसब खान, वय ४५, धंदा-मजुरी**
**२. कय्युम खान मनसब खान वय ४३, धंदा मजुरी**
**३. मकसूद खान मनसब खान वय ४०, धंदा - मजुरी**
**४. अनिस खान मनसब खान वय ३४, धंदा-मजुरी**
**५. अय्युब खान मनसब खान वय ४५, धंदा-मजुरी**
**६. वसिम खां मनसब खान वय ३०, धंदा-मजुरी सर्व रा. रीतपूर, ता. मोर्शी, जि. अमरावती**

**विरुद्ध.**

**निरंक**

वरील अर्जदाराने विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब, कनिष्ठ स्तर मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन २, बॉम्बे रेग्युलेशन ?क्ट (८) १८२७प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदार क. १ ते ६ यांचे आई नामे रफिकाबी मनसब खान यांचा दि. १०/११/२०२५ रा. रितपूर, ता. मोर्शी, जि. अमरावती येथे मृत्यु झाला. तसेच अर्जदार यांचे वडील मनसब खान अजीज खान यांचा दि. १५/०४/२०२० रा. रितपूर, ता. मोर्शी, जि. अमरावती येथे मूत्यू झाला. अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस आहे. तसेच मयताचे नांव असलेलया शासकीय तथा निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताना वरील अर्जदारांशिवाय ईतर कोणतेही वारस नाहीत, तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, जर कोणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन एक महीण्याच्या आंत वि. न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा, अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक : ०७/१०/२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय क.स्तर , मोर्शी

## जाहीर नोटीस

श्रीमती रोहिणी वि. मनोरे, दिवाणी न्यायाधिश (क.स्तर), तिवसा, जि. अमरावती यांचे न्यायालय

जाहिरनामा

आर.एम.जे.सि. क्र. २१८/२०२६. — नेमलेली तारीखः- ०७/११/२०२६

अर्जदार :-१.Sau. Jaymala Shanbaba Bhosale @Ku. Jaymala Jham Pawar Age - 56 years, Occ. Homemaker, R/o. W/o. Shanbaba Bhosale, Sarsi (Ga), Bramhanwada Govindpur, Tal. Amravati, Dist. Amravati.

-Versus-

गैरअर्जदार :- Nil

या नोटीस द्वारे सर्व लोकांस सुचित करण्यात येते की, **सौ. जयमाला शानबाबा भोसले उर्फ जयमाला झाम पवार** यांनी दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) तिवसा यांचे न्यायालयात वारसा हक्काचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता APPLICATION UNDER BOMBAY REGULATION ACT FOR RECOGNITION OF LEGAL HEIRS अन्वये अर्ज दाखल केलेला आहे.

अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, **झाम रामराव पवार** यांचा मृत्यु **२०१६** साली झालेला आहे. **बयना झाम पवार** यांचा मृत्यु **दिनांक २४/१०/२०१५** रोजी शेंदोळा बु., ता. तिवसा, जि. अमरावती येथे झालेला आहे. अर्जदार यांचे शिवाय मयतांचे इतर कोणीही वारसदार नाही असे अर्जदाराने अर्जामध्ये नमूद केले आहे.

वरील प्रमाणे सदरहु **बयना झाम पवार** मय्यताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासुन एक महिन्याचे आत या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास न्यायालय अर्जदारास त्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांना वारसा हक्काचे प्रमाणपत्र घोषीत करून देण्यात येईल.

आज दिनांक **०६ माहे ऑक्टोबर २०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय क.स्तर , तिवसा

शिक्का

## जाहीर नोटीस

विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) चांदुर बाजार, जि. अमरावती.

**आर.एम.जे.सी. ४५५/२०२६** — **ने. ता. २९/१०/२०२६**

**अर्जदार :-** **१. आरेफाजहा अब्दुल जब्बार,** वय ७६ वर्षे, व्यवसाय घरकाम
रा. निमखेडा ता. चांदूर बाजार जि. अमरावती
**२. अजमत जहा सय्यद लियाकत ली,** वय ५५ वर्ष, व्यवसाय घरकाम
रा. वार्ड नं. ०१ आखदवाडा ता. जि. अमरावती
**३. आबिद हुसैन गुलाम हुसैन,** वय ५० वर्ष व्यवसाय - शेती
**४. फारूक हुसैन गुलाम हुसैन,** वय ५० वर्ष व्यवसाय - शेती चांदूर बाजार जि. अमरावती अर्जदार क्र. ३ व ४ रा. बेलोरा ता.

**...विरुध्द......**

**गैरअर्जदार :-** निरंक

**बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठीकाणी राहतात. **मृतक गुलाम हुसैन शेख कडतु** यांचा **मृत्यु दि. २९/०४/२०२८** रोजी रा. बेलोरा ता. चांदुर बाजार जि. अमरावती येथे झालेला आहे. तसेच **मृतक बतुल बी गुलाम हुसेन** हिचा **मृत्यु दि. १२/०२/२०१९** रोजी रा. बेलोरा ता. चांदूर बाजार जि. अमरावती येथे झालेला आहे.

वारस नाहीत. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराव्यतीरिक्त इतर कोणीही कायदेशीर अर्जदारांना मय्यताचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरीता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) चांदुर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.नं. ४५५/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. २१/०९/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय
चांदूर बाजार

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ३४**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा दावा; जि.प. शाळांमध्ये सुविधांचा दुष्काळ

## एक-दोन शिक्षकांवर शाळांचा भार, टिनाच्या शेडमध्ये चिमुकल्यांचे शिक्षण

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

एकीकडे गुणवत्तापूर्ण व डिजिटल शिक्षणाच्या घोषणा केल्या जात असताना, अंजनगाव बारी परिसरातील जिल्हा परिषद शाळांमध्ये मात्र मूलभूत सुविधांचीच वानवा असल्याचे चित्र आहे. काही शाळांचे वीजबिल थकीत असून, पंखे, डिजिटल संच, टीव्ही तसेच आवश्यक शैक्षणिक साहित्याचा अभाव आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना गैरसोयीच्या वातावरणात शिक्षण घ्यावे लागत आहे.

परिसरातील काही शाळा एक-दोन शिक्षकांच्या भरवशावर सुरू असल्याने अध्यापनाचा अतिरिक्त भार शिक्षकांवर पडत आहे. काही ठिकाणी टिनाच्या शेडमध्ये चिमुकल्यांना शिक्षण घ्यावे लागत असून, शाळांच्या भौतिक सुविधांचा प्रश्न गंभीर बनला आहे.शाळांमध्ये विद्यार्थ्यांना शुद्ध व सुरक्षित पिण्याचे पाणी मिळणे ही प्राथमिक गरज असतानाही परिसरातील बऱ्याच शाळांमध्ये शुद्ध पाण्याची समस्या असल्याचे सांगितले जात आहे. काही ठिकाणी योग्य पाणी फिल्टरची सुविधा नसल्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शाळांमध्ये सुरक्षित पिण्याचे पाणी व आवश्यक फिल्टरची व्यवस्था तातडीने करण्याची मागणी पालकांकडून होत आहे.

ग्रामपंचायत स्तरावर शाळांसाठी उपलब्ध होणाऱ्या १० टक्के निधीतून काही सुविधा



पुरविण्याचा प्रयत्न केला जात असला, तरी परिसरातील सर्व शाळांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी हा निधी अपुरा पडत असल्याचा प्रश्न उपस्थित केला जात आहे.त्यातच गेल्या दोन पंचवार्षिकांपासून जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावर प्रशासकीय व्यवस्था असल्याने शाळांच्या विकासासाठी आवश्यक निधी, नियोजन आणि नियमित पाठपुराव्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. ग्रामपंचायतीचा मर्यादित निधी आणि जिल्हा परिषद-पंचायत समिती स्तरावरील प्रशासकीय कारभार असताना शाळांना आवश्यक निधी मिळणार कसा? असा सवाल पालक व ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे. ग्रामपंचायतीचे माजी प्रशासक सरपंच तसेच सध्या ग्रामपंचायतीचा प्रशासकीय कारभार पाहणारे विस्तार अधिकारी यांनी गावातील जिल्हा परिषद शाळांच्या समस्यांकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी होत आहे. मासिक बैठका व ग्रामसभांमध्ये वीजबिल, शुद्ध पिण्याचे पाणी, पंखे, डिजिटल संच, टीव्ही, शैक्षणिक साहित्य, शिक्षकांची कमतरता आणि शाळांच्या भौतिक सुविधांचा प्रश्न प्राधान्याने मांडून संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करावा. केवळ कागदोपत्री कार्यवाही न करता प्रत्यक्ष पाहणी करून निधी उपलब्ध करून देत समस्या मार्गी लावण्याची मागणी होत आहे.

विद्यार्थ्यांना सुरक्षित शाळा, शुद्ध पाणी आणि आवश्यक शैक्षणिक सुविधा मिळणे ही प्राथमिक गरज आहे. त्यामुळे 'गुणवत्तापूर्ण शिक्षणा'च्या घोषणांपेक्षा प्रत्यक्ष शाळांमध्ये सुविधा पोहोचविण्यास प्रशासनाने प्राधान्य द्यावे, अशी जोरदार मागणी पालक व ग्रामस्थांकडून होत आहे.

# 'काउच पफी'चे सर्वेसर्वा अनिल अग्रवाल यांना 'सर्वोत्कृष्ट उद्योजक' पुरस्कार

## 'द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स'तर्फे सन्मान

**अमरावती/प्रतिनिधी**

येथील 'द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स'तर्फे नुकतीच अनिलकुमार अग्रवाल यांची 'सर्वोत्कृष्ट उद्योजक' म्हणून निवड करून त्यांचा सन्मान करण्यात आला. विदर्भ विभागातील चार जिल्ह्यांमधून या प्रतिष्ठित पुरस्कारासाठी निवड झालेल्या उद्योजकांमध्ये अग्रवाल हे विशेष उल्लेखनीय ठरले.

'होनेहार बिरवान के होत चिकने पात' ही प्रसिद्ध हिंदी म्हण आहे. एखाद्या सक्षम आणि प्रतिभावान व्यक्तीचे गुण तिच्या बालपणापासूनच दिसून येतात, असा या म्हणीचा अर्थ आहे. एखाद्या रोपट्याची कोवळी, सुंदर पाने पुढे ते फुलणारे आणि फळ देणारे वृक्ष बनेल, याची चाहूल देतात. त्याचप्रमाणे आश्वासक व्यक्तिमत्त्वाची प्रतिभा आणि कर्तृत्वाची बीजे बालपणापासूनच दिसून येतात. याच उक्तीचा प्रत्यय अमरावतीचे यशस्वी उद्योजक अनिलकुमार रतनलालजी अग्रवाल यांच्या जीवनप्रवासातून येतो.




या सन्मानाबद्दल अमरावतीसह विदर्भातील स्नेही, स्वजन, व्यावसायिक आणि नागरिकांनी त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला. या पुरस्काराच्या निवड प्रक्रियेत त्यांच्या उद्योजकीय कारकिर्दीसोबतच कौटुंबिक,सामाजिक आणि व्यावसायिक योगदानाचाही विचार करण्यात आला. अमरावती जिल्ह्यातील येवदा या छोट्याशा गावात निम्न मध्यमवर्गीय कुटुंबात अनिल अग्रवाल यांचा जन्म झाला. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण त्यांनी येवदा येथेच पूर्ण केले. उच्च शिक्षणासाठी ते अमरावती येथे आले. काटकसरीचे आणि साधे जीवन जगत त्यांनी शासकीय महाविद्यालयातून अभियांत्रिकीची पदवी प्रथम श्रेणीत संपादन केली. चार भाऊ आणि दोन बहिणींच्या कुटुंबातील सर्वांत मोठा मुलगा असल्यामुळे कुटुंबाच्या अनेक अपेक्षा त्यांच्यावर होत्या. शैक्षणिक पात्रतेच्या जोरावर त्यांना सरकारी सेवेत चांगली संधी सहज मिळू शकली असती; मात्र नोकरीपेक्षा व्यवसाय करण्याची त्यांची इच्छा होती. कोणताही मोठा आर्थिक आधार नसताना केवळ कल्पकता, धैर्य, आत्मविश्वास आणि मेहनतीच्या बळावर त्यांनी अमरावतीच्या प्रमुख व्यावसायिक भागापासून दूर असलेल्या अवघ्या १०० चौरस फुटांच्या भाड्याच्या दुकानातून घरगुती वस्तूंच्या व्यवसायाला सुरुवात केली. 'विक्रीनंतरची सेवा' हे त्यांनी व्यवसायाचे प्रमुख तत्त्व मानले. ग्राहकांचा विश्वास संपादन करत त्यांनी आपल्या व्यवसायात ब्लॅक अँड व्हाईट टीव्ही, कलर टीव्ही, एलसीडी, एलईडी यांसह विविध आधुनिक इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा समावेश केला. अवघ्या १०० चौरस फुटांपासून सुरू झालेला हा व्यवसाय आज एक लाख चौरस फुटांपेक्षा अधिक क्षेत्रात विस्तारला असून 'काऊच पफी फर्निचर मॉल' या नावाने मध्य भारतातील ग्राहकांचे आकर्षण बनला आहे.

रेफ्रिजरेटर, एअर कंडिशनर, वॉशिंग मशीन, एलईडी टीव्ही यांसारख्या घरगुती विद्युत उपकरणांच्या खरेदीसाठी आजही अनेक ग्राहकांच्या पसंतीचे नाव म्हणजे 'पूनम इलेक्ट्रॉनिक्स'. बदलत्या बाजारपेठेची गरज ओळखून आणि ग्राहकांना अधिक व्यापक सेवा देण्याच्या उद्देशाने त्यांनी पुढे फर्निचर उद्योगातही प्रवेश केला. आज अमरावतीसह संपूर्ण विदर्भात नवीन इमारती बांधणारे ग्राहक असोत, सरकारी कार्यालये असोत किंवा घरासाठी फर्निचरची गरज असलेले ग्राहक 'काऊच पफी' हा अनेकांचा पसंतीचा पर्याय ठरला आहे. उत्पादनांची गुणवत्ता आणि ग्राहकांचा विश्वास हीच त्यांच्या यशाची खरी पावती आहे.'द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स'तर्फे मिळालेला 'सर्वोत्कृष्ट उद्योजक' पुरस्कार हा त्यांच्या प्रदीर्घ, संघर्षमय आणि प्रेरणादायी उद्योजकीय प्रवासाला मिळालेली योग्य दाद आहे.

# विद्यापीठ युवा महोत्सवात प्रथमेश अडाळगेची हॅट्ट्रिक

**बुलढाणा**-संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या युवा महोत्सवात कला प्रकारात प्रथमेश अनिलराव अडाळगे याने सलग तिसऱ्या वर्षी प्रथम क्रमांक पटकावत उल्लेखनीय कामगिरीची हॅट्ट्रिक नोंदवली आहे. सन २०२४, २०२५ आणि २०२६ अशा सलग तीन वर्षांत विद्यापीठाच्या या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवण्याचा मान त्याने मिळवला.

यंदाचा युवा महोत्सव २९ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरदरम्यान बुलढाणा येथे उत्साहात पार पडला. प्रथमेशने आपल्या क्लॅरिनेट वादनातून सादरीकरणातील सफाई, भावपूर्णता आणि दमदार शैली दाखवत परीक्षकांची मने जिंकली आणि प्रथम क्रमांकावर आपले नाव कोरले. पुरस्कार वितरण सोहळ्यात कुलगुरू मिलिंद बाराहते, उपकुलगुरू महेंद्र ढोरे, गझल नवाज भीमराव पांचाळे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक राजीव बोरकर, निखिलेश नलोडे, नेत्रा मानकर आणि सावन देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रथमेशचा गौरव करण्यात आला. विशेष म्हणजे, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या युवा महोत्सवात २०२४, २०२५ आणि २०२६ या सलग तीन वर्षांत मध्ये प्रथम क्रमांक मिळवत प्रथमेशने सातत्य, मेहनत आणि कलेवरील निष्ठेचे दर्शन घडवले आहे. विद्यापीठाच्या मंचावरून आपल्या क्लॅरिनेटच्या सुरांनी सुरुवात करून राष्ट्रीय स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या प्रथमेश अडाळगेच्या या यशाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. त्याची ही सलग तीन वर्षांची कामगिरी युवा कलाकारांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरत आहे.

## नवीन दवाखाना तयार, अधिकारी मात्र गायब!

**अंजनगाव बारी**-शासकीय निधीतून नवीन पशुवैद्यकीय दवाखान्याची इमारत उभी राहून पाच महिने उलटले, तरी उद्घाटनाचा मुहूर्त नाही; दुसरीकडे नियमित पशुवैद्यकीय अधिकारी बदली होऊन दवाखान्याचा कारभार अतिरिक्त अधिकाऱ्यांच्या भरवशावर! आठवड्यातून केवळ दोन दिवस अधिकारी उपलब्ध असल्याने १० गावांतील पशुपालक व शेतकऱ्यांची पशुवैद्यकीय सेवेसाठी फरफट सुरू आहे.

पशुधन पर्यवेक्षकाचे पद भरलेले असले तरी पशुधन सहाय्यक, प्रयोगशाळा परिचर, आरोग्य सेवक, शिपाई/परिचर यांसह अन्य आवश्यक पदे रिक्त आहेत.

त्यामुळे अपुऱ्या मनुष्यबळावर दवाखान्याचा कारभार सुरू आहे. एकीकडे लाखो रुपयांची नवीन इमारत वापराविना पडून, तर दुसरीकडे जुन्या दवाखान्यात पशूंवर उपचार सुरू आहेत. अधिकाऱ्याची बदली झाल्यानंतर कायमस्वरूपी अधिकारी नियुक्त करण्याऐवजी अतिरिक्त अधिकाऱ्यांवर कारभार सोपविण्याचा हा कोणता कारभार? असा संतप्त सवाल पशुपालकांकडून उपस्थित होत आहे.

# ...म्हणून गांधी देशाचे 'जननायक' ठरलेत-अविनाश दुधे

## नेहरू महाविद्यालयात राज्यस्तरीय बहुविद्याशाखीय परिसंवाद

**नेर (यवतमाळ)**-महात्मा गांधी यांनी संपूर्ण देशभर भ्रमंती करून शेतकरी, कामगार आणि महिलांचे प्रश्न त्यांच्या भाषेत समजून घेतले. सर्वसामान्य माणसाला स्वातंत्र्याच्या लढ्याशी जोडून त्यांना संघर्षाचा सक्रिय भाग बनविले. त्यामुळेच गांधी केवळ स्वातंत्र्यलढ्याचे नेते न राहता देशाचे जननायक ठरले, असे प्रतिपादन 'मीडिया वॉच'चे संपादक अविनाश दुधे यांनी केले.

येथील नेहरू महाविद्यालयात आयोजित 'अहिंसा, शांतता आणि जागतिक आव्हाने : २१ व्या शतकासाठी गांधीवादी दृष्टिकोन' या विषयावरील राज्यस्तरीय बहुविद्याशाखीय परिसंवादात ते बोलत होते. दक्षिण आफ्रिकेतून भारतात परतल्यानंतर गांधी यांनी बनारस येथे केलेल्या ऐतिहासिक भाषणाचा संदर्भ देत दुधे म्हणाले की, त्या भाषणातून गांधींच्या विचारांचे वेगळेपण स्पष्टपणे दिसून येते. समाजातील प्रचंड विषमतेबद्दल त्यांनी अस्वस्थता व्यक्त केली. केवळ भाषणे देऊन स्वातंत्र्य मिळणार नाही, त्यासाठी प्रत्यक्ष कृती आवश्यक आहे, हा संदेश त्यांनी दिला. इंग्रजीच्या अतिरेकी वापराबद्दल नाराजी व्यक्त




करत त्यांनी मातृभाषेचे महत्त्व अधोरेखित केले.

गांधींच्या भोवती पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ. राजेंद्र प्रसाद, सरदार वल्लभभाई पटेल, नेताजी सुभाषचंद्र बोस, मौलाना अबुल कलाम आझाद, सी. राजगोपालाचारी आणि विनोबा भावे यांच्यासारखे ज्ञान, पांडित्य आणि विद्वत्ता असलेले अनेक नेते होते. तरीही गांधी या सर्वांचे नेते ठरले, याचे कारण त्यांची नाळ सर्वसामान्य माणसाशी जोडलेली होती, असे दुधे यांनी सांगितले. 'गांधींच्या शब्दाला मंत्राचे सामर्थ्य लाभले होते. त्यांच्यावर सामान्य जनतेचा अफाट विश्वास होता. गांधींच्या शब्दाखातर सर्वसामान्य माणसाने स्वतःला स्वातंत्र्य चळवळीत झोकून दिले.त्यांच्या परिसस्पर्शाने हजारो सामान्य माणसांचे सोने झाले,' असे दुधे म्हणाले. या परिसंवादाला प्रा.अरुण खोडसकर, प्राचार्य संदीप काळे, यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उदय मांजरे यांच्या संकल्पनेतून या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.

## सेवा संकल्प अभियाना अंतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन

**शिराळा**-येथील दुर्गा प्रायमरी इंग्लिश स्कूल मध्ये सेवा संकल्प अभियाना अंतर्गत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.यामधे चित्रकला स्पर्धा वक्तृत्व स्पर्धा स्वच्छता अभियान राबविण्यात आले.गावातील प्रमुख मार्गावरून प्रभात फेरी काढून स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यावेळी विद्यार्थी मोठा सहभाग होता तसेच मुख्याध्यापक प्रवीण मोहरे शिक्षिका अर्चना



नागे अंकिता घोंगडे प्राची माकोडे ऋषिकेश इंगळे निकिता उके ऋतुजा राहटे शालीनी कडु आदी उपस्थित होते.

## टाकरखेडा संभू येथे प्रवचनासह हृदयरोग-मधुमेह तपासणी शिबीर

**टाकरखेडा संभू**-येथील श्रीराम मंदिर संस्थानच्या वतीने संगीत गुरुचरित्र व गुरुमहिमा प्रवचनाचे आयोजन करण्यात आले आहे. श्री. संत सचिनदेव महाराज यांच्या अमृततुल्य वाणीतून ७ ते ९ ऑक्टोबरदरम्यान दररोज सायंकाळी ७.३० ते ९.३० या वेळेत श्रीराम मंदिर संस्थान येथे प्रवचन होणार आहे. या धार्मिक कार्यक्रमासोबतच श्री संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटल, अमरावती आणि श्रीराम मंदिर संस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने हृदयरोग व मधुमेह तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, ९ ऑक्टोबर रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत श्रीराम मंदिर संस्थान, टाकरखेडा संभू येथे हे शिबिर होणार आहे.या शिबिरात नागरिकांची हृदयरोग व मधुमेहाची तपासणी करण्यात येणार असून, नागरिकांनी आपल्या आरोग्याची काळजी घेत मोठ्या संख्येने सहभागी होऊन शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. असल्याने परिसरातील नागरिकांनी या दोन्ही उपक्रमांना उपस्थित राहावे, असे आयोजकांनी कळविले आहे.

# ग्राम रोजगार सेवकांचे बेमुदत कामबंद आंदोलन; शासनाच्या निर्णयाविरोधात संताप

## सहा महिन्यांचे थकीत मानधन, प्रवास भत्ता व अपघात विम्यासह विविध मागण्यांसाठी आंदोलन

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

महाराष्ट्र राज्य ग्राम रोजगार सेवक कृती समितीच्या वतीने ग्राम रोजगार सेवकांच्या विविध न्याय्य मागण्यांसाठी १ ऑक्टोबर पासून बेमुदत कामबंद आंदोलन व बेमुदत निषेध संप पुकारण्यात आला आहे. शासनाने २२ सप्टेंबर २०२६ रोजीचा अन्यायकारक निर्णय रद्द करून ३ ऑक्टोबर रोजीच्या शासन निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे.

यासंदर्भात पंचायत समिती अमरावतीच्या गटविकास अधिकाऱ्यांना तसेच विविध कार्यालयात निवेदन तसेच देण्यात आले. निवेदनात नमूद केल्यानुसार, २४ सप्टेंबर रोजी अटी-शर्ती असलेल्या शासन निर्णयाबाबत कार्यवाही करण्यात आली असली, तरी ग्राम रोजगार सेवकांच्या मानधनासंदर्भात ३ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयाप्रमाणे अंमलबजावणी करण्याबाबत सुधारित शासन



निर्णय अथवा स्पष्ट पत्र शासनाकडून उपलब्ध झालेले नाही. त्यामुळे राज्यातील ग्राम रोजगार सेवकांमध्ये संभ्रम व नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.विकसित भारत-रोजगार व आजीविका हमी मिशन (ग्रामीण) योजनेंतर्गत ३ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा इशारा कृती समितीने दिला आहे.

ग्राम रोजगार सेवकांचे मागील सहा महिन्यांचे थकीत मानधन तातडीने अदा करावे, प्रवास भत्ता व डाटा पॅक नियमित द्यावा, तसेच ग्राम रोजगार सेवकांना अपघात विम्याचे संरक्षण लागू करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय मानधन पद्धत बंद करून ग्राम रोजगार सेवकांना नियमित वेतन लागू करावे, अशीही मागणी करण्यात आली आहे.शासनाने मागण्यांची तातडीने दखल घेऊन सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा बेमुदत कामबंद आंदोलन सुरूच ठेवण्यात येईल, असा स्पष्ट इशारा महाराष्ट्र राज्य ग्राम रोजगार सेवक कृती समितीने निवेदनातून दिला आहे.

'३ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करून ग्राम रोजगार सेवकांचे थकीत मानधन अदा करावे. अन्यथा मागण्या मान्य होईपर्यंत बेमुदत कामबंद आंदोलन सुरूच ठेवून आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल.'

**-राहुल कारकोन,** अमरावती

## अभिजात मराठी भाषा सप्ताहानिमित्त विद्यापीठात विविध कार्यक्रमांचे आयोजन

# ज्येष्ठ भाषा अभ्यासक डॉ.विजया डबीर यांचे विशेष व्याख्यान

**अमरावती/का.प्र.**

मराठी भाषेची प्रदीर्घ साहित्यिक परंपरा, समृद्ध सांस्कृतिक वारसा आणि अभिजात स्वरूप नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाचा उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मराठी भाषा विभाग आणि संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा पदव्युत्तर मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ३ ते ९ ऑक्टोबर या कालावधीत 'अभिजात मराठी भाषा सप्ताह' विविध उपक्रमांनी साजरा करण्यात येत आहे. या निमित्ताने ९ ऑक्टोबर रोजी विशेष व्याख्यान, वक्तृत्व स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

९ ऑक्टोबर रोजी सकाळी १०.३० वाजता विद्यापीठाच्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर दृकश्राव्य सभागृहात'अभिजात मराठी भाषेची समृद्ध परंपरा' या विषयावर ज्येष्ठ भाषा अभ्यासक डॉ. विजया डबीर यांचे विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. अभिजात मराठी भाषेच्या समृद्ध परंपरेवर व्याख्यानातून प्रकाश टाकणार आहे. या व्याख्यानचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते हे भूषविणार आहेत.

यानंतर दुपारी १२.३० वाजता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये तसेच विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांमधील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.दिवसभरातील शैक्षणिक व वैचारिक उपक्रमांना सांस्कृतिक अभिव्यक्तीची जोड देत दुपारी ४.०० वाजता विद्यापीठाच्या डॉ.के.जी.देशमुख सभागृह येथे 'अभिजात मराठी, अभिमान मराठी' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात गायक अभिजित कोसंबी, प्रसन्नजीत कोसंबी, संगीत कला अकादमी पुरस्कारप्राप्त सुभाष नकाशे आणि चमू यांच्यासह साठ कलावंत सहभागी होणार आहेत. यासांस्कृतिक कार्यक्रमाचे निवेदन मराठी अभिनेते दिगंबर नाईक करणार आहेत.या कार्यक्रमातून मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीशी संबंधित विविध कलाविष्कार सादर करण्यात येणार आहेत.

या सर्व उपक्रमांमध्ये विद्यार्थी,संशोधक,प्राध्यापक, साहित्यप्रेमी आणि मराठी भाषाप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, पदव्युत्तर मराठी विभागाच्या विभागप्रमुख प्रा. डॉ. मोना चिमोटे यांनी केले आहे.

## पोटे पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चरमध्ये जागतिक अधिवास दिन

**अमरावती/का.प्र.**

पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चरमध्ये नुकताच जागतिक अधिवास दिन तसेच जागतिक आर्किटेक्चर दिवस उत्साहात झाला. या कार्यक्रमाला बी. आच.डिग्री तसेच आर्किटेक्चरचे व इंटिरियर डिप्लोमा चे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



जागतिक अधिवास दिनानिमित्त प्रा.राम विघे यांनी मार्गदर्शन करताना 'सर्वांसाठी घरे' या संकल्पनेचे महत्त्व स्पष्ट केले. निवासस्थान मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.वाढते शहरीकरण, गृहनिर्माणाची गरज, शाश्वत विकास आणि पर्यावरणपूरक अधिवास याबाबतही त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

त्यानंतर जागतिक वास्तुकला दिनानिमित्त आकि. संजय देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. भावी वास्तुविशारदांनी तांत्रिक ज्ञानासोबत सामाजिक जाणीव आणि पर्यावरणीय संवेदनशीलता जोपासावी, असे आवाहन त्यांनी केले.कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना 'Adequate Housing for All', शाश्वत अधिवास आणि जबाबदार वास्तुकलेचे महत्त्व समजावून देण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन व आभार सारा खान यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा अमित घाडगे,प्रा स्नेहल विधळे, प्रा भूपेंद्र जयस्वाल, प्रा. अंकुश खंडारे, प्रा पलाश अग्रवाल, प्रा दिशा अग्रवाल, प्रा कीर्ती हिंगे, प्रा हरीश पलसोकार प्रामुख्याने उपस्थित होते.

# छाननीअंती ३० उमेदवारांची नामनिर्देशनपत्रे वैध

## वंचित आघाडीचे गाजी जाहेरोश यांचा अर्ज बाद

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणूकीसाठी नामनिर्देशन पत्रे दाखल केलेल्या ३१ उमेदवारांपैकी ३० उमेदवारांची नामनिर्देशनपत्रे आज झालेल्या छाननीमध्ये वैध ठरविण्यात आली. तर एका उमेदवारांचे नामनिर्देशनपत्र अवैध ठरले. त्यामुळे छाननीअंती या निवडणूक रिंगणातील उमेदवारांची संख्या ३० झाली आहे. अशी माहिती अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी दिली.

### अमरावती विभाग शिक्षक निवडणूक

भारत निवडणूक आयोगाच्या निवडणूक कार्यक्रमानुसार नामनिर्देशनपत्रांची छाननी बुधवार ७ ऑक्टोबर, २०२६ रोजी सकाळी ११ वाजेपासून निवडणूक निर्णय अधिकारी, अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ तथा विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती यांच्या कार्यालयातील सभाकक्ष क्र. २, तळमजला, विभागीय आयुक्त कार्यालय, कॅम्प अमरावती येथे करण्यात आली. यावेळी निवडणूक निरीक्षक अभय




महाजन, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहआयुक्त (सामान्य प्रशासन) संजय जाधव आणि इतर अधिकारी उपस्थित होते.

या छाननीमध्ये ३० उमेदवारांची नामनिर्देशनपत्रे वैध ठरविण्यात आली. त्यामध्ये अदिती ऋषिकेश पोहरे (भारतीय राष्ट्रीय काँग्रेस), किरणराव रामराव सरनाईक (शिवसेना), दत्तात्रय श्रीराम लहाने (शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे ), प्रा.अनिल मधुकरराव काळे (बळीराजा पार्टी), गजानन गोविंदराव ढोके (भारतीय जनसम्राट पार्टी), प्रिती हर्षल रेवणे (राष्ट्रीय युवा स्वाभीमान पार्टी), सुरेश बाबुराव देवकर (समाजवादी गणराज्य पार्टी), अविनाश मधुकर बोर्डे (अपक्ष), अशोक वामन हिवाळे (अपक्ष), आशिष मनोहर अंबुलकर (अपक्ष), उपेंद्र बाबाराव पाटील (अपक्ष), किरण अर्जून चौधरी (अपक्ष), किरण अर्जून पवार (अपक्ष), गजानन रामचंद्र उल्हे (अपक्ष), दिलीप भिमराव कडू (अपक्ष), नितीन सुभाषराव आगे (अपक्ष), डॉ. प्रशांत विश्वेश्वर विघे (अपक्ष), भोयर चंद्रशेखर उर्फ शेखर मनोहरराव (अपक्ष), मिलिंद तुकाराम ब्राह्मणे (अपक्ष), राजेशकुमार शालिग्राम कड (अपक्ष), रामदास संपतराव कटक (अपक्ष), विनोद प्रल्हाद कडू (अपक्ष), श्रीकांत गोवींद देशपांडे (अपक्ष), श्रीकृष्ण सुर्यभान पहुरकर (अपक्ष), सजील खान खलील खान (अपक्ष), ☞(पान २ वर)

# विद्यार्थ्यांच्या शालेय पोषण आहारात आढळला कीटक

## ठेकेदाराची मनमानी, पालकवर्ग संतप्त

### नगर परिषद प्रशासनाचे दुर्लक्ष, ठेकेदारावर कारवाईची मागणी

**खल्लार/प्रतिनिधीः-** बाभळी येथिल उर्दू शाळा क्र. १० मध्ये शालेय पोषण आहाराच्या खिचडीत कीटक आढळल्याचा धक्कादायक प्रकार आज (दि.७) समोर आला आहे. त्यामुळे शालेय पोषण आहाराच्या गुणवत्तेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. यापूर्वीही याच शाळेत अशाच प्रकारच्या तक्रारी समोर आल्या होत्या. तरीही संबंधित ठेकेदारावर नगर परिषद प्रशासनाकडून फक्त नोटिस बजावण्यात आली. मात्र ठोस कारवाई करण्यात आली नसल्याने आज पुन्हा शालेय



पोषण आहारात कीटक आढळून आल्याने प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत.

शालेय पोषण आहार हा विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी थेट संबंधित विषय असताना त्याच्या गुणवत्तेकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. मात्र, वारंवार तक्रारी समोर येत असतानाही संबंधित ठेकेदारावर नगरपालिका प्रशासनाचे पुरेसे नियंत्रण नसल्याचा आरोप पालकवर्गाकडून करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या आहाराची गुणवत्ता, स्वच्छता आणि सुरक्षितता याबाबत नियमित तपासणी करण्याची मागणीही पालकांकडून होत आहे.

दर्यापूर ☞(पान २ वर)

# घरगुती सिलेंडरमधून गॅस काढून विक्री

## गुन्हे शाखेचा महाजनपुऱ्यात छापा, -४४ गॅस सिलेंडरसह दोघे ताब्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-** घरगुती वापराच्या एलपीजी सिलेंडरमधून मशीनच्या सहाय्याने गॅस काढून त्याच सिलेंडरची विक्री करणाऱ्या दोघांवर गुन्हे शाखेच्या युनिट क्रमांक १ ने बुधवारी कारवाई केली. महाजनपुरा-माताखिडकी परिसरातील एका घरासमोर करण्यात आलेल्या या कारवाईत ४४ गॅस सिलेंडर, तीन गॅस रिफिलिंग मशीन, तीन वजनकाटे आणि दोन लोडिंग ऑटो असा एकूण ९ लाख ५४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या आदेशानुसार गुन्हे शाखेचे अधिकारी व कर्मचारी अवैध धंद्यांविरोधात कारवाईसाठी



शहरात पेट्रोलिंग करीत होते. त्यावेळी महाजनपुरा-माताखिडकी परिसरात काही जण घरगुती वापराच्या एलपीजी सिलेंडरमधून एक ते दोन किलो गॅस ☞(पान २ वर)

# उमेश कोल्हे हत्याकांडातील मुख्य सूत्रधाराची याचिका फेटाळली

## आरोपी विरुद्ध भक्कम पुरावे- न्यायालय

**अमरावती/प्रतिनिधीः-** राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या विशेष न्यायालयाने अमरावती येथे जून २०२२ मध्ये झालेल्या औषध विक्रेते उमेश कोल्हे यांच्या हत्या प्रकरणातील मुख्य आरोपीची आरोप मुक्त करण्याची याचिका फेटाळून लावली आहे. न्यायालयाने याचिका फेटाळताना म्हटले आहे की, केवळ प्रथमदर्शनीच नव्हे तर आरोपीविरुद्ध भक्कम पुरावेही उपलब्ध आहेत.

भाजप नेत्या नुपूर शर्मा यांनी केलेल्या कथित आक्षेपार्ह वक्तव्यानंतर कोल्हे यांनी समाज माध्यमावर त्यांचे समर्थन करणारी पोस्ट टाकल्याने त्यांची निर्घृण हत्या करण्यात आली होती. पोलीस आणि तपास यंत्रणांनी आतिफ रशीद सह ११ आरोपींविरुद्ध हत्या आणि



बेकायदेशीर कृत्ये प्रतिबंधक कायदा अंतर्गत गुन्हा दाखल केला होता. विशेष सत्र न्यायाधीश चकोर बाविस्कर यांनी आपल्या निकालात म्हटले आहे की, या प्रकरणात रशीदसह सर्व आरोपींचा एकच उद्देश होता, ते मानसिक दृष्ट्या आपले लक्ष्य पूर्ण करण्यासाठी एकत्र आले होते, त्यांचा समान हेतू होता, तो म्हणजे उमेश कोल्हे यांचा खून करणे. समाज विशेषामध्ये दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने घातक शस्त्रांचा वापर कोल्हे हत्या प्रकरणात करण्यात आला, हा गुन्हेगारी कट रचल्याचा दावा आरोपपत्रात करण्यात आला आहे. न्यायालयाने मान्य केले की, आरोप सिद्ध करण्यासाठी सक्षम असे भक्कम पुरावे उपलब्ध आहेत, ☞(पान २ वर)

# दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज



### -चारा साक्षरता अभियानाची सुरुवात
### -जिल्हाधिकाऱ्यांचा थेट शेतकऱ्यांशी संवाद

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यातील संभाव्य चारा टंचाई आणि पर्जन्यमानातील तूट लक्षात घेता पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता करण्यासाठी जिल्ह्यात 'चारा साक्षरता व संवर्धन अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानाची सुरुवात नांदगाव पेठ येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात करण्यात आली.

जिल्हाधिकारी आशिष येरेकर अध्यक्षस्थानी होते. त्यांनी चारा व्यवस्थापनाच्या प्रात्यक्षिकांची ☞(पान २ वर)

# थकीत मालमत्ता कर

## महापालिकेने ४० फ्लॅटसह माधव लॉनलाही बजावली जप्तीची नोटीस



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांच्या आदेशानुसार महानगरपालिकेच्या झोन क्र. ३ अंतर्गत दस्तूरनगर हद्दीतील नंदनवन कॉलनी, माधव लॉन परिसरात थकीत☞(पान २ वर)

# ऑनलाइन चक्री जुगारावर गुन्हे शाखेची धाड, दोघे ताब्यात

## ४४ हजारांचा मुद्देमाल जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात सुरू असलेल्या अवैध धंद्यांविरोधात गुन्हे शाखेच्या युनिट क्रमांक २ ने बुधवारी कारवाईची मोहीम राबवित जवाहर गेट परिसरातील बंद दुकानात सुरू असलेल्या ऑनलाइन चक्री जुगारावर धाड टाकली. या कारवाईत दोन जणांना ताब्यात घेत त्यांच्याकडून रोख रक्कम, मोबाइल व ऑनलाइन जुगाराचे साहित्य असा एकूण ४४ हजार ७४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ☞(पान २

### देशी दारू विक्रीवरही कारवाई-

दरम्यान, गुन्हे शाखेच्या युनिट क्रमांक २ ने गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शेगाव परिसरात अवैध देशी दारू विक्रीविरोधातही कारवाई केली. या कारवाईत राजेंद्र बापुराव जांभुळकर (वय ५३, रा. शेगाव) याच्याकडून अंदाजे २ हजार २५० रुपयांची देशी दारू जप्त करण्यात आली. याप्रकरणी गाडगेनगर पोलीस ठाण्यात दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, पोलीस ☞(पान २ वर)

# 'पाणी टंचाई क्षेत्र' घोषित

## सार्वजनिक विहिरींच्या परिसरातील पाण्याच्या वापरावर निर्बंध

**अमरावती/प्रतिनिधीः-** भूजलाची खालावलेली पातळी आणि भविष्यातील संभाव्य पाणी टंचाईची गंभीर दखल घेत जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी जिल्ह्यातील प्रभावित गावांमध्ये ऑक्टोबर २०२६ ते जून २०२७ या कालावधीसाठी अधिकृतपणे 'पाणी टंचाई क्षेत्र' घोषित केले आहे. त्यानुसार सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या विहिरींच्या एक किलोमीटर परिसरातील पाण्याच्या वापरावर निर्बंध घालण्यात आले आहे.



महाराष्ट्र भूजल (पिण्याच्या पाण्याच्या प्रयोजनासाठी विनियमन) अधिनियम २००९ च्या कलम २५ व २६ अंतर्गत हे आदेश लागू करण्यात आले आहेत. वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांच्या ☞(पान २ वर)

# सात एकरातील सोयाबीनच्या तीन गंज्या पेटविल्या

## तिवसा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल



**तिवसा/प्रतिनिधीः-** शेतातच ठेवलेल्या सोयाबीनच्या गंजीला कुणीतरी अज्ञात इसमाने पेटवून दिल्याने अगदी तोंडाशी आलेला घासच शेतक-यापासून अज्ञात इसमाने हिरावून टाकला.यात शेतकऱ्याचे ४ लाख रुपयांचे ☞(पान २ वर)

# -ज्ञानेश कुमारांच्या विरोधात युवक काँग्रेसचे निषेध आंदोलन



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती जिल्हा युवक काँग्रेसच्या वतीने चिखलदरा तालुका युवक काँग्रेस, काटकुंभ येथे ज्ञानेश कुमार तसेच 'मतचोरी करणाऱ्या सरकार'च्या निषेधार्थ म्हशीवर बसवून जाहीर मिरवणूक काढण्यात आली.

यावेळी कार्यकर्ते म्हणाले, 'अक्कल मोठी की म्हैस मोठी. आज समजले की ज्ञानेश कुमार यांच्या अक्कलसमोर म्हैसच मोठी आहे!' या आंदोलनाच्या माध्यमातून ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात जोरदार निषेध नोंदविण्यात आला.

यावेळी अमरावती जिल्हा युवक काँग्रेसच☞(पान २ वर)

### निवडणूक आयोगाविरोधात

# इंडिया आघाडीचे ८ ऑक्टोबरला आंदोलन

### काँग्रेस जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख



**अमरावती/प्रतिनिधीः-** निवडणूक आयोगाच्या कारभाराविरोधात तसेच मुख्य निवडणूक आयुक्तांच्या विरोधात इंडिया आघाडीच्या निर्देशानुसार अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयावर तीव्र आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार, ८ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ वाजता इर्विन चौक येथून आंदोलन सुरू होणार आहे. इंडिया आघाडीच्या निर्देशानुसार आयोजित करण्यात आलेल्या या आंदोलनात आघाडीतील ☞(पान २ वर)




# सेंट्रल किचन बंद होताच आश्रमशाळांमध्ये पुन्हा कंत्राटी पद्धतीचा घोळ?

## विद्यार्थ्यांच्या जेवणाची जबाबदारी नेमकी कोणाची?

**मेळघाट/प्रतिनिधीः-** शासकीय आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या जेवणाची व्यवस्था करण्यासाठी सुरू करण्यात आलेले सेंट्रल किचन सध्या बंद करण्यात आले आहे. सेंट्रल किचन बंद करण्यामागचे नेमके कारण काय आणि पुढील काळात कोणती व्यवस्था केली जाणार, हा प्रश्न नंतरचा असला तरी सेंट्रल किचन बंद झाल्यानंतर आजच्या घडीला आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या जेवणाची व्यवस्था नेमकी कोण करत आहे, हा गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे.

सेंट्रल किचन सुरू होण्यापूर्वी शासकीय आश्रमशाळांमध्ये वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या कंत्राटदारांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या जेवणाची व्यवस्था केली जात होती. आता सेंट्रल किचन बंद झाल्यानंतर पुन्हा त्याच पद्धतीने आश्रमशाळांमध्ये जेवणाची व्यवस्था सुरू करण्यात आल्याची माहिती आहे. मात्र, विद्यार्थ्यांचे जेवण कंत्राटदारामार्फत तयार केले जात आहे की आश्रमशाळेतील कर्मचारी स्वतः ही व्यवस्था सांभाळत आहेत, याबाबत अद्याप स्पष्टता नाही.

व्यवस्था कंत्राटदारामार्फत असो किंवा शाळेतील कर्मचाऱ्यांमार्फत, आश्रमशाळेतील विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना नियमानुसार आणि

# ध्वनी प्रदूषण करणाऱ्या ३४ गणेश मंडळांना कारवाईची नोटीस

## दुर्गोत्सवात नियम मोडणाऱ्यांना इशारा

**अचलपूर/प्रतिनिधीः-** गणेशोत्सवाच्या काळात भक्तीच्या नावाखाली ध्वनी प्रदूषणाचा अतिरेक करणाऱ्या सार्वजनिक गणेश मंडळांना आता पोलिसांनी चांगलाच दणका दिला आहे. परतवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत यंदा गणेशोत्सवाच्या विसर्जन मिरवणुकांदरम्यान ध्वनी प्रदूषणाच्या नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी तब्बल ३४



सार्वजनिक गणेश मंडळांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. एकूण ७७ सार्वजनिक गणेश मंडळांपैकी ३४ मंडळांवर ही कारवाई झाली आहे.

१४ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत गणेशोत्सव साजरा करण्यात आला. या काळात विविध सार्वजनिक गणेश मंडळांनी विसर्जन मिरवणुका ☞(पान २ वर)